# साप्ताहिक माणूस

शनिवार । २८ ऑगस्ट १९७६ । साठ पैसे




काहीशा
अनिच्छेनेच
रॉय विशेषांक
वाचायला घेतला
परंतू....

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक तेरावा
२८ ऑगस्ट १९७६
मूल्य : साठ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
□
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी : ४३४५९
□

# सप्रेम नमस्कार

□ आजच 'एम. एन. रॉय विशेषांक' मिळाला. पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत अप्रतिम. देशातील सद्य:स्थितीत ज्या प्रकारच्या विचारांची नितांत आवश्यकता आहे, त्या विचारांचे प्रतीक असलेल्या एका अपयशी पण लोकोत्तर विचारवंताचे चिंतन मनोज्ञ वाटले.
एम. एन. रॉयबद्दल थोडीशीच माहिती असलेल्या असंख्य वाचकांपैकीच मी एक. 'लोकशाहीचे भवितव्य' हा त्यांच्या भाषणाचा लेख वाचतानाच भवितव्याचे अचूक निदान करणारा हा माणूस विलक्षण असला पाहिजे हे जाणवलं. पण त्याचवेळी असंही वाटलं की, हे विचार जेव्हा त्यावेळी (१९५० साली) एका प्रभावी व्यक्तिमत्त्वाने राजकारणी व समाजकारणी लोकांसमोर मांडले होते, तेव्हा त्या लोकांना या भवितव्याची जाणीव का झाली नाही? कुणाही विरोधी विचारसरणीच्या लोकांनी–सर्वोदयवाल्यांनी त्याचवेळी हे विचार स्वीकारून लोकशिक्षण का सुरू केले नाही? विनोबाजी-जयप्रकाशजी यांसारखी लोकोत्तर माणसेही राजकारणापासून दूर होती. पण अशा लोकशिक्षणाकडे का वळली नाहीत? राजकारणापासून दूर असलेले अनेक सर्वोदयी व इतर कार्यकर्ते याकडे का वळले नाहीत? जयप्रकाशजी या लोकशिक्षणाकडे वळले. पण केव्हा? १९७४–७५ मध्ये. ज्यावेळी वराच उशीर झाला होता. कुणाच विरोधी विचारांच्या विद्वानांना याचे भान कसे राहिले नाही? भविष्याचे अचूक निदान करणे हेही राजकारणात महत्त्वाचे असते. त्यात एवढी मोठी चूक का झाली? कोणी उत्तर देईल काय?
उत्तम अंकाबद्दल धन्यवाद.

१७ ऑगस्ट १९७६ — विजय बर्वे, मुंबई

□ 'मानवेन्द्र रॉय' हा विशेषांक स्वातंत्र्य दिनी प्रसिद्ध करून आपण एक महान कार्य केले आहे. मानवेन्द्र रॉय यांची माहिती हल्ली फारच थोड्या लोकांना आहे. त्या काळात परदेशांत राहून स्वदेश कार्य करीत राहणे म्हणजे 'अग्निदिव्य'च होय. परंतु मानवतेचा मानबिंदू यशस्वीरीत्या गाठणाऱ्या या मानवेन्द्राची आधुनिक स्वहितेन्द्रीयांना काय कल्पना?
१९५० चे मानवेन्द्र रॉय यांच्या भाषणातील उतारे वाचून आज आपण कुठे आहोत याची जाणीव होऊन मात्र मन विषण्ण होते. समाधान एकच वाटते की, या थोर महात्म्याला पाहण्याची व त्यांचे भाषण ऐकण्याची संधी आम्ही पुणे येथे कॉलेज-शिक्षण घेत असताना मिळाली. आपल्या अंकातील थोर विचारांच्या लेखकांनी मानवेन्द्र रॉय यांच्या कार्याची योग्य जाणीव करून दिली आहे. यापेक्षा स्वातंत्र्यदिनाचा उत्सव तो काय साजरा करणार?

मुंबई — के. जी. कुलकर्णी

□ नुकताच 'माणूस'चा एम. एन. रॉय विशेषांक वाचून काढला. मला यापूर्वी रॉय यांची काहीही माहिती नव्हती. त्यामुळे काहीशा अनिच्छेनेच अंक वाचावयास घेतला. परंतु जसाजसा वाचू लागलो, तसतसे वाटू लागले की, एका हिमालयाइतक्या कर्तृत्वाच्या आलेखाला आपण इतके दिवस पारखे होतो. या विशेषांकामुळे एक महान व्यक्तिमत्त्व माझ्या आयुष्यात कायम स्मरणात राहणार आहे.
माणूसच्या या धाडशी व अत्यंत मोलाच्या कामगिरीबद्दल मनःपूर्वक आभार.

१७।८।७६ — नंदकिशोर बरदवा, सोलापूर

पुणे येथील फ्रान्स मित्र मंडळाच्यावतीने लेखक दीड-दोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी फ्रान्सला गेले होते. या वास्तव्यात त्यांना भेटलेल्या फ्रेंच माणसांची, त्यांनी पाहिलेल्या फ्रेंच जीवनाची ही ओळख. ओळखीतला पहिला लेख ७ ऑगस्ट अंकात प्रसिद्ध झाला होता. हा दुसरा.

# पॅरिस, आय लव्ह यू

शांताराम पारपिल्लेवार

गेला आठवडाभर मी फादर मिचेल डिलाहूयच्या घरी राहतोय. पहिल्या दिवशी पॅरिस स्टेशनात ते मला घ्यायला आले होते. त्यांचा माझा कॉमन इंटरेस्ट आर्टचा होता. टॅक्सीतून जाताना ते सांगत होते–मी चित्र काढतो. शिल्पं हा माझा छंद आहे. भेटलो तेव्हा माहीत नव्हतं की, ते फादर आहेत म्हणून (प्रीस्ट आहेत म्हणून).

लेवालुई पेरे नावाच्या उपनगरात त्यांचा फ्लॅट आहे. रू मार्जोलिनच्या जुन्या पाच मजली इमारतीत पाचव्या मजल्यावर ते राहतात. वर जायला लाकडी जिना आहे. प्रत्येक स्टेजला दोन फ्लॅटस् आहेत. वर चढताना सारखं वाटत राहतं, आपण प्रार्थना-समाजातल्या जुन्या बिल्डिंगमधेच आहोत. साऱ्या फ्लॅटची दारं बंद आहेत.

त्यांचा दोन खोल्यांचा फ्लॅट आहे. एक त्यांची अभ्यासिका-स्टडी रूम. त्यात एक टेबल आहे. एक रिव्हॉल्व्हिंग खुर्ची. खुर्चीच्या मागे भिंतीच्याच आकाराचं शेल्फ. त्यात पुस्तकं. टेबलापुढे एक स्टूल ठेवता येईल एवढीच मोकळी जागा आहे. दुसऱ्या भिंतीशी सोफा-कम-बेड, उशाला पुस्तकांची आरास. पायथ्याशी पुस्तकांचा ढीग. सोफाच्या वर भिंतीला एक स्लाईडिंग काचा असलेलं कपाट. त्यात काही शिल्पं आहेत. नग्न आकार, उपडी निवांत पडलेली, बसलेली–वळून मागे पाहणारी, एक काळजीत मग्न स्त्री. काही भारतीय देवदेवतांच्या मूर्ती, ही साधारण दहा बाय आठची खोली. ह्या खोलीत जायला वेगळं दार. तिच्या बाजूला तेवढीच दुसरी खोली. ह्यात एक पलंग आहे. अन् एक कपाट. कपड्यांचं असावं. ह्या खोलीला एक खिडकी. खालची रू मार्जोलिन वरून दिसते. डिलाहूय म्हणतात, 'ही तुझी बेडरूम' ह्या खोलीला लागून एक दार–छोटचा किचनमधे जाणारं. किचनमधे एक टेबल, टेबलाखाली बसलेला छोटा फ्रीज, बाजूला वॉशबेसिन. दोन कपबशा, दोन प्लेटस्, दोन-तीन भांडी अन् एक छोटा गॅसचा स्टोव्ह. सारं कसं साधं. सिम्पल. 'तुझ्यासाठी मी भात करून ठेवलाय. ब्रेडही आहे. फ्रीजमधे बटर-चीझ आहे. नाऊ, प्लीज, मेक युवर सेल्फ कम्फर्टेबल!' मी म्हणतो, 'ओह आय ॲम ॲट होम. डोन्ट वरी फॉर मी.'

'मला क्षमा कर, हं! कारण माझा बराचसा वेळ अध्ययन अन् अध्यापनात जातो. मी सकाळीच घराबाहेर पडतो, तो रात्री परततो.'

'जेवायला घरी येता ना?'

'नाही. आम्ही आठ प्रीस्टस् आहोत. दुसऱ्या एका ठिकाणी जेवायला जातो. तुझ्यासाठी मी सारं आणून ठेवलं आहे. आणखी काय लागल्यास मला सांग.'

'आताही तुम्ही काही खाणार नाही?'

'नाही. आय वुईल हॅव कॉफी ओन्ली.'

'देन लेट मी मेक ईट फॉर यू.'

ते खुळखुळा हलवावा तसे हसतात. त्यांच्या दातात चांदीची तार आहे. चमकते. छोट्या गोल भिंगाचा स्टीलफ्रेमचा चष्मा ते बोटानं काढतात. डोळे रुमालानं पुसतात.

'आय होप यू हॅव नो ट्रबल इन् दी आय.'

'नाही. आता ह्या वयात असं हे होणारच.'

'वय काय तुमचं?'

'बावन.'

मी मनगटावरच्या घड्याळात बघतो. दहा वाजत आहेत. आता खरंच अंधार झालाय. खऱ्या अर्थानं आपण संन्याशाच्या (प्रीस्टच्या) दारात आलो आहोत असं वाटतं.

ते मला स्टोव्ह लावून दाखवतात. त्यांच्यासाठी मी कॉफीचं पाणी उकळायला ठेवतो. फ्रीजमधून दुधाची बॉटल काढून त्यात दूध ओततो.

एक कॉफीचा कप त्यांना देतो. एक मी घेतो. शुगर क्युब्स् त्यांच्यापुढे करीत म्हणतो, 'हा फ्लॅट तुमचा स्वतःचा आहे का?'

'हो.'

'तुम्ही भारतात आला होता का?'

'आठ वेळा!' मी त्यांच्याकडे पाहातच राहतो.

'आर यू शॉक्ड?' ते विचारतात. पुढं सांगतात, 'मी तीनदा नेपाळला गेलोय. अन् दोन वेळा तिबेटला.'

'यु हॅव स्पेशियल इंटरेस्ट इन् नेपाल ॲण्ड तिबेट?'

'मी इथं बुद्धीझम् आणि पाली भाषा शिकवतो. त्या संदर्भात माझं जाणं झालं.'

"अन् भारतात?"

"आय वॉज इंटरेस्टेड इन हिंदू आर्ट, स्पेशिअली स्कल्पचर. दॅट ड्रॅगड् मी टू इंडिया. एकदा गेलो. मग पुनःपुन्हा जावंसं वाटलं. संस्कृतचा अभ्यास केला. हिंदुईझममधे मन रमलं. अध्ययन करीत गेलो. आता मी इथल्या कॅथॉलिक कॉलेजमधे हिंदूईसम आणि संस्कृतपण शिकवतो."

वेळ बराच झाला असतो. ते म्हणतात, इफ यू लाईक यू कॅन टेक बाथ बिफोर मील्स." आणि माझा निरोप घेतात. अभ्यासिकेत जातात.

बाथरूम छोटी-फार तर पाच बाय पाचची असेल. त्यात कमोड आणि बसून आंघोळ

करता येईल इतक्या छोट्या आकाराचा बाथटब. गरम आणि थंड पाण्याचा नळ आणि शॉवर. कमोड आणि बाथटब वेगळा करता यावा ह्यासाठी मधे पडदा. पॉलीथिनचा.

मी खऱ्या अर्थानं फ्रेंच बाथ घेतो.

कसं फ्रेश वाटतं. लेमान्स ते पॅरिसपर्यंतचा गाडीचा प्रवास उभ्या उभ्यानेच करावा लागला होता. प्रवास कंटाळवाणा वाटला नाही. कारण सोबत शिंदे, शेट्टे सावळे होते. दाराशी सामानावरच आपटेबाईही बसल्या होत्या. मग गाणं सुरू झालं.–सुहाना सफर... एका सुरात सारे गायला लागले. गाडीतील फ्रेंच मंडळीही आस्वाद घ्यायला लागली. टाळ्यांचा ताल तेही द्यायला लागले.

दोन घास पोटात टाकायच्या आधी थोडं ॲपारेटिफ् घेतो. फादरनं सारी सोय करून ठेवली आहे. फ्रिजमधे आरेंजिना आहे, वाईन आहे अन् ॲपारेटिफ् पण.

अंग पलंगावर टाकतो. झोप कधी लागली ते कळतही नाही.

बघता बघता पॅरिसमधले आठ दिवस कसे गेलेत कळलेही नाही. मी रात्री बेरात्री यायचो तेव्हा ते झोपलेले असायचे. ते सकाळी जायचे तेव्हा मी झोपलेला असायचा. पॅरिसमधे कुठेकुठे जातो आहे. मिळेल त्याला भेटतो आहे. प्रश्न विचारतो आहे. घरचा माणूस फादर डिलाहूथ मात्र राहूनच जातो. जायचा दिवस येऊन ठेपलाय्. एक जूनचं माझं एअर इंडियाचं रिझर्व्हेशनही झालं आहे. तीसला रात्री ते चार दिवसाच्या लेक्चर टूरवर जाणार असतात. मी त्यांना माझ्यासाठी दोन तास द्यायला सांगतो. ते हसत हो म्हणतात. त्यांना मला खूप काही विचारायचं आहे.

त्यांच्या अभ्यासिकेत मी भारतातून नेलेली उदबत्ती लावतो. ते प्रसन्न असतात. हा माणूस मला एखाद्या योग्यासारखा वाटतो. सतत ज्ञानसाधनेत आराधनेत. त्यांच्या शेल्फवरच्या पुस्तकात अजंठ्याच्या लेण्यावर पुस्तक आहे, पतंजलीचं योगशास्त्र आहे, हिंदूईझम्, बुद्धीझमवर कितीतरी पुस्तकं आहेत. त्यांचं सतत लेखनही सुरू असतं. त्यांनी बायबल नावाच्या मासिकात हिंदूईझमवर लिहिलेले लेख दाखवले. एक परीक्षण गीतगोविंदम्चं दाखवलं.

मी विचारतो,

"तुम्ही कितीतरी वेळा भारतात जाऊन आलात. बऱ्याच भारतीयांना भेटला असाल. त्यांचा एखादा गुण जो तुम्हाला आवडला; सांगू शकाल कां ?"

"फ्रेंच माणसांनी शिकावा, आचरणात आणा असा एक गुण निःसंशय भारतीयांचा आहे अन् तो म्हणजे त्यांचा साधेपणा. (सिम्प्लिसिटी) दे आर हॅप्पी इन् ऑल सर्कम्स्टन्सेस्" तोंडातला पाईप बाजूला करून ते सांगतात.

"हिंदुधर्मात तुम्हाला रस का वाटला ?"

"मी कलेच्या माध्यमातून धर्माकडे वळलो. आधी मी कलावंत आहे. युरोपमधील कला माझे समाधान करू शकली नाही. कला म्हणजे चित्र आणि शिल्पकला. मला त्यात भौतिकवाद दिसायचा. पण नंतर फ्रान्समधे कलेसंबंधी एक चळवळ उभी झाली. इम्प्रेशनिस्टस् कलावंतांची. ती भारतीय कलेला जवळची होती. आकाराचा आविष्कार रंगाच्या माध्यमातून त्यांनी घडवला. मला ह्या आकाराच्या पलीकडे जायचं होतं. भारतीय कलेचा अभ्यास करताना मला एक साक्षात्कार झाला. तुमच्या देवळातील देवदेवता. त्यांना तुम्ही आकारात स्वीकारलं. कलेची ती रूपं तुम्ही प्रस्थापित केलीत पण खरा प्रवास तिथं संपत नव्हता. ती तर आध्यात्मिक (स्पिरिच्युअल) तळमळीची सुरवात होती. भारतीय कलेत मला समन्वय दिसला–भौतिक आणि आध्यात्मिक पातळीवरचा" ते थांबतात. पुनः पाईप ओढतात. पुढं सांगतात, "अन् आता व्यवसायानं मी बांधला गेलोय. अध्यापनासाठी मी तो विषय निवडला. मला त्यात रस घ्यायलाच पाहिजे."

धर्म आणि कला ह्यात संगती, विसंगती काय ?"

"भगवंतापर्यंत जायचा एकच मार्ग आहे. भक्तीचा. मला वाटतं कला भक्तीचंच स्वरूप आहे. कलेत माणूस समर्पित होतो. स्वत्व विसरतो. त्याचा इगो डिझॉल्व्ह होतो. भक्ती आणखी आहे तरी काय ? प्रत्येक धर्मानं भगवंतापर्यंत पोचायचे मार्गच दाखवलेत ना ?"

'आजच्या ह्या धावपळीच्या युगात हिंदुधर्म मानवजातीकरिता मुक्तीदाता (Salvation) ठरू शकेल काय ?'

'हिंदुधर्म जीवनाला जवळचा आहे. जास्त जीवनाभिमुख आहे. त्यात जीवन सुकर करण्याचे बरेच मार्ग सांगितले आहेत. इट हॅज मेनी पाथस् ॲज रिगार्डस् आर्ट ऑफ लाईफ, टेक्निकल मीन्स टू गेट बेटर लाईफ. शेवटी प्रत्येकानं इन्डिव्हिज्युअली आपल्यापुरतं बरं वाईट काय ते ठरवायचं आहे. नुसता हिंदुधर्मच मुक्तीदाता ठरेल असे मला वाटत नाही.'

'हिंदुधर्म आणि ख्रिश्चियॅनिटी ह्यांच्याविषयी तुलनात्मक मत ?'

'मी माझ्या धर्माविषयीच्या बऱ्याचशा गोष्टी हिंदुधर्मातून शिकलो. त्या दृष्टीने हिंदुधर्माच्या अभ्यासाने मी माझ्या धर्माविषयी अधिक विचार करू शकलो. आरशात प्रतिबिंब पाहावं तसं. हिंदुधर्मात मला माझ्याच धर्माचं प्रतिबिंब दिसलं. स्वतःला चांगलं ओळखता यावं म्हणून दुसऱ्याविषयी जाणकार असणे आवश्यक आहे. स्वतःच्या धर्माची अधिक चांगली ओळख व्हावी म्हणून मी हिंदुईझम्, बुद्धीझम् अभ्यासू लागलो. इतर धर्मज्ञानामुळे मी जागृत (enlightened) झालो. डोळस झालो. आज सत्य हे वैश्विक (universal) पातळीवर रियलाईझ करायचं आहे. दुसऱ्याविषयी काहीएक माहिती नसता मी म्हणू लागलो ख्रिश्चियॅनिटी तेवढीच सत्याचा मार्ग दाखवते, तर तो माझा दुराग्रहच ठरेल. माझे अज्ञानही ठरेल. त्या दृष्टीने मी स्वतःला मर्यादित करीत राहीन. हिंदुधर्म माणसाचे माणसाशी, समाजाशी आणि जगाशी नाते काय सांगतो. ख्रिश्चनधर्माचाही तोच सूर आहे. हिंदुधर्मात देवाचा साक्षात्कार आत्माविष्कारातून होतो (Realisation of God through self realisation) आम्ही म्हणतो आम्हाला मुक्ती (Salvation) मानवजातीवरच्या प्रेमात मिळते. सेवेत मिळते. तर काय इथून तिथून सगळ्यांचा सूर सारखाच. धर्माचं महत्त्व एवढ्याकरिता की त्यानं जीवनाची (Style) दिशा ठरवली म्हणून. अन् ही स्टाईल तर युनिव्हर्सल आहे.'

'आजच्या जगात युनिव्हर्सल धर्माची, एका वेगळ्या धर्माची गरज आहे काय ?'

'तसं मला वाटत नाही. ख्रिश्चियॅनिटी हा Faith आहे. देवत्व माणसात उतरलंय्.

येशूचा संदेश प्रेमाचा आहे. अखिल मानवजातीकरिता प्रेम. ख्रिश्चियॅनिटी धर्म नाही; तो एक विश्वास आहे. अ‍ॅण्ड इट हॅज युनिव्हर्सल अपील. म्हणून मला तरी वेगळ्या युनिव्हर्सल धर्माची जरूरी भासत नाही. माझ्यापुरतं बोलायचं झालं तर, माझा विश्वास, माझा धर्म ही माझी मर्यादा नाही, तर जास्तीत जास्त ज्ञान प्राप्त करायची, नवीन शोध ग्रहण करायची जाणीव आहे. म्हणून मी गीता, रामायण आणि महाभारत ह्यांच्याकडे निव्वळ धार्मिक पुस्तकं म्हणून पाहत नाही. ते माणसाला व्यवहार, कर्तव्य शिकवणारे ग्रंथ आहेत. जीवनाकडे अधिक जवळ नेणारे आहेत.'

मी आता जास्त खोलात जात नाही. त्यांचा अभ्यास दांडगा असला तरी, काही ग्रह त्यांचे पक्के आणि परंपरागत आहेत हे मला जाणवतं. मी विचारतो,

'तुम्ही प्रीस्ट का झालात?'

ते कुठंतरी हरवतात. त्यांच्या डोळ्यातील निळी बुबुळं भूतकाळात हरवतात. एकएक वाक्य आठवत आठवत सांगितल्यासारखे ते बोलतात, 'माझी आई खूपच धार्मिक होती. मी तिला लहानपणापासून न्याहाळत असे. माझा लहानपणापासूनच प्रीस्टस् लोकांशी संबंध आला. माझे काका होते. त्यांच्याविषयी मला खूप आदर होता. मला ते आदर्श वाटायचे. आपण त्यांच्यासारखंच व्हावं वाटायचं. ते प्रीस्ट होते. मी मोठा झालो. शिकलो. नंतर मी मिलिट्रीतही गेलो. एक सैनिक म्हणून. तेव्हा मी तरुण होतो. ऑक्युपाईड जर्मनीत होतो. पण तो माझा पिंड नव्हता. डोळ्याच्या त्रासामुळे मिलिट्रीतून माझी सुटका झाली. वाटलं बरं झालं. आता आपल्याला जीवन मानवजातीच्या सेवेकरिता समर्पित करता येईल. मी प्रीस्ट झालो.'

'शिक्षण कुठवर झालंय?'

'बॅकलोरीयानंतर सहा वर्षं स्कूल ऑफ थियॉलॉजीत घालवलीत. लिसे इन् फिलॉसॉफी आणि क्लासिकल लिटरेचर मिळालंय्. नंतर डिप्लोमा इन इंडिअन स्टडीज् वुइथ संस्कृत घेतलंय्.'

'हा कुठे मिळाला?'

'पॅरिसमध्ये इन्स्टिटयूट ऑफ ओरिएन्टल सिव्हिलायझेशन आहे. तिथं मी अभ्यास केलाय्. पुढे डिप्लोमा ऑफ रिसर्च इन् इंडिअन कल्चर अ‍ॅन्ड सिव्हिलायझेशन मिळवला. इथल्या युनिव्हर्सिटित ओरिएंटल इन्स्टिटयूट आहे. तिथं पूर्वेच्या बहुतेक भाषा शिकवल्या जातात. हिंदी, बंगाली पण. तिथे मी तिबेटी भाषेचा अभ्यास केला.'

'ओरिएंटल इन्स्टिटयूटमध्ये मराठी शिकवतात का?'

'अजून तरी शिकवत नाहीत.'

'तुम्हाला वेतन मिळतं का? आणि किती?'

'प्रत्येक प्रीस्टला महिन्याला १४०० फ्रॅंक्स मिळतात. शिवाय लिलमधल्या बिशपला मी सर्व्हिसेसकरिता मदतनीस म्हणून जातो. त्याचे ७२० फ्रॅंक्स मिळतात. कॅथॉलिक इन्स्टिटयूट, जिथं मी अध्यापन करतो, मला १००० फ्रॅंक देते. त्याशिवाय फ्रान्समध्ये (S. N. R. S.) इन्स्टिटयूट फॉर सायंटिफिक रिसर्च आहे. त्यांच्याकडून वर्षाकाठी मला ८००० फ्रॅंक मानधन मिळतं.'

'बरंच मिळतं की?'

वाटतं इतकं आमच्याकडेही मिळत गेलं तर संसाराला कंटाळून संन्यास घ्यायची कुणावर पाळी यायची नाही. कुणी शिकलासवरला मुलगा बेकार राहण्यापेक्षा संन्यासी व्हायचं कबूल करील.

'लेखनाचेही मिळत असतीलच ना?'

'लेखनाचे फारसे मिळत नाहीत. माझं बहुतेक लेखन धार्मिक मासिकाकरिता असतं. उदाहरणार्थ बायबल, ज्येसूज कॅरितास वगैरे.'

'भाऊ, बहीण नातीसंबंध वगैरे?'

'फक्त एक बहीण आहे. ती लांब दूर आहे. तिला नातवंडं आहेत. माझ्या वडिलांनी लग्नच फार उशीरा केलं. चाळिसाव्या वर्षी मी झालो.'

'आता एक वैयक्तिक प्रश्न! हरकत नसल्यास विचारतो.'

ते हसतात. म्हणतात 'गो अहेड.' मी त्यांच्या शिल्पाकडे पाहतो. नग्न पुतळे. स्त्रीच्या शरीराचे वेगवेगळे आकार. कलात्मक.

'तुम्ही कलेचा अभ्यास केलाय. नग्न मॉडेलस वगैरे चित्रित केलीत का?'

'बरीच केलीत की?'

'तुम्हाला कधी विचलित झाल्यासारखं वाटलं नाही?'

'नाही. सम हाऊ आय् अ‍ॅम अबोव्ह ऑल दॅट.'

'हे स्वतःचं ग्लोरिफिकेशन नाही ना?'

'नाही. खरंच नाही.'

'सेक्ससंबंधी तुम्हाला कधी काहीच वाटलं नाही का?'

मला वाटलं, ह्यांच्या आयुष्यात एखादी घटना झाली असेल. एखादा प्रेमभंग झाला असेल. आपल्या इकडच्या सिनेमातल्यासारखा मग तो प्रीस्ट झाला असेल.

त्यांच्या डोळ्यात एक करुण झाक अंधारात वीज चमकावी तशी चमकते. क्षणभरच डोळे फडफडतात. चेहरा मग निग्रही होतो. मग ओठावर स्मित फाकतं.

'कधी त्यासंबंधी विचार करायची उसंतच मिळाली नाही. मी माझ्या ज्ञानसाधनेत इतका चिंब डुंबलोय् की, तो विचारच आला नाही.'

'विचार आला नाही म्हणण्यापेक्षा...' मी विषयालाच कलाटणी देतो. 'आय होप यू हॅव्ह नॉट सप्रेस्ड् युवर सेक्स?'

'सेक्स खरेच सप्रेस् करता येते का हा वादाचा विषय आहे. माझ्यापुरता मी जबाबदार म्हणून वागत आलोय्. काही प्रीस्टस्नी प्रेम केलं, लफडी केलीत. प्रीस्टहूड सोडून लग्नही केलीत.'

'नाही. फ्रॉईडच्या मताप्रमाणे काही अबनॉर्मलिटिज असल्या तर माणूस सेक्सच्या बाबतीत थंड असतो. त्याचा लिबिडो, मोटिव्ह फोर्स, हा मरत नाही. तो फक्त चॅनलाईझ् होतो. त्याला तो सब्लिमेशन ऑफ सेक्स म्हणतो. मग तो चित्रकार होईल, लेखक होईल, जिनियस होईल, प्राण्यावर प्रेम करील, झाडावर माया ठेवील, प्रचंड बुद्धिमत्तेचा धनी होईल. हे पॉझिटिव्ह सब्लिमेशन. लिआनार्डो डा व्हिन्सीचं उदाहरण असं निगेटिव्ह सब्लिमेशन समाजाला अन् त्या व्यक्तीलाही घातक ठरतं. तो खून पाडील. डिक्टेटर होईल. एखादा हिटलरही होतो. सेवा, प्रेम, सूड, द्वेष ही सगळी सेक्सची सब्लिमेटेड रूपं आहेत. आपलं मत.'

'फ्रॉईडनं चुकीचा शब्द वापरून सगळा गोंधळ करून ठेवला. सेक्स हा तसा योग्य शब्द नाही. त्याची आंतरिक शक्ती म्हणता आली असती की? ती दैवी किंवा पाशवी असेल.'

'हा सनातनी पुरातन दृष्टिकोन झाला.

पृष्ठ २७ वर

# पतिराजानी गृहलक्ष्मी पॉलिसी कां घेतली याची कारणे वेगवेगळी असू शकतात.

**संतप्त यजमान :**



काय ? माझ्या पत्नीची काळजी दुसरे कुणी घेणार ? कदापि नाही !

**अभिमानी यजमान :**



आमच्यां कुटुंबात स्त्रियांची जपणूक नेहमीच चांगली होत आली आहे.

**जागरुक यजमान :**



मी नसेन तर तिची दशा होणार नाही याची तरतूद मलाच करुन ठेवली पाहिजे.

**प्रेमळ यजमान :**



माझ्या लाडकीसाठी आणखी मोलाची कोणती भेट मी देऊ शकतो ?

गृहलक्ष्मी पॉलिसीच्या योगे गृहिणींना दरमहा निश्चित अुत्पन्नाची तरतूद होते व दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावे लागत नाही. आपल्या पत्नीवरील प्रेम व्यक्त करण्याचा हा अेक अुत्तम अुपाय आहे.

बरे, केवळ दरमहा अुत्पन्न मिळते इतकेच नव्हे तर हा पैसा अगदी तिचा स्वतःचा. दुसरे कुणी त्याला हात लावू शकत नाही. रक्कम दिली जाते तीही हप्त्याने. न जाणो, आपल्या पश्चात् अेकदम पैसा गांठी दिसला की कुणाची बुद्धी फिरायची.

प्रिय शाखाधिकारी,
माझ्या पत्नीसाठी मी गृहलक्ष्मी पॉलिसी घेऊ इच्छितो, कृपया आपल्या जाणकार प्रतिनिधीस माझी भेट घेण्याविषयी सुचवू शकाल काय ?

नांव ______________________

पत्ता ______________________

______________________

हे कुपन नजीकच्या अेल. आय. सी. च्या शाखेकडे पाठवा. किंवा पी. आर. ओ., अेल. आय. सी. सेंट्रल ऑफिस, योगक्षेम, मुंबई ४०० ०२१ या पत्त्यावर रवाना करा.

**आपल्या पत्नीसाठी तहहयात निश्चिंत तरतूद : अेल्. आयु. सी. ची गृहलक्ष्मी पॉलिसी.**

RADEUS/LIC/P-4

# अलिप्तांची संघटना

## कोलंबो परिषदेचे फलित

वा. दा. रानडे

अलिप्त राष्ट्रांची पाचवी परिषद कोलंबो येथे नुकतीच पार पडली. परिषदेची वाढती सभासद संख्या हे तिच्या वाढत्या सामर्थ्याचे निदर्शक आहे. पहिली परिषद बेलग्रेड येथे १९६१ साली भरली तिला पंचवीस राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यानंतर कैरो ४८, लुसाका ५४, अल्जीअर्स ७० आणि आता कोलंबो ८६ याप्रमाणे ती अधिक प्रातिनिधिक बनत आहे. नवस्वतंत्र आणि विकसनशील राष्ट्रांच्या आकांक्षांचे ती प्रतीक होऊ पाहत आहे.

जागतिक राजकारणात अलिप्ततेच्या भूमिकेचा पुरस्कार प्रथम पंडित नेहरूंनी केला. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली, पण त्यांना आपल्या लष्करी गटात व करारात ओढण्यासाठी बड्या राष्ट्रांच्या हालचाली सुरू झाल्या. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पाश्चात्त्य गट आणि रशियाच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्ट गट अशा दोन गटात जगाची विभागणी होऊन त्यातून वातावरण वाढत जाणार असे दिसू लागले. तिसऱ्या जागतिक महायुद्धाचा संभव दिसू लागला होता. कोरिआ, व्हिएटनाम, अरब-इस्राएल, भारत–पाक अशी छोटी युद्धे झाली पण त्यांतून बडे युद्ध उद्भवले नाही ते मुख्यतः दोन कारणांमुळे. अण्वस्त्रांमुळे सबंध जगाचाच संहार होण्याची भीती दोन्ही बड्या राष्ट्रांना वाटत होती हे एक कारण आणि भारतासारख्या अलिप्त राष्ट्रांनी कोणत्याही गटात सामील न होता स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला हे दुसरे महत्त्वाचे कारण. पण आता अमेरिका–रशिया या बड्या राष्ट्रांनीच समझोत्याचे व सहकार्याचे धोरण स्वीकारल्यावर अलिप्त राष्ट्रांच्या भूमिकेला काय वाव राहिला? असा प्रश्न उपस्थित होतो.

बड्या राष्ट्रांचे संबंध आता पूर्वीइतके संघर्षाचे राहिलेले नाहीत हे खरे पण छोट्या राष्ट्रांना आपल्या गटात ओढून त्यांच्यावर प्रभाव पाडण्याच्या हालचाली बड्या राष्ट्रांनी सोडलेल्या नाहीत. लष्करी गटांपैकी फक्त सिअॅटो विसर्जित झाल्यासारखा आहे. नाटो व वॉर्सा करार, तसेच सेंटो करार अस्तित्वात आहेतच. पश्चिम आशियात तसेच हिंदी महासागरात बड्यांची वर्चस्वस्पर्धा चालूच आहे. इराण, सौदी अरेबिया, इजिप्त, जॉर्डन यांना अमेरिकेची मोठी लष्करी मदत आहे. तर सोमालिया, युगांडा, लिबिया यांना मदत करीत आहे. हिंदी महासागरात दिगो गार्शिया येथे अमेरिकेने मोठा तळ उभारला आहे. हिंदी महासागर क्षेत्रांतील राष्ट्रांनी या तळाच्या उभारणीस विरोध केला होता, पण तळाची उभारणी ते थांबवू शकले नाहीत. कोलंबोस नुकत्याच झालेल्या परिषदेतही या तळाला विरोध दर्शविण्यात आला, पण या शाब्दिक ठरावांचा काही प्रभाव पडत नाही असा आतापर्यंतचा अनुभव आहे.

अलिप्तता प्रभावी कशी होईल हा परिषदेपुढील मुख्य प्रश्न होता. अलिप्त राष्ट्रांचे संख्याबल वाढले पण त्यातून संघटित सामर्थ्य उभे राहिल्याशिवाय या राष्ट्रांचा प्रभाव पडणार नाही. एकजुटीचे, संघटनेचे महत्त्व या राष्ट्रांना पटू लागले आहे. अलिप्त राष्ट्रांपैकी बहुतेक सर्व राष्ट्रे अविकसित किंवा कमी विकसित आहेत. औद्योगिक विकास हा त्यांच्यापुढील सर्वांत 'महत्त्वाचा प्रश्न आहे. विकासासाठी त्यांच्याजवळ पुरेसे भांडवल नाही, तंत्रज्ञान नाही. बडी राष्ट्रे मदत करायला तयार असतात, पण ही मदत बिनशर्त नसते. आपली धोरणे आखताना बड्या राष्ट्रांच्या कलानेच त्यांना चालावे लागते. या राष्ट्रांना मान्य नसलेले काही केले तर मदत बंद होते, करार रद्द केले जातात. भारताने अणुस्फोट केल्यानंतर कानडाने अणुकेंद्रासाठी देऊ केलेली मदत थांबविली व करारही रद्द केला. युरेनिअम पुरविण्यात अमेरिकेनेही विलंब लावला. भारतावर एक प्रकारे दडपण आणण्याचाच उद्देश यामागे होता. एकेका छोट्या राष्ट्राने बड्या राष्ट्रांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला, तर असे दडपण टाळणे फार कठीण जाते, या अनुभवातूनच अलिप्त राष्ट्रांची संघटना उभी राहिली.

सामुदायिक सहकार्याने व स्वावलंबनाने आर्थिक विकास घडवून आणण्याचा सात कलमी कार्यक्रम कोलंबो परिषदेने मान्य केला. विकासासाठी एक विकास निधी उभारण्यात येणार असून त्याची सुरुवात या वर्षाखेरपासूनच होणार आहे. सर्व अलिप्त राष्ट्रांची साधनसंपत्ति एकवटून निरनिराळ्या राष्ट्रांच्या विकास गरजांप्रमाणे तिचा वापर करावयाचा, आपसांत व्यापार वाढवावयाचा, शक्यतो सर्व गरजा आपसांतच भागविण्याचा प्रयत्न करावयाचा आणि अगदी आवश्यक तेवढ्या बाबींपुरतीच बड्या विकसित राष्ट्रांची मदत घ्यावयाची. ही मदतीची मागणीही शक्यतो सामुदायिकपणेच करायची म्हणजे दडपण आणायला, शर्ती घालायला बड्या राष्ट्रांना फारसा वाव मिळणार नाही. अलिप्त राष्ट्रांच्या कच्च्या मालाला विकसित राष्ट्रांकडून योग्य भाव मिळावा. सध्याचे भाव फार कमी आहेत. ही राष्ट्रे संघटित होऊन त्यांची मागणी केल्यास ती मान्य होण्याचा बराच संभव आहे. एकेकटे राष्ट्र याबाबत फारसे काही करू शकत नाही. आर्थिक कार्यक्रम या उद्देशांनी राबविण्यात आला पाहिजे. कोलंबो परिषदेत हे उद्देश स्पष्टपणे मांडण्यात आलेले नाहीत. पश्चिम युरोपातील राष्ट्रांचा सामुदायिक बाजारपेठेचा प्रयोग यशस्वी झाला. अलिप्त राष्ट्रांनी अशी बाजारपेठ का उभारू नये? दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रे या दिशेने पावले टाकीत आहेत. सर्वच अलिप्त राष्ट्रांसाठी सामुदायिक बाजारपेठ उभारणे एकदम शक्य होणार नाही. पण आशिया, आफ्रिका अशा प्रादेशिक विभागापुरत्या बाजारपेठा उभारता येतील. आर्थिक कार्यक्रम अंमलात आणण्यात कितपत यश येते यावर अलिप्त राष्ट्रांचे आर्थिक सामर्थ्य वाढणे बऱ्याच प्रमाणात अवलंबून आहे.

कोलंबो परिषदेत दोन राष्ट्रांच्या दरम्यानचे अंतर्गत संघर्षाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले नाहीत. एकजूट टिकविण्यासाठीच हे धोरण स्वीकारण्यात आले. लेबाननचा प्रश्न, पॅलेस्टिनिअन अरबांचा प्रश्न त्यामुळेच उपस्थित झाले नाहीत. पण प्रश्न उपस्थित झाले नाहीत म्हणून त्यांचे अस्तित्व नाकारता येत नाही. हे प्रश्न संबंधित राष्ट्रांनी शक्य तो आपसांत वाटाघाटींनी सोडवावे. त्यात यश न आल्यास अलिप्त परिषदेच्या लवाद मंडळाकडून उभय देशांच्या संमतीने सोडवावे अशी काही यंत्रणा परिषदेने आखायला हवी होती. कारण हे संघर्ष आहेत तोपर्यंत ते सोडविण्यातच शक्ती वाया जाते. ते मिटल्याशिवाय अलिप्त राष्ट्रांमध्ये प्रभावी एकजूट निर्माण होऊ शकणार नाही. परिषदेचे कार्य व यंत्रणा सतत चालू राहिली पाहिजे. तीन वर्षांनी एकदा अधिवेशन भरते, मधून मधून केन्द्रातरी परराष्ट्र मंत्र्यांच्या पातळीवर बैठका होतात, दरम्यानच्या काळात अलिप्त परिषद विसरली जाते. परिषदेतून एक सुसूत्र क्रियाशील संघटना उभी करण्यात अलिप्त राष्ट्रांना कितपत यश येते यावर कोलंबो परिषदेचे खरे यश मोजले जाईल. □

# सोलकढी

## □ व. दिं. च्या वदिलशाहीत वादळ

पंधरासोळा वर्षांपूर्वी मुंबईच्या मराठीच्या प्राध्यापकांत आणखी एका कुळकर्ण्याची भर पडली. ही भर नुसती संख्येची नसून गुणवत्तेची आहे, हे तेव्हाच माझ्या ध्यानात आले होते. मुंबईच्या मराठीच्या प्राध्यापकांची गुणवत्ता मिणमिण नव्हती हो; तिचा चांगला भसाभसा प्रकाश पडायचा. त्याच्यात या नव्या कुळकर्ण्यांनी आपली ढणढणबत्ती लाऊन दिली. लौकरच साहित्य-समीक्षा-संबंधित–साक्षेपी–सहृदय–सुजाणांचे डोळे टकमकायला लागले.

हे आणखी एक कुळकर्णी म्हणजेच यथाकाल विशेष नावारूपाला येऊन, महाराष्ट्रासकट मुंबई-पुण्याचे अलीकडचे शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक जीवन आपल्या सव्यसाची कर्तृत्वाने घडवणाऱ्या शिल्पकारांपैकी एक प्रमुख शिल्पकार (Sculptor) डॉ. प्रा. व. दि. ऊर्फ व. दि. कुळकर्णी होत. व. दि. कुळकर्णी मुंबईला आले ते पुण्याहून; डेक्कन क्वीनने. (त्यावेळी टॅक्सी सेवा उपलब्ध नव्हती.) निळा ब्लेझरचा कोट घालून; रा. श्री. जोग, पु. ग. सहस्रबुद्धे, श्री. के. क्षी. यांचे शुभाशीर्वाद घेऊन. आले ते तडकथेट पूर्व विलेपार्ल्याच्या साहित्यिक गुलमातच. अल्पावधीतच पूर्व विलेपार्ल्यात व. दि. ची वदिलशाही स्थापन झाली. पुढे ती अ-पूर्व पार्ल्यातही पसरली. पार्ले महाविद्यालयात ते मराठी-विभाग प्रमुख होऊन राहिले. पूर्व विलेपार्ल्याच्या कलाकदरी रस्त्याउपरस्त्यातून आपल्या समतोल चालीने ते सहेतुक येऊजाऊ लागले. पार्ल्याच्या बख्खळ सांस्कृतिक संस्थांचे मित्र, सल्लागार आणि मार्गदर्शक (Friend, Philosopher and Guide) बनले. 'गॉसिप ग्रूप' या पूर्व पार्ल्याच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नाटचसंस्थेचे अध्यक्षही झाले. ताजे, तरुण, होतकरू तसेच वातड, सवयस्क, निर्ढावलेले साहित्यिक आपले लिखाणठिकाण त्यांच्याकडून अभिप्रायून घेऊ लागले. लौकरच, पुण्यात स्वस्थ आयुष्य कंठणारे आमचे स्फुटनायक व. दि. पूर्व विलेपार्ल्याच्या उपमुंबापुरीच्या धक्काधक्कीत रमले हो रमले. (मात्र मुंबईच्या धावपळधपाधपीमुळे बौद्धिक आणि वैचारिक रवंथ करण्यात अडचणी येतात असे सगळयांना सारखे सांगत राहायची जी लाडिक सवय त्यांनी लाऊन घेतली होती ती त्यांनी अद्यापीही सोडलेली नाही. या बाबतीत ते, श्लील-साहित्यकैवारी मंगळमूर्ती प्राध्यापक रामचंद्र शंकर वाळिंबे, पुणे, यांचा वारसा सांभाळून आहेत.)

पूर्वविलेपार्ल्यात दैववशात अवतरलेल्या या नव्या कर्मयोग्याकडे बृहन्मुंबईचे, आणि बृहन्मुंबईकडे या यथानिर्दिष्ट कर्मयोग्याचे लक्ष जाण्याची प्रक्रिया आपोआपच घडली. मग व. दि. च्या कार्यकक्षा रुंदावत रुंदावत बृहन्मुंबईच्या सीमांना भिडल्या आणि पुढे सीमोल्लंघन करून बृहन्महाराष्ट्रापर्यंत फैलावल्या. त्यामुळे आधीचे वक्ते व. दि., महनीय प्रवक्ते झाले. सभा, चर्चा, अभ्यासमंडळे, संमेलने, परिसंवाद, बैठका, समारंभ, मेळावे, यांना व. दि. च्या उपस्थितीमुळे एक प्रकारची भारदस्त शोभा येऊ लागली. नाटचशाखेसहित मुंबई मराठी साहित्य संघ आणि संशोधन मंडळासहित मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय यांच्यासारख्या, कलांना निवास आणि भोजन (शिवाय सकाळचा चहा आणि आंघोळीला साबूसहित गरम पाणी) देणाऱ्या आलिशान संस्था व. दि. शी नाते सांगण्यात धन्यता मानू लागल्या. पूर्व विलेपार्ल्याच्या (हल्ली मुक्काम पूर्व हैदराबाद) आनंदमार्गी साधल्यांच्या बरोबरीने तळेगाव-दाभाडचाचे गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर, लिहिलेला प्रत्येक शब्द, व. दि. ना दाखवून, त्यांची मान्यता घेऊन, जरूर ती दवादुरुस्ती करून मगच छापायला देऊ लागले. मुंबई विद्यापीठाचे मराठीचे पदव्युत्तर वर्गातले विद्यार्थी वदिवदिवदिवदिवदि. करू लागले. एका सदिच्छाभेटीसाठी व. दि. अमेरिकेला की मॉरिशसला जाणार असेही आमच्या कानांवर येऊन गेले.

या सुमारास, मुंबई विद्यापीठाने मराठी विषयासाठी स्वतंत्र विभाग सिद्ध करायचे ठरवले. त्यात, एक प्राध्यापक, एक रीडर, दोन लेक्चरर्स, एक लिपिक, दोन हरकामे नेमस्त करायचे होते. महाविद्यालयातल्या डुबुकडुबुक शिकवण्याला व. दि. कंटाळले होते. त्यात कसलेही बौद्धिक आव्हान नव्हते. आठवडयाला बाराचौदा व्याख्याने घेऊन वर सहामाही–पूर्वपरीक्षेच्या पाचसातशे उत्तरपत्रिका तपासाव्या लागत होत्या. बरे, बथ्थड आणि बुरसट कामे आपल्या कनिष्ठ सहकाऱ्यांवर सोपवून चंडोलमजा करणे व. दि.च्या सात्त्विक स्वभावात नाही. असो. महाविद्यालयाच्या डबक्यातून विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या स्वीमिंग पूल (पोहोण्याचा तलाव) मध्ये जायचा शहाणा विचार व. दि.नी केला. हा विचार आमच्यापर्यंत पोचला तेव्हा निवड व्हायच्या उपचारांची वाट पाहण्यासाठी न थांबता, आम्ही स्वभावसहज गुणज्ञतेने मुंबई विद्यापीठातले प्राध्यापक प्रमुखपद व. दि. ना विनाअट बहाल करून टाकले. पण विद्यापीठ असे टवकेकाढू की, त्याला हे कळले नाही. त्याने व. दि. ची निवड केली; पण रीडर म्हणून; प्राध्यापक प्रमुखपदासाठी व. दि. च्या प्राबंधिक पात्रतेचे माप म्हणे कमी भरले. (फू: फू: फू: फू: फू:) आता हे खरे होते की तोपर्यंत व. दि. च्या नावावर, संपादिलेली पुस्तके वगळता, 'लीलाचरित्र: एक अभ्यास' (एप्रिल १९६७) एवढे एकच अभ्यास पुस्तक होते. हेही खरेच होते की व. दि. डॉक्टर नव्हते. पण तरी ते विद्यापीठाने मान्य केलेले कन्सल्टंट होते हे तरी लक्षात घ्यायचे की नाही. 'त्या अधिकारात ते डॉक्टर होण्याची मणिमहत्त्वाकांक्षा धरणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन घालत होते. (मुंबई विद्यापीठाची ती एक खासियत होती—आहे. वसंत बापट, म. वा. धोंड, ल. ग. जोग असे त्यातले मराठीचे बहुतेक प्रबंधमार्ग प्रदर्शक प्राध्यापक स्वत: प्रबंधित नाहीत. अर्थात हे सगळे आम्ही आपल्यातच चर्चतचिवडत राहिलो. तिकडे 'शांतचित्त' व. दि. केव्हाच कामाला लागले होते. त्यांच्यासारख्या ज्ञानयोग्याची अंत:शांती बाह्योपाधींनी ढळतढेपाळत नसते. प्राध्यापक प्रमुखपदी आलेल्या डॉ. मा. गो. देशमुखांना त्यांनी संपूर्ण सहकार्य दिले. मुंबई विद्यापीठातला मराठी विषयविभाग आपल्या विद्वत्तेजाने नुसता झळकूझळाळू लागला.

पण मा. गो. देशमुख थोड्या काळात मृत्यू पावले. व. दि. प्रभारी प्रमुख झाले. लौकरच ते अप्रभारी म्हणजे खरोखरी प्रमुख होतील असा आम्हाला विश्वास वाटत होता. पण कसचे काय नि कसचे काय, विश्वासाचा कृत्रिम पाय. वास्तविक कोरडी औपचारिक पात्रता सोडून व. दि. जवळ सगळे काही होते: लौकिक होता; व्यासंग होता; अनुभव होता; माझ्यासारख्यांच्या टपोऱ्या सदिच्छा होत्या; आडनाव होते; प्रमुखाला हवा तसा पोक्त चेहरापण होता! नावावर पुस्तके नव्हती; पण मुबलक लेख होते. ते एकत्र करून पुस्तके सहज प्रबंधता आली असती. प्रभारी प्रमुख म्हणून भिजत पडले असताना व. दि. आपल्या विखुरलेल्या विद्वत्तेची जमवाजमव करू लागले. इतक्यात मराठवाडा विद्यापीठ सोडून, आपल्या डोक्यावर हात फिरवत स्वस्थ बसणारे एकमेव वा. ल. कुलकर्णी मुंबईला देशमुखांच्या जागी प्रमुख प्राध्यापक झाले. व. दि. वर पुन्हा एकदा निळ्या आकाशीची कुऱ्हाड (Bolt from the blue) कोसळली. केवळ डझनभर पुस्तके जास्त आहेत, एका विद्यापीठाच्या प्रमुखपदाचा दीर्घकालीन अनुभव आहे; साहित्यसंमेलनाचे माजी अध्यक्ष आहेत, अक्षर वळणदार आहे, मुंबईला राहायची सोय आहे, एवढ्यासाठीच अप्रबंधित वा. ल. कुलकर्ण्यांना ती जागा देणे हा व. दि. वर घोरच नव्हे तर अघोरसुद्धा अन्याय होता. या अन्यायाचे व. दि. ना काहीच वाटले नसेल? बुशशर्टाखालचे त्यांचे विवेकी मन काय ठणकले नसेल? अहो, माझ्यासारखा सदासुखी सत्यंशिवंसुंदरं माणूससुद्धा अशा परिस्थितीत खालीवर चुळबुळला असता, यात काय ते समजा. पण व. दि. कुलकर्णी भरल्या घड्यासारखे शांतगंभीर आणि सेवाव्रत राहिले. त्यांनी आदळआपट, कुरकुर, धुसफुस, खिटपिट, झिटपिट काहीच केली नाही. हे निमित्त शोधून हातातले काम खाली ठेवले नाही. विद्यार्थी–लेकरांची आबाळ होऊ दिली नाही. एकूण शिकण्याशिकवण्याचा सततोद्योग थांबवला नाही. देशमुखांना दिले होते तसेच संपूर्ण सहकार्य वा. लं' नाही यांनी दिले.

आता वा. ल. कुलकर्णीसुद्धा अखेर (AT LAST) निवृत्त झाले आहेत. व. दि. च्या नावावर 'केशवसुतांचे अंतरंग' (१९७३) 'संगीत सौभद्र: घटना आणि स्वरूप' (१९७४), 'अर्वाचीन मराठी सारस्वतकार' (१९७५), 'साहित्य: रूप आणि गंध' (१९७६), अशी भलीमोठी, कापडी बांधणीची, भक्कम किमतीची, समीक्षाबंब पुस्तके (Treatises) गोळा झाली आहेत. त्यांनी संपादिलेल्या आणि प्रस्ताविलेल्या पुस्तकांची मोजदाद करणे अवघड आहे. उपरिनिर्दिष्ट पुस्तकांपैकी 'संगीत सौभद्र: घटना व आणि स्वरूप' या पुस्तकावर व. दि. ना मुंबई विद्यापीठाने सर्वश्रेष्ठ पदवी बहाल करून स्वतःचाच सन्मान करून घेतला. त्यामुळे आधी नुसते कन्सल्टंट असलेले व. दि. आता डॉक्टर झाले आहेत. 'संगीत सौभद्र: घटना आणि व स्वरूप' (व. दि. च्या या पुस्तकाच्या नावात 'आणि' आहे का 'व' आहे, हे मला नीटसे आठवत नाही. काहीही चालेल असे भोंगळभोटपणे म्हणणे मला अन्याय्य वाटते. कारण तुमच्या–माझ्या फुटकळ बोलण्यात 'आणि' आणि 'व,' अथवा 'आणि' व 'व' या दोन्ही शब्दांना एकच अर्थ असला तरी चिंतनशील समिक्षिक लिहिण्यात 'आणि' आणि 'व' या दोन शब्दांना वेगवेगळा अर्थ असू शकतो-असतो, असा माझा अनुभव आहे. डॉ. प्रा. व. दि. कुलकर्णी शब्दार्थाबद्दल किती जागरूक आहेत, याची तर या देशातच नव्हे, तर परदेशातसुद्धा आख्यायिका झाली आहे. एवढ्यासाठी व. दि. च्या त्या ग्रंथाचे नाव लिहिताना दोन्ही पर्याय मुद्दाम द्यायची सावधगिरी अनंतरावाने घेतली आहे. वाचकहो, एकवेळ हा तुमचा अनंतराव विसराळू असेल; पण तो अन्यायाळू कदापीही होणार नाही. असो मराठीतल्या 'आणि' आणि व 'व' या दोन शब्दांना इंग्रजी समीक्षेत अँड (and) हा एकच शब्द आहे. इंग्रजी भाषेची प्रातिशब्दिक क्षमता किती तुटपुंजी आहे, हे या एका उदाहरणावरून निखालसपणे सिद्ध व्हावे. केवढे उकडायला लागले हो. आमच्या समीक्षकांना त्यांच्या त्या बंदिस्त कोटात मुळी उकडत कसे नाही, (कुणास ठाऊक) हा व. दि. चा ग्रंथ म्हणजे मराठी समीक्षेच्या माळरानावरचा एक उत्तुंग स्तूप (A Tall Structure Called Stoop) आहे! बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'संगीत सौभद्र' या नाटकाबद्दल जे जे म्हणून काही कोणालाही जाणून घ्यायचे असेल आणि जाणून घ्यायचे नसेल त्या त्या सगळ्यांचा यथास्थित प्रबंध वसंत दिनकर ऊर्फ अण्णासाहेब कुलकर्ण्यांच्या 'संगीत सौभद्र: घटना व आणि स्वरूप' या बृहद्ग्रंथात केलेला आहे. व. दि. चे हे समीक्षाकार्य एवढे मोठे आणि ऐतिहासिक आहे की, यापुढे 'संगीत सौभद्र म्हटल्यावर किर्लोस्करांबरोबर कुलकर्ण्यांच्याही नावाचे सहज स्मरण मराठी माणसाला पिढ्यानपिढ्या होत राहणार आहे. 'सौभद्र' नाटकाचा 'किर्लोस्कर कुलकर्ण्यांचे 'सौभद्र,' असा उल्लेख आत्ताच आमचे मित्र करू लागले आहेत. हे सर्वथैव योग्य, उचित, आणि स्वाभाविक आहे. व. दि. चा हा ग्रंथप्रबंध म्हणजे 'सौभद्र नाटकावरचा शेवटचा शब्द (Last Word) आहे. शेवटच्या शब्दावरून आठवले: आपल्या या ग्रंथप्रबंधाच्या अखेरीस 'संगीत सौभद्र' नाटकाबद्दल व. दि. नी. जो अभिप्रायवजा



निष्कर्ष काढला आहे तो पाहिल्यावर कुलकर्णी-किर्लोस्कर यांची संयुक्त थोरवी ठळकपणे प्रत्ययाला येते. व. दि. म्हणतात. " अण्णासाहेब किर्लोस्करांचे ' संगीत सौभद्र ' हे नाटक म्हणजे, अतिप्राचीन आर्ष महाकाव्याच्या पाषाणखंडातील स्वयंभू 'सत्य'ला आणि 'शिवं'ला कालपुरुषाच्या आणि जातिवंत कलावंताच्या प्रतिभास्पर्शाने लाभलेले अभूतपूर्व सुंदर नाटचरूप होय ! " ( प्या. यतिवेषधारी अर्जुनाच्या त्रिदंडी कमंडलूतले थोडे पाणी प्या. प्या हो. )

असे हे आमचे एवंगुणाढच व. द. नुकतेच एका वर्तमानपत्री टीकेच्या गंगदारोळात त्यांची सोलकढी व हकीगत प्रिय वाचकांना सांगायची आहे. त्या हकीगतीतील नाटच आणि गांभीर्य किंवा घटना आणि व स्वरूप वाचकांना सम्यकपणे कळावे यासाठीच सुरूवातीला व. दि. च्या समर्पित कार्यकर्तृत्वाचा संक्षिप्त आढावा अनंतरावाने सादर केला आहे. म्हणजे हकीगत वाचताना ठिकठिकाणी आढाव्याचे स्मरण होईल; आणि अशा द्विकेंद्री दृश्यांतून ( Bi-focal scenes ) हे एकूण प्रकरण दर्शन तारतम्याने ( Perspective ) वाचकांना छान कळेल, (वरच्या वाक्यात दोन कंसात दोन इंग्रजी शब्द आहेत. कंसाच्या अलिकडे बाहेर असणारे मराठी शब्द हे त्या इंग्रजी शब्दांचे सुरेख प्रतिशब्द असून ते आमच्या व. दि. नीच खास घडवले आहेत. व. दि. च्या स्वतंत्र आणि संपादित अशा सर्वच पुस्तकांतून जागोजाग असे प्रतिशब्द वाचकांना आढळतील. उदा. हिरव्यागार–evergreen; चैतन्य–warmth; गुलाब वाटिका–rose-corner; विशुद्ध विनोदिका-pure light comedy व. दि. च्या अपूर्वप्रतिशब्द निर्माणक्षम प्रतिभेला माझा सलाम–Salute–असो. व. दि. वरच्या या स्फुटात, व. दि. चे सफशेल अनुकरण करत, आम्ही जे प्रतिशब्द मुद्दाममुद्दाम दिले आहेत, त्यातील इंगित आता प्रिय वाचकांच्या ध्यानात बरोबर येईल. असो.)

भारतीय संगीत, नृत्य आणि नाटच या विषयांचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकेतील काही प्राध्यापक भारतात आले होते. आता भारतीय नाटचाचा अभ्यास करायचा म्हणजे वैभवसंपन्न मराठी रंगभूमीची ओळख व्हायला हवीच. तीसुद्धा शक्य तर एका दिवसात. म्हणजे परिसंवाद मुंबई शहरात. असा परिसंवाद ' साहित्य संघा 'शिवाय कोण आयोजू शकणार ? म्हणजे जागा आणि यजमानसंस्था ठरल्या. आता परिसंवादी प्रवक्तेः परिसंवाद इंग्रजीत, तेव्हा विजया मेहता, ज्ञानेश्वर नाडकर्णी हे प्रवक्ते इंग्रजीच्या ओघानेच आले. पण ते नवनाटचाचा जमेल तितका जय बोलो करणारे आणि आपली जुनी, अभिजात रंगभूमी म्हणजे कित्ती कित्ती सांगू तुला या खानदानी योग्यतेची ही योग्यता इंग्रजीतून लिहू सांगू चर्चू शकणारा मुंबई शहरातला उपलब्ध आणि साहित्यसंघमान्यताप्राप्त एकमेव व्यासंगी व अनुभवी विद्वान म्हणजे मी श्रीयुत नव्हे मं. वि. राजाध्यक्ष त्यांना संघ यावेळी कसा विसरला ते एक दिविदेव जाणे. त्याचप्रमाणे, भाटवडेकरकुलोत्तनः मोरेश्वरसुनुः कृष्णचंद्र उपाख्य दाजीनाम्नः आंग्लभाषाभिषाभिज्ञाचीही आठवण संघाला झाली नाही. मग उरले व. दि. आणि फक्त एकटे व. दि. च. (one and only one व. दि. च.) त्यांचा मराठी रंगभूमीवद्दलचा व्यासंग सर्वविदित (किंवा सर्वदित) त्यांचे ते ' संगीत सौभद्र ' आणि ' संशय–कल्लोळ 'ची बासष्ट पानांची प्रदीर्घ प्रस्तवनाः व. दि. म्हणजे मराठी नाटचसृष्टीचे ब्रॅडलच ! शिवाय ' गॉसिप ग्रुप 'चे अध्यक्ष संस्थेच्या या इंग्रजी नावामुळेसुद्धा प्रस्तुत इंग्रजीतून चालणाऱ्या परिसंवादासाठी व. दि.च्या निवडीला बळकटी आली असावी, असा या अनंतरावांचा एक अस्फुट अंदाज आहे. एरवी सर्वसाधारण मराठी प्राध्यापकांचे व्हॉट आय वॉंट टुसे इज धिस दॅट आय मीन टु जातीचे रोमन लिपीतील देवनागरी इंग्रजी पुरेसे बदनाम झाले आहे. (मराठीच्या प्राध्यापकांना हे ठाऊक नसते ते सोडा असो.)

' मराठी थिएटर–व्हेअर हॅज इट बीन व्हेअर इज इट गोइंग ' अशा ग्रॅमरशुद्ध नावाच्या परिसंवादात व, दिनी ' क्लासिकल थिएटर इन मराठी ' या विषयावर फाडफाड इंग्रजीत पेपर वाचला. (१९ जुलै १९७६) मी लिहिलेल्या एका इंग्रजी पेपरातील मराठी–इंग्रजीचे एका जाणकाराकडून इंग्रजी इंग्रजीकरण करण्यात गुंतल्यामुळे मला या महत्त्वाच्या परिसंवादाला जाऊन जरूर ती शोभा पाहणे–आणणे जमू शकले नाही. त्यामुळे तो परिसंवाद नेहमीसारखा होऊन नेहमीसारखा विझून गेला असेल असे मी मानले. पण तसे व्हायचे नव्हते. एक ऑगस्टच्या मुहूर्तावर (' गीतारहस्य 'कार लो. टिळक पुण्यतिथी आणि ' अलबेला ' कार मा. भगवान जयंती) ' लोकसत्ते च्या अंकात यशवंत राजकारण नामे एका पत्रकाराने (Journalist) ' विद्वानांनो, विदेशी पाहुण्या पुढे तरी जरा जपून...' असा नाटचपूर्ण शीर्षकाचा लेख लिहून व. दि. आणि तत्सम विद्वानांना टाहोफोड इशारा दिला आहे. व. दि. च्या पेपराबद्दल राजणकरांनी जो सारभूत अभिप्राय व्यक्त केला आहे तो असा. आम्ही व. दि. बद्दल जे काही ऐकले होते त्याचे काहीच प्रत्यंतर या पेपरात आमच्या अनुभवास आले नाही. भोंगळ, तोल नसलेला, चुकीच्या आणि संदिग्ध विधानांनी भरलेला, आवश्यक त्या माहितीचा पूर्ण अभाव आणि अज्ञान प्रकट करणारा, नको त्या अथवा गैर लागू माहितीची खोगीर भरती करणारा, असेच या पेपराचे थोडक्यात वर्णन करता येईल. हे ' थोडक्यात वर्णन ' बरे ! आम्हाला तर ते पुरेसे विस्तृत वाटते. पण ज्यांना तसे वाटत नसेल त्यांनी विस्तृत वर्णनासाठी यशवंत राजणकरांचा पेपर मुळातूनच वाचावा असे आम्ही सुचवतो. त्यात राजणकरांनी त्यांचे तथाकथित पुरावे सादर केले आहेत. अनंतरावाचे मत विचाराल तर व. दि. च्या पेपराचे जे थोडक्यात वर्णन राजणकरांनी केले आहे तेच राजणकरांच्या पेपराचे करावे लागेल. आणि त्यात नवल नि आश्चर्य ते कसले ? कारण राजणकर तरी काय, मराठी विषयाचे एम्. ए. असून वर काही वर्षे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या मध्यवर्ती सांदर्भिक वाचनालयाचे ( reference library ) ग्रंथपालही होते.

असो. असो. असो. असो. असो. असो. असो. ( Let it be. Let it be. Let it be. Let it be. Let it be. Let be it, Let it be: )

व. दि. च्या उभ्या आणि आडव्या ( Vertical and horizontal standing and not-standing) सामिक्षिक कारकीर्दीत असे वादळ अजूनपर्यंत झाले नसेल. पण त्यामुळे व. दि. च्या केसांच्या सुवक अपूर्णगोल बटा विस्कटतील आण वदिलशाहीतल्या आमच्यासारख्या सुबुद्ध प्रजाजनांची वदिलकी ( बांधिलकीच्या चालीवर ) इकडे तिकडे होईल, अशा भ्रमात यशवंत राजणकरांनी, ते पत्रकार असले तरी, राहू नये. व. दिंनी शिलगावलेली ढणढणबत्ती कितीही वाद वादळे घोंघावली तरी, चंद्र सूर्याच्या (The Moon and The Sun) बरोबरीने, मराठी साहित्याच्या अभ्यासकांना प्रकाश देत राहील.

–अनंतराव

## तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या एका जगन्मान्य भारतीय कामसूत्रकाराच्या जीवनावर आधारलेली एक ललितरम्य कादंबरी ( भाग ७ )

# वा त्स्या य न

## दि. बा. मोकाशी

### । मोह ।

त्या रात्रीसारखी रात्र पूर्वायुष्यात वात्स्यायनाने कधी अनुभवली नव्हती. अनुभवली असली, तर तो ती विसरला होता. कामज्वराची तगमग प्रत्येक वेळेला नवी असते.

रात्री त्याला दिलेल्या खोलीत, मऊ स्वच्छ शैय्येवर पडल्यावर आणि दिवा मालवल्यावर दाराच्या अंधाऱ्या चौकटीतून बाहेर पाहत असता दासीचा पदरव आपल्या खोलीकडे येतोय असे वाटून त्याची छाती धडधडली होती. त्याला कळत होते की, आपल्याला वाटते आहे तसे काही नाही. ती, निजानिज होण्यापूर्वीची घरकामे उरकीत आहे. पण प्रत्येकवेळी त्याच्या खोलीवरून ती जात येत असता त्याचे अंग उष्ण होत होते. चालताना तिच्या कमरेच्या तांब्याच्या साखळीचा कणकण आवाज येत होता. ती मद्य ओतायला वाकली असता तिच्या विस्तृत कटिबंधावर विसावलेली त्यानं ती पाहिली होती. तिचा चकचकितपणा तिच्या डोळचाइतकाच त्याच्या दृष्टीत भरला होता. तिने एकदाच त्याच्या डोळचात पाहिले होते. त्यातले आवाहन भेदून गेले होते.

अंधारात त्यावेळची तिची आकृती त्याला पुन्हा दिसू लागली. पुन्हा पुन्हा आठवावीशी वाटू लागली. अग्निवर फुंकार घालून तो अधिक चेतवावा तशी आपण आपली कामभावना चेतवीत आहोत, हे त्याला कळत होते. पण मन ऐकत नव्हते. मद्य ओतताना जवळ आलेले तिचे गाल आणि स्तन ! त्या स्तनांवरची लालसर काळी वर्तुळे. ती कुंभदासी असेल व थोडचाशा धनाने वश होईल, त्याला वाटलं.

हे ठीक नाही. कामशास्त्राच्या चर्चेनं आपण कामोत्तेजित व्हावे ! अनेकदा कामशास्त्र वाचलेले आपण ? खरं म्हणजे आपणच दुसऱ्यांना शास्त्र सांगितले पाहिजे. उदाहरणार्थ अंगरिक्ष-वासंतिकेला. विवाह झाल्यावर वधूवरांनी कसे कामोपचार करावेत हे सांगायला त्यांना कोण आहे ? दोघे भेटलेच तर त्यांना आपण ते सांगू. विवाहानंतर जोडप्यानं आचरावयाचे, सर्व वर्णांना समान असलेले, शास्त्रांत सांगितलेले विधी सांगू. विवाहोत्तर तीन रात्री भूमीवर शयन करावे. क्षार लवण गाळून आहार करावा. सप्ताहपर्यंत मंगलवाद्ये व गायन यासह स्नान करावे. आप्तेष्ट व नट यांचे दर्शन घ्यावे व त्यांचा मानसन्मान करावा.

पण प्रवासात हे त्यांना कसे करता येईल ? तिथे परक्या गावी, अरण्यात कुठली मंगलवाद्ये, कुठले गायन, कुठले आप्तेष्ट ? त्यांना झोपायला चार भिंती मिळाल्या तरी पुष्कळ. कामशास्त्रात सांगितलेले करायला त्यांना साधने कुठली आणि वेळही कुठला ? कामशास्त्र ज्या नागरिकांसाठी, त्यांतली ती दोघे राहिली नाहीत. अंगरिक्षाला दुसऱ्या काही गोष्टी सांगता येतील. तो भेटला तर त्याला आपण सांगू, स्त्रिया फुलासारख्या नाजुक असल्यानं त्यांच्याशी कोणताही व्यवहार सौम्यतेनंच करावा. तिचा विश्वास संपादन करणे हे मुख्य. विश्वास संपादन न केलेल्या पुरुषानं जर बलात्कार करण्याचे ठरवले तर स्त्री त्या पुरुषाशी संभोग करण्याचा कंटाळा करते. त्याचप्रमाणे आपल्या नववधूची जो पुरुष अति लाजरी म्हणून उपेक्षा करतो तो स्त्रीचे मन न समजल्याने धिःक्कार पावतो. या उलट आपल्या नववधूचे मन जाणून जो तिचे प्रेम संपादन करतो त्यावर ती अनुरक्त होऊन त्याची मनोभावे सेवा करते. आपण त्याला सांगू. जिला नवऱ्याचे प्रेम मिळत नाही ती नववधू उद्वेगाने भरते, आणि मग नवऱ्याचा द्वेष करू लागते किंवा परपुरुषाकडून फसवली जाते. आपण त्याला सांगू की, पहिल्या तीन रात्री आपल्या नववधूला पुरुषानं हळूहळू कामकला शिकवावी. त्याचवेळी आपले तिच्यावरचे प्रेमही सांगावे आणि ' आयुष्यभर आपण तुझे ऐकू आणि तुला सवत आणणार नाही ' असे अनेक तऱ्हेनं गोड बोलून तिचा विश्वास संपादन करावा.

बाहेर भांडे वाजले आणि अंगरिक्षाच्या विचारांतून वात्स्यायन बाहेर आला. मग दासी दाराबाहेरून जात असता त्याला वाटले तिने आपले लक्ष वेधण्यास बुध्या भांडे वाजवले का ? जाताना दाराशी ती किंचित थबकली का ? पुढे जाऊन अंधारातून आपणाकडे पाहत उभी आहे का ? ती कुंभदासी असेल तर सोमल झोपताच ती येईल. निजानिज होण्याची वाट पाहत ती कामे लांबवीत आहे का ? दारातून पाण्याचे थेंब आले ! तिने मुद्दाम उडवले का ?

त्याचे अंग आणखी उष्ण झाले. अपेक्षेने अवयव स्थिरावले. उंबऱ्याशी पावले वाजली. सावली हलली. आंत पावले आली ! कान तीक्ष्ण करून, तो कुशीवर दाराकडे टक लावून पडला होता. दचकून तो अंथरुणावर उठून बसला. पावले आंतआंत येताहेत !

आणि झपाटयासरशी त्याच्या मांडीवर तिच्या नितंबांचा भार कलला आणि दुसऱ्या क्षणाला तिच्या हातांचा आलिंगनाचा विळखा त्याच्या मानेभोवती पडला. घोगरट आवाजात ती म्हणत होती,

" महाराज ! दहा कार्षापणांनी ही दासी आपली करता येईल."

ज्या ओठांचे त्याला चुंबन घ्यावेसे वाटले आणि ज्या स्तनांना स्पर्श करावासा वाटला ते जवळ येऊनही वात्स्यायनाने तिचे आलिंगन झटक्यानं तोडले आणि तिला आपल्या मांडीवरून दूर लोटले. तिला तो धक्का अनपेक्षीत होता. त्या धक्क्यानं ती कोलमडून उपडी पडली. आणि मग कशीतरी हाता ढोपरावर रांगत ती दाराकडे गेली. दाराच्या आधारानं उभी राहिली आणि भीतीने बाहेर पळाली.

ती जाताच वात्स्यायनाची गात्रं शिथील पडली. अंगावरून वाहणारा घाम त्याने उत्तरियाला पुसला. तो अंथरूणावर आडवा झाला. तो संतापला होता. तिने द्रव्य मागायला नको होते. त्याचा आपल्याला संताप आला. तिला न मागता ते मिळाले असते. मूर्ख !

थोड्या वेळातच त्याचा संताप ओसरला. संताप खोटाच. तो तिच्यावर नव्हता. तो आपल्या स्वतःचा होता ! खरे म्हणजे–आपण भ्यालो, त्याचा होता. ती कुंभदासी आहे हे जाणलेच होते. इथे या घरी येणारा अतिथी स्वतःच्या गावापासून फार काल दूर असल्याने तिला वश होत आला असला पाहिजे. तिला हे नित्याचे असेल. सारे ठाऊक होते आपल्याला. आपला संताप नव्हता. भीती होती. अशी कामतृप्ती करून घ्यायला आपण भ्यालो. कामतृप्ती अशी करून घेऊ लागले की त्याला अंत राहात नाही. महेश्वरदत्त हे कसे होते ते नीट सांगेल. बायको माहेरी गेल्यावर आनंदिका जेव्हा पदाघातं करीत आली तेव्हाही आपण भ्यालो होतो.

त्याला ‘ भ्यालो ’ म्हणायचे का ? ही सगळी गुंतागुंत आहे. प्रत्येक पुरुष प्रत्येक स्त्रीला, आणि प्रत्येक स्त्री प्रत्येक पुरुषाला भोगण्यासाठीच आहे. हे शास्त्र झाले. पण जेव्हा श्वेतकेतूची आई परक्याचा हात धरून दिवसाढवळ्या त्याच्या बापाला सोडून गेली तेव्हा श्वेतकेतूचा दुःख संताप झाला व त्याने स्त्रीने आपल्या पुरुषाला सोडू नये असा नियम केला. प्रथम कोणतेही स्त्रीपुरुष परस्परांना भोग्य असतात. पुढे समाजकल्याणासाठी स्वतःच्या संततीशी भोग त्याज्य ठरला. नंतर भाऊबहिणीतला कामोपभोग त्याज ठरला. नंतर नसेल. हे आधी झालं असेल. यमानं यमीशी ( बहिणीशी ) कामोपभोग झिडकारला त्यानंतर असेल. पण पूर्वाचार्यांनी धर्म आणि अर्थ हे पुरुषार्थ काढले. आता त्यांत काम पुरुषार्थ घालायची वेळ आली. ब्रह्मदत्त काही म्हणो काम हा पुरुषार्थच. कामाने सर्वांना व्यापले आहे. आई परपुरुषाबरोबर निघून गेल्यामुळे श्वेतकेतूने धर्मशास्त्रांचा पाया घातला. असा कुणावर काहीतरी प्रसंग येतो नि शास्त्रारंभ होतो. आपल्यावर हा प्रसंग आला आणि आपणास धर्म अर्थ काम सुचले.

फार गुंतागुंत आहे ही. नीट विचार केला पाहिजे. एक यात्रिक आपल्या पत्नीपासून दीर्घकाळ दूर आहे. विरहाने तो कष्टी आहे. या विरहात कामज्वराचा भाग अधिक आहे हे त्याला कळत नाही. एका यजमानाच्या घरी एका दासीला तो पहातो. त्याचा कामाग्नी प्रज्वलीत होतो. रात्री ती दासी त्यांच्या मांडीवर येऊन बसते व भोग मागते. तो तिला झिडकारतो. बस् ! एवढीच घटना. झिडकारताना त्याने कोणता विचार केला. तिने दहा कार्षापण मागितले म्हणून ? ते देणं कठिण नव्हतं. पण मग प्रत्येक नगरीत अशा दासींचा मोह पडला असता. आणि तेवढे द्रव्य त्याच्याजवळ नव्हते. हा विचार त्यानं केला ? किंवा प्रत्येक नगरीत अशा दासीचा शोध घेण्यातच कालापव्यय होऊन हातातले काम राहील हा विचार केला ? त्याने पूर्वापूर्व विचार केला. धर्म अर्थ काम यांत जर धर्मनाश होत असेल, अर्थनाश होत असेल तर काम सोडावा. अर्थ काम हे दोन्ही त्यजावे. छान कल्पना.

वात्स्यायन स्वतःशी हसला. समजा तिला दूर न लोटता त्या यात्रिकाने जवळ केली असती. यांत्रिक म्हणाला असता, ‘ शास्त्रांत असे सांगितलाय की, जर कुणाचा प्राण जात असेल तर त्याची तृप्ती करण्यात दोष नाही. ’ आपण कामाकुल होतो किंवा दासीनें दहा कार्षापण मागितले हे तो विसरेल. सोयीनं विसरेल. शेवटी माणूस सुखावर येतो. आपल्या सुखाचे करतो. अर्थात केव्हा केव्हा सुखाची कल्पना चुकते. आपण धरू की आपली चुकली नाही.

उशिरापर्यंत वात्सासन जागा होता. विचारांनी आपण स्वतःला त्रास करून घेत आहोत हे त्याला कळत होते. कामवेग वाढल्यावर स्त्रीला पुरुषाने केलेल्या वेदनाही प्रिय वाटतात, तसे आपले झाले आहे. थोडासा डोळा लागून तो पहाटेचा जागा झाल्यावर पहाटेचा अंधुक प्रकाश त्याला अधिकच त्रास देऊ लागला. सोमलास, दासीच्या असल्या कर्तुत्वाची कल्पना असेल. मनात तो हसत असेल. आणि आपण त्याला झालेला प्रकार सांगितला तर तो आणखी हसेल. एखाद्या घरी अतिथी म्हणून रहावे आणि तेथील सेवकाने आपले द्रव्य चोरावे व त्याबद्दल यजमानांशी बोलता येऊ नये त्याहूनही हा प्रकार वाईट झाला आहे. आता आपल्याला त्या दासीचे दर्शन असह्य होणारच. सोमलाचेही.

आज सोमलाचे घर सोडलेच पाहिजे. त्याच्या मनाने घेतले. हे घर सोडायला हवे. आपले काम सोडून इथे आपण भलत्याच गोंधळात सापडलो. पाटलिपुत्र सोडायला हवे आणि नगर गाठले पाहिजे. फक्त एक रात्र पत्नीशी मिळाली पाहिजे. एक रात्र मिळाली तरी पुरे. एक रात्र पुष्कळ. दोघे आता सापडली नाहीत तर नंतर वर्षभर त्यांचा शोध घेऊ, मात्र जी एक रात्र आपण म्हणतो ती रात्र अंगरिक्ष सापडला नाही म्हणून पत्नीने शोक करण्यात घालविता कामा नये. युद्ध असतानाच सुट्टीवर सैनिक घरी येतो तसे तिने मानले पाहिजे. पुन्हा लढाई आहे. पण जयापजय ठाऊक नाही. पुन्हा शोधायला जायचे आहे.

रात्रीच्या प्रसंगानंतर वात्स्ययानाचा प्रत्येक अणु पाटिलपुत्र सोडायला मागू लागला त्याच्या मनात आले, तो वेसाअधिकारी दोन दिवस म्हणाला पण आठ दिवस घेईल. ज्या पद्धतीने कामे करतो त्यापद्धतीने त्याने वर्ष घेतले तरी नवल नाही. त्याने निश्चय केला आपणच काहीतरी करायला हवे.

तगमगत या कुशीवरून त्या कुशीवर होत असता वात्स्यायनाला, महेश्वरदत्ताने ज्या सेनापतीला गणिकेचा लाभ करून दिला त्या कर्णीपुत्राचे नाव आठवले. महेश्वरदत्तांची ओळख सांगताच तो निश्चयाने काहीतरी करील. स्नान वगैरे आटोपून त्याच्याकडे जाऊ. मग, प्रातःकालची कर्मे उरकून सोमलाचा निरोप घेताना वात्स्यायनाला जड गेले. या परक्या शहरात त्याने आपल्यासाठी पुष्कळ केले, निरोपाचे वेळी सोमलाने मिठी मारली आणि त्याच्या डोळ्यांत पाणी आले. त्याची दासी दाराआडून लपून पाहत होती का ? सेनापतीचे नाव वात्स्यायमाने सांगितले तेव्हा सोमलाने फारसे आढेवेढे

घेतले नाहीत. मात्र इथे राहूनच मेव्हण्याला शोधायचे कार्य करावे, असा वारंवार आग्रह केला. त्याचे प्रेम पाहून वात्स्यायनाचाही उर भरून आला. आणि शोध संपल्यावर त्यांच्या गोष्ठी समवायांत भाग घेण्यास येण्याचे त्याने सोमलाला पुन्हा पुन्हा वचन दिले.

सोमलाने सांगितलेल्या मार्गाने गेल्यावर काही वेळातच तो सेनापती कर्णीपुत्राच्या प्रचंड वाड्याशी येऊन पोहोचला. द्वारपालाच्या सांगण्यावरून सेनापती महाराजांची रात्रीची निद्रा अजून दोन घटिका तरी संपणार नव्हती. एका अतिथीसाठी महाराजांना उठवण्याचे धैर्य त्याला नव्हते.'

देवडीवरच आपल्या पडशीला टेकून वात्स्यायन पडून राहिला. देवडीचे मोठमोठाले कोरीव खांब तेलपाण्याने काकवीसारखे चकाकत होते. वात्स्यायन ज्या खांबाला टेकला होता त्यावर एका परिघात युद्धाचे प्रसंग तर त्यावरच्या परिघात नाना आविर्भावातील तरुणींच्या आकृती कोरलेल्या होत्या. महाराजांना दोनच विषय प्रिय दिसतात. एक खड्ग व दुसरा स्त्री-शरीरे. विनोदाने वात्स्यायनाच्या मनात आलं–दोन्ही युद्धेच. स्त्रीचा विषय किती विविध तऱ्हेने पुरुषांच्या मनात असतो! ज्या कुशल मूर्तिकाराने हे खांब कोरले असतील, त्याला स्त्री ही कोरण्याला योग्य अशाच आविर्भावातून दिसली. पातळ कमरेची, पुष्ट स्तन आणि पुष्ट नितंबाची. डोळे हरिणासारखे. चित्राकृती प्रत्यक्ष देहरूप नसल्याकारणाने त्या ठिकाणी मनोविकारापेक्षा सौंदर्यानुभूतीचीच जास्त अपेक्षा असते. म्हणून चित्रकाराला स्त्री सौंदर्यरूप असते. ब्रह्मदत्ताला स्त्री धर्मरूप वाटते. समाजधारणेला आवश्यक एवढेच तिचे रूप त्याला दिसते. तिला कामेच्छा असते हे तरी तो मानतो की नाही कुणास ठाऊक? चंद्रागाला स्त्री ही केवळ भोगरूप दिसते. स्त्रीला केवळ देह असतो. आणि पुरुषाने त्यापासून जेवढ्या तऱ्हांनी घेता येईल तेवढ्या तऱ्हांनी सुख घ्यायचे असते. सोमलाला आणि सारंगपाणीला स्त्री ही ग्रंथरूप आहे. तो बाभ्रव्यामधून स्त्रीला जाणण्याचा यत्न करतो. तर वेदकालापासून अनेकांनी तिला पूज्य मानली आहे. ती निर्माणकर्ती असल्याने सृष्टीकर्त्यासारखी ती अनेकांना देवतारूप वाटते. स्त्री योनीत त्यांना सृष्टीचे गूढ दिसते. काहींना स्त्री भयरूप वाटते. ती मोहाचे मोहोळ, नरकाचा मार्ग वाटते. काही स्त्री अगम्य मानतात.

आपल्याला विचारले तर आपण काय सांगू? स्त्री ही कामरूप आहे हे निश्चितच. पण पुरुषही कामरूप असतो. पुरुष अर्थरूप आणि धर्मरूप असतो. पण गणिका, वेश्या, दासी आणि विणकामावरच्या स्त्रिया याही अर्थप्राप्ती करताना दिसतात. तेव्हा पुरुषाप्रमाणे स्त्रीही अर्थरूप मानायला हवी आणि धर्मरूपही. कारण स्त्रीसुद्धा अर्थाचे पालन करीत असते. स्त्री ही निराळी आहे ही भावना पुरुषी आहे. जसे दोघांचे संभोगसुख एकच आहे तसेच स्त्रीरूप निराळे मानण्याचे कारण नाही. ते परस्परांना निराळे वाटते इतकेच. ◘

# अनेक स्त्रियांचा नवरा

तत्क्षणात वाड्याच्या आतून आलेल्या ओरड्याने वात्स्यायन तंद्रीतून बाहेर आला. सगळे सूर स्त्रियांचे होते. जेवढे कर्कश बोलता येईल तेवढे त्या बोलत होत्या. त्यांतून एकीचे ओरडणे मोठे होत आले आणि वात्स्यायनाला दिसत होता त्या चौकाच्या आतल्या दरवाजाने ओरडत ती चौकात आली. तिचे केस मोकळे होते. तिच्यामागे दुसरी स्त्री होती व तिने ते केशकलाप घट्ट धरले होते. चौकात येताच मागच्या स्त्रीने क्षणात पुढचीला खाली पाडले आणि दोघीत युद्ध सुरू झाले.

द्वारपालाने झटकन उठून दार लावून घेतले. परत येऊन तो वात्स्यायनाला म्हणाला,

'आराम करा! लक्ष देऊ नका. हा प्रकार दिवसातून दोन-तीन वेळा घडतो. या सर्व सेनापती कर्णीपुत्राच्या स्त्रिया आहेत. तुम्ही फार सुखी आहात. अर्थात तुम्हाला एकच बायको आहे असे मी समजतो. दोन असल्या तरी वाईटच. हे युद्ध थांबले नाही, तर सेनापतीमहाराज कोपाविष्ट होऊन चामड्याचा प्रतोद घेऊन खाली येतील आणि एकेकीला बडवीत त्यांच्या त्यांच्या खोल्यांत डांबतील. तीन दिवस त्यांना अन्न देणार नाहीत आणि महिनाभर संग देणार नाहीत. महिन्याच्या आतच त्या क्षमा भाकीत पायाशी येतील. कारण स्त्रियांचा काम हा पुरुषांच्या दसपट असतो.'

वात्स्यायनाला त्याच्या बोलण्याचे हसू आले. पूर्वाचार्य तेच म्हणतात. सगळे तेच म्हणत आले आहेत. वात्स्यायनाने बंद दाराकडे पाहिले. द्वारपाल म्हणाला,

'बाबा! तिकडे दृष्टीसुद्धा टाकू नको. या द्वारावर मी काळ्याचा पांढरा झालो. इथे पाठ फिरवून बसावे. कान बंद. तुला महाराजांना भेटलेच पाहिजे? नसेल तर चालू लाग. उज्जयनीहून ती बया आणल्यापासून तर कहर झालाय. युद्ध थांबले वाटतं? बहुधा परका पुरुष द्वारावर आल्याची वार्ता पसरली असावी. आता फटीफटींतून वीस डोळे तुला पाहतील. द्वारापासून मी हलावे म्हणून खोटे निरोप येतील. दासी आत बाहेर करू लागतील. लक्ष देऊ नकोस. तुझ्या कानात निरोप कुजबुजतील. आत जाण्यास किती गुप्त मार्ग आहेत मलासुद्धा ठाऊक नाही. तू बसला आहेस त्या जागेखाली विवर असेल. बोलता बोलता क्षणात तू पृथ्वीत गडप होशील. मग तुझे काय होईल परमेश्वर जाणे.'

नकळत वात्स्यायन दचकून सरकला.

'दचकू नको. इथे विवर नाही. रोज एकदा मी सगळी जमीन ठोकून पाहतो. पण केव्हा तरी ते होणार. अवंतीला वेढा घालता येईल, एवढी माणसे या स्त्रियांवर राखण करायला आहेत. कंजुष जसा धन न उपभोगता धनावर बसतो तसे इथले सामंत, प्रधान, सेनापती आपापल्या अंतःपुरावर बसले आहेत. किती बलाढ्य पुरुष असला तरी, एवढ्या स्त्रियांना सुख देईल काय? कुणीतरी अंतःपुरातील स्त्रियांना कसे शांत ठेवावे, याविषयी ग्रंथ लिहिला पाहिजे. अंतःपुरात अनुशासन हवे. अंतःपुरात सैनिक राखण ठेवून काही उपयोग नाही. चेंडू जसा आपटताच तितक्याच जोराने वर उफाळतो तसा अंतःपुरातील स्त्रियांचा काम जेवढा दाबाल तेवढा उफाळून येतो. आणि मग तुझ्यासारखे त्याला बळी पडतात. अत्यंत धैर्यवान पुरुषानेही सामंत, सेनापती, राजे यांच्या अंतःगृहात जाऊ नये. पण जाऊ नये म्हणून कुणी ऐकत नाही. राजाच्या घरातील स्त्रियांचा मोह पडतोच आणि ते जीव गमावून बसतात. मी जर तुझ्यावरची दृष्टी किंचितकाल दूर केली, तर तूही त्या दारातून आत उडी घेशील.'

एक दीर्घ श्वास सोडून तो म्हणाला,

'अरे, मी तृतीय पुरुषी आहे हे किती सुख आहे ! मला दोघांचे दुःख कळते. समज, तुझा विवाह झाला, खूप धनही तू मिळवले आहेस. तू मेलास. तुझी स्त्री काय करील तुला काय ठाऊक ? ती दुसरा विवाह करील. परपुरुष घेईल किंवा वेश्येपण करील. तुझे धन चोरापोरी जाईल. आता समज, तू स्त्री आहेस, तू मेलास, तर तुझा पती काय करील ? तो वेशेत वेश्यांकडे जाईल किंवा दुसरा विवाह करील. किंवा कुणाचा जार होऊन राहील. आणि मी मेलो तर काय होईल ? काही नाही. मी मरेन. संपलं. तृतीय पुरुषी माणसांनी जग भरले, तर जास्त सुख होईल आणि दुःख कमी कमी होत, शेवटी दुःख करायला पृथ्वीतलावर कुणी उरणार नाही. तुझे नाव काय ? तू मला फारच आवडला आहेस. लक्षात ठेव, वाडयात शिरशील तेव्हा नाकासमोर पाहत आत जा.'

बोलता बोलता झटकन उठून तो दिंडीशी गेला. त्याने हिसक्या-सरशी दार उघडले. हसण्या-किंचाळण्याचे ध्वनी आतून आले. तो ओरडला,

'रांडलेकींनो ! पळा आत. डोकावून काय पाहता ? काही लाजा तुम्हाला !'

मग दार ओढून परत येऊन म्हणाला,

'तू इथं नवा दिसतोस. तुला हवं असल्यास रात्री या कट्टयावर झोप. इथे ऊब आहे आणि मऊ गादी आहे.'

दोन घटिकांनंतर वात्स्यायनाचा सेनापती कर्णीपुत्राच्या शयन-गृहात प्रवेश झाला. अस्ताव्यस्त पसरलेल्या मौल्यवान वस्तूंचे ते भांडारच होते. खुंट्यांवरून, कोनाडयांतून उंची वस्त्रांचे बोळे होते. पलंगाच्या कठडयांवर मोत्यांचे व सोन्याचे हार लोंबत होते. भिंतीं-वर नाना आकाराची, धनुष्यबाण, भाले, गदा, इत्यादी शस्त्रे टांगली होती. महेश्वरदत्ताचे नाव वात्स्यायनाच्या तोंडून निघताच कर्णी-पुत्राने त्याला आलिंगन देऊन मिठीच मारली. मग अत्यंत आदराने वात्स्यायनाला चौरंगावर, शेजारी बसवून त्याला मद्याचा चषक दिला. तो सोन्याचा होता. मग तो म्हणाला,

'महेश्वरदत्तानं पृथ्वीवरील अलभ्य असे रत्न मला मिळवून दिले. मी त्याचा जन्मोजन्मीचा ऋणी आहे. त्याचा मित्र तो माझा मित्र. तेव्हा मित्र ! मला परका मानू नका ही विनंती. महेश्वरदत्तानं मला रत्न दिले पण त्याचा भोग मला या गाढवी घेऊ देत नाहीत. ऐकलात ना त्यांचा गोंधळ ! युद्धातून मला राजाकडून मिळणाऱ्या संपत्तीचा चवथा भाग या मूर्ख स्त्रियांची शरीरे पोसण्यास जातो. सत्य सांगायचे तर, मी फार चिंतेत आहे.'

इतक्यात खालून भांडणाचा ओरडा ऐकू आला. संतप्त होऊन सेनापती कर्णीपुत्र उठला. भिंतीवरचा चाबूक काढीत म्हणाला,

'ऐका ! माझे स्त्रीसुख विकट हास्य करीत आहे.'

पाय आपटीत गच्चीत जाऊन त्याने गर्जना करीत चाबूक फडकाविला. ओरडा थांबताच परत येऊन तो म्हणाला,

'यातील एकही स्त्री मी जबरीने अंतःपुरात आणलेली नाही. इथले राजपुत्र आपल्याला आवडलेल्या स्त्रीच्या पतीला बंदी करून तिला अंतःपुरात ओढून आणतात. हे राजपुत्र भ्याड आहेत. माझ्या पराक्रमाचा मोह पडून माझी प्रत्येक स्त्री माझ्यामागे आली आहे. यांना मी विलासात ठेवूनही मला त्या क्षणभर सुख लागू देत नाहीत. त्यांना मी आसुडाने मारले तरी, त्या सोडून जात नाहीत. यांना परदेशांत नेऊन दासी म्हणून विकता आले तर ?'

त्याने एक दीर्घ श्वास सोडला. मग जरा स्वच्छ राहून तो म्हणाला,

'असो. माझेच दुःख मी सांगत बसलो. आपले काम काय आहे बोला !'

¤

# पक्षी उडाले

आपला मेहुणा अंतरिक्ष आणि वासंतिका यांच्या प्रेमाची आणि पळून जाण्याची कथा सांगून वात्स्यायनाने, दोघांना शोधण्या-साठी आपण आलो आहोत असे सांगताच कर्णीपुत्राने मूठ पलंगावर आपटून थरथरवीत म्हटले,

'वात्स्यायन ! प्रेमिकांचे मन हा कर्णीपुत्र जाणतो. जर पाटलि-पुत्रात तुमचा मेहुणा आला असेल, तर येथील प्रत्येक घर, तळघर, राजवाडे आणि पर्णकुटी खोदून त्याचा ठिकाणा काढून देतो. महेश्वर-दत्ताचे तुम्ही मित्र आणि गुरुबंधू आहात. तेव्हा हे कार्य मी माझेच मानतो. या पाटलीपुत्रात माझ्यापासून कुणाला काही लपवून ठेवता येणार नाही.'

वात्स्यायनाला वाटले, आपले काम तात्काळ हाती घेण्याची त्याची तत्परता महेश्वरदत्तामुळे आहे, त्याहूनही आपल्या स्त्रियांच्या कटकटीतून या निमित्ताने बाहेर पडून विरंगुळा लाभेल यासाठी आहे. बोलता बोलता कर्णीपुत्र उभा राहिला आणि त्याची विलक्षण उंची व भीमकाय देह पाहून, या देहाला सतत कार्यान्वित ठेवले नाही तर काय होईल, असा विचार वात्स्यायनाच्या मनात आला. सेवकाला हाका मारीत असता त्याच्या प्रचंड देहाचे आणखीच भान जाणवू लागले. त्याला वाटले, काम हा मनाचा आहे तसा देहाचाही आहे. कोमलांगी स्त्रीचा हा नाश करील आणि नेमक्या याला कोम-लांगी स्त्रियाच प्रिय असतील. आपणच आपल्यावर दुःख ओढवून घेऊन हा कष्टी होत असेल. कामशास्त्र वाचण्याची याच माणसाला आवश्यकता आहे. संभोगसुखाला दोन्ही देहांची अनुकूलता लागते. याने बाभ्रव्य वाचला, तर हस्तिनी वगैरे स्त्रीदेहाचे प्रकार कळतील. ते कळून याने निवड केली, तर हा सुखी होईल. 'तू कामसूत्रे लिहिणार' तो विनोदाने स्वतःला म्हणाला,

आलेल्या सेवकाला कर्णीपुत्र म्हणत होता,

'माझी यावनी वस्त्रे काढ.'

मग सेवकाने वस्त्रांच्या राशीतून ती वस्त्रे हाती दिल्यावर कर्णी-पुत्र सेवकाला म्हणाला,

'पिडीतकाला असेल तसा घेऊन ये.'

सेवक जाताच वस्त्रे अंगावर चढवीत कर्णीपुत्र म्हणाला,

'ही यावनी वस्त्रे वायव्येत यवनांचे ताडण करून मी आणली. ही मी घालू लागल्यापासून काही अमात्यपुत्र आणि राजपुत्रही तसली घालून मिरवू लागले आहेत. कारण यवनांवरचा विजय दाखविणारी ही वस्त्रे पाटलिपुत्रातील स्त्रियांत अतिशय प्रिय झाली

आहेत. जे स्त्रियांना प्रिय वाटते ते अमात्यपुत्रांना करून मिरवावेसे वाटते. पाटलिपुत्राची सीमाही यांनी कधी ओलांडली नाही. वायव्येकडे पाहून यांनी कधी नमस्कारही केला नसेल. वस्त्रे घालून स्त्रिया वश होतात असे त्यांना वाटते.'

आपली विशाल छाती फुगवून तो म्हणाला,

'मी सांगतो, पराक्रमी पुरुष सोडून स्त्रिया कुणाच्याही मागे जात नाहीत. मी माझ्या विजयी सेनेसह पाटलिपुत्रात प्रवेश केला तेव्हा मार्गाच्या दोन्ही हातांना आणि मांडवांवर झालेली नागरिक स्त्रियांची भीड तुम्ही पाहायलाच हवी होती. माझ्या डोक्यावर त्यांनी फुले उधळली तेव्हा त्यांच्या नेत्रांतील भाव पाहून तुम्हालाही वाटले असते की, यांतील कोणीतरी स्त्री केवळ खुणावताच या वीराच्या अंतःपुरात येईल.'

वात्स्यायनाच्या मनात आलं, 'स्त्रीला वश करायला शौर्याची कृत्ये उपयोगी पडतात तसेच गोष्ठीसमवायातील बोलणे, नाट्य, गायन, नृत्य, चित्र यांतलं कौशल्यही उपयोगी पडते, हे त्याला ठाऊक नाही. कलेत कुशल पुरुषही नागरिकांत आणि स्त्रियांत प्रिय होतो.

कर्णीपुत्राची वस्त्रे घालून झाली होती. तो म्हणाला,

'हा पाहा, पीडीतक आलाच. पाटलिपुत्रातील यच्चयावत स्थळ याला ठाऊक आहे. तुमच्या मेहुण्याने बायकोला घेऊन असे बाहेर पडायला नको होते. अशा तरुण स्त्रियांना पतीपासून वेगळे करून सामंतांच्या भ्याड पोरांच्या स्वाधीन करणं हा इथं काहींचा उद्योग आहे. तुमच्या मेहुण्याच्या जिवावर संकट आहे हे निःसंशय. मी असे ऐकलंय की, तुमच्या देशात गणराज्य आहे. राजा आणि सेनापतीशिवाय देश कसा चालतो मला समजत नाही.'

इतक्यात पीडीतक आला. तो विलक्षण काळा होता. किडकिडीत आणि बुटका होता. त्याचे डोळे भेदक होते. नमस्कार करून तो उभा राहिला.

कर्णीपुत्र म्हणाला,

'वात्स्यायन ! याला सारं सांगा.'

वात्स्यायनाने जोडप्याचे वर्णन केल्यावर कपाळावर हात दाबून जरा विचार करीत पीडीतक म्हणाला,

'लक्षात आलं, मत्तालकाच्या तळघरात अशी एक तरुण मुलगी आहे. राजपुत्र आणि सामंतपुत्र तिच्यासाठी खेटा घालीत आहेत. मत्तालक त्या मुलीचे मूल्य प्रत्येक दिवसाला वाढवीत आहे.'

वात्स्यायनाने विचारले,

'तिच्याबरोबर असलेल्या पतीचे काय ?'

पीडीतक हसून म्हणाला,

'त्याचे काय ? या वेळेपर्यंत तो नसेलही. पतींबद्दल मत्तालकाला प्रेम नसते.'

वात्स्यायनाची छाती धडधडू लागली. त्याच्या अंगाला घाम सुटला. जीभ कोरडी पडली. दुःखाने भावनावश होऊन शोक करीत तो म्हणाला,

'अरेरे ! अंगरिक्षा ! तुझे बरेवाईट झाले, तर तुझ्या आईचे सांत्वन कसे करू ? वासंतिके ! तू किती अल्लड होतीस ! व्यसनी राजपुत्राच्या अंतःपुरात तुझे काय होईल ! अरे राजपुत्रांनो आणि सामंतपुत्रांनो ! तुम्ही असे का वागता ? प्रजेचे कल्याण इच्छिणारे राजे अशा मार्गाचा अवलंब करीत नाहीत. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर यांवर विजय मिळविणारे राजेच जगात विजयी होतात. तुमच्या विकृतींमुळे दोन कोवळ्या जीवांचा सत्यानाश करताहात.'

कर्णीपुत्र म्हणाला, 'वात्स्यायन ! शोक आवरा. मी असताना पाटलिपुत्रात तिला अंतःपुरात ओढण्याचे कुणाला धैर्य होणार नाही. चला ! पीडीतका, पुढे हो. मार्ग दाखव.'

तिघे मार्गाने जात असता लोक कर्णीपुत्राकडे पाहून थबकत होते. त्याचे अजस्र खड्ग पाहत कुजबुजत होते. गवाक्षांतून स्त्रियांचे नेत्र चकाकत होते. मुले त्यांच्या पुढे पुढे पळत होती. कर्णीपुत्राच्या आश्वासनाने वात्स्यायनाला धीर आला होता, तरी अद्यापी त्याचे पाय थरथरत होते. वासंतिकेचे आधीच काही बरेवाईट झालेले नसावे ! ती भ्रमरामागे धावणारी मुग्ध बाला ! अंगरिक्षा ! पळून जाऊन तुम्ही केवढा प्रमाद केलात. वात्स्यायन स्वतःशी पुटपुटत होता.

मत्तालकाच्या तळघराशी येताच तेथील द्वाराची चौकट दोन्ही हातानं धरून कर्णीपुत्राने जोरजोरानं खडखडवली. एका दासाने दार उघडले. त्याच्या तोंडावर प्रथम संताप होता. पण कर्णीपुत्राला पहाताच तो हात जोडून लटपटत मागे सरू लागला. कर्णीपुत्र ओरडला—

'मत्तालक कुठे आहे ?'

'बोलावतो, महाराज ! आपण आत यावे असे कसेतरी म्हणत दास धावत आत गेला. काही क्षणांतच मत्तालक पुढे आणि तो मागे असे धावत आले. कर्णीपुत्र गर्जला,

'उज्जयनीची तरुणी कुठे आहे ?'

हात जोडून मत्तालक म्हणाला,

"महाराज ! ती क्षेम आहे. आपण इथपर्यंत येण्याचे उगीच कष्ट घेतले. आपल्या अंतःपुरात तिला मी सन्मानपूर्वक पाठवून देतो. आपण निःशंक जावे. यापूर्वीच आपण आपली इच्छा कळवली असती.'

खड्ग उगारीत कर्णीपुत्र पुन्हा गर्जला,

'बडबड पुरे. आधी घेऊन ये.'

'आणतो महाराज ! या क्षणी आणतो. तिला मी अतिशय सुखात ठेवली आहे.'

मत्तालक तोंड वळवून धावत आत गेला. पण कित्येक क्षण गेले, पळे गेली तो आला नाही. त्याऐवजी आतून तारस्वरातील त्याच्या शिव्या ऐकू येऊ लागल्या. मागोमाग एका दासाला मुष्टी आणि लत्ता यांनी प्रहार करीत, त्याला ढकलीत, लोटत येताना तो दिसला. जरा पुढे येताच दासाला मारण्याचे सोडून मत्तालकाने धावत कर्णीपुत्राच्या पायावर लोळण घेतली. गडबडा लोळत तो म्हणाला,

'महाराज ! घात ! ती तरुणी गेली.'

कर्णीपुत्र ओरडला,

'खोटे ! अरे ! प्रतोद आणा. याची कातडी लोळवतो.'

जमिनीवरूनच मत्तालक केविलवाणा म्हणाला,

"दया ! दया ! महाराज. काल रात्री ती होती. मी स्वतः तिचे क्षेम पाहून गेलो होतो. महाराज ! ती एकटी नव्हे, तिच्याबरोबर असलेला तिचा पतीही गेला. आता मी काय करू ? दोन दासी मी तिच्या सेवेला ठेवल्या होत्या. तिचा प्रवासाचा शीण घालवून तिचे तेज वाढवण्यास मी तिला विलासात ठेवले होते. महाराज! मी लबाडला गेलो. पुरा बुडालो."

कर्णीपुत्र ओरडला,

'खोटा आक्रोश करू नको.'

मत्तालक म्हणाला,

'मी दुष्ट नाही, मी तिला छळले नाही. सुंदर तरुणींच्या कलाने मी घेतो. एवढेच काय तिच्या पतीच्या सेवेलाही मी दोन सुंदर दासी दिल्या. त्या दासींमधे तो हळूहळू रममाण होऊ लागला होता. तो पत्नीला विसरत चालला होता, थोड्या कालावधीनंतर द्रव्य आणि दासी घेऊन त्याने स्वेच्छेने पाटलीपुत्र सोडले असते. तिलाही विलास आवडू लागले होते. मी अधन नागवला गेलो.'

'तुझे दास भोवती असता दोघे कशी गेली ?'

मत्तालक म्हणाला, 'महाराज! तोही चमत्कारच. मुंगीला-सुद्धा येथून नकळत जाता येणार नाही. माझे सेवक विश्वासाचे आहेत. एक तर त्याला मंत्रविद्या येत असावी किंवा तो विद्याधर असावा. त्याने दोघांची रूपे बदलली असतील किंवा अदृश्य होण्याचे अंजन डोळ्यात घातले असेल. त्या शिवाय या मत्तालकांच्या वाड्यातून जाणे कुणा मर्त्यास अशक्य."

'कुठे गेली दोघे ?'

'ते त्यानाच विचारा, महाराज! किंवा परमेश्वराला. फारतर दासींना विचारून पहातो. पिंजऱ्यातून उडालेल्या पक्षांनी कुठली दिशा घेतली कोण सांगणार ? सोन्याच्या पिंजऱ्यांत ठेवलेला पक्षी कधी उडून जात नाही हा माझा आजपर्यंतचा अनुभव असत्य ठरविला. दोघे विलक्षणच."

मग मत्तालिकाने दासीला हाक मारली. ती म्हणाली, 'महाराज! दोघे कुठं गेली कसं सांगणार ? पण तिचा तो नवरा दक्षिण दिशेबद्दल वारंवार बोले. दक्षिणेकडील मार्गाबद्दलही तो विचारी.'

मत्तालक मधेच म्हणाला,

'महाराज! या क्षणी मी दक्षिणेकडे सेवक धाडतो. सूर्यास्ताच्या आत तिला आपल्या अंतःपुरात आणतो.'

"पुन्हा बोललास तर खड्गाने तुकडे करीन. साऱ्या पाटलीपुत्राला ठाऊक आहे, हा कर्णीपुत्र अज्ञान मुलींना अंतःपुरात घेत नाही. आणि तू जर पुन्हा कधी अशा मुलींना येथे आणलेले कळले तर तुला सुळावर देईन.'

वात्स्यायनाने दासीला विचारले,

'दक्षिणेतल्या कोणत्या देशाकडे गेली दोघं ?'

दासी म्हणाली, 'त्या दुर्दैवी जीवांना कुठलेच काही ठाऊक नव्हते. मीच त्यांना दक्षिणेतले ताम्रलिप्ती वगैरे तीन चार देश सांगितले. तेव्हा नावे सुंदर असल्याने तिकडेच जाऊ असे तिचा नवरा म्हणाला.'

'कोणती नावे ?'

'ताम्रलिप्ती, अपरान्त, महाराष्ट्र. सहज विचारावे असे केव्हा तरी तो विचारायचा. मी त्याला एकदा तिकडे जाणारे मार्गही सांगितले. तो इतका सुंदर पावा वाजवायचा! आम्ही दासी मुग्ध होऊन जावयाचो. पण त्याच्या पाव्यांत दुःख होते.'

'गप्प्!' पिडीतक ओरडला. त्याने तुम्हाला मोहिनी घातली. तो यक्ष आहे. तो मनुष्य नाही.'

वासंतिका आणि अंगरिक्ष दक्षिणेकडे गेल्याचे कळल्यावर दोघे संकटातून सुटल्यामुळे वात्स्यायनाला आनंद झाला. पण नंतर त्यांना गाठता आले नाही म्हणून तो उदास झाला. उदास मनःस्थितीतच त्याने कर्णीपुत्राचा निरोप घेतला. कर्णीपुत्राने त्याला राहवून घेण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण आता पाटलीपुत्रांतून त्याचे मन उडाले होते. त्याचे चित्त अवंतीकडे लागले असताही दक्षिणापथाकडे जाणारा जथा तो शोधू लागला. त्याच्या द्विधा मनःस्थितीत त्याला वासंतिका व अंगरिक्ष यांचा शोध घेण्यास जावे की पत्नीकडे जावे याचा निर्णय त्याला घेता येत नव्हता.

ज्या जागांवरून पाटलीपुत्रांतून दूर देशांकडे जाणारे व्यापारी जथे निघतात त्या पाटलीपुत्राच्या नगरीबाहेरील पटांगणाकडे जात असता वारा सुटून, पहाता पहाता काळ्या मेघांनी आकाश भरून येवून जोराची पर्जन्यवृष्टी झाली नसती तर, पत्नीकडे धावणारे मन आवरून कर्तव्य, प्रेम आणि लोकलज्जा यासाठी अंगरिक्षाचा शोध घेत तो दक्षिणापथाकडे गेला असता. पण जथा शोधण्यास जात असता अर्ध्या वाटेतच धुळीचे भोवरे वर जाऊ लागले, गर्जना करीत मेघांनी आकाश आक्रमिले. केवळ पाव घटिकेत मुसळधार पावसानं पृथ्वी चिंब केली.

काही वेळ वात्स्यायन विचारांच्या तंद्रीत भिजत चालत राहिला. मग एका वृक्षाखाली त्याने आश्रय घेतला. आधीचे वादळ मग आलेले काळे ढग, विजांचा लखलखाट आणि वर्षाव. पाऊस पडू लागला आणि मातीचा वास दरवळला. पाटलीपुत्रांत शिरता शिरता वृक्षाशी भेटलेल्या तरुणी, त्याला आठवल्या. त्या तरुणीनं धुळीत फेकलेला 'उष्ण' आंबा. त्यांची थट्टा व हसणे, सारे सरून त्याला आपल्या पत्नीची आठवण आली. वर्षाऋतूचा आरंभ आला. आता तिकडे शेतीची कामे सुरू होतील. मोर ओरडू लागले असतील. वर तोंड करून पावसाचे हे पहिले थेंब पत्नी तोंडावर घेत खळखळून हसत असेल.

आपणास दक्षिणेकडे जावयास हवे. पण हा वर्षाऋतु आपणास फार दूर जाऊ देणार नाही. दक्षिणेकडील कुठल्याही नगरीला पोहोचण्याआधी नद्या ओढे वाहू लागले असतील, अंगरिक्ष आणि वासंतिका एखादे गाव गाठून सर्व पावसाळा तिथं काढतील. त्यांनाही प्रवास करता येत नाही.

पाऊस मंदावला. वाऱ्याबरोबर पुन्हा एकदा ओल्या पानांचा आणि मातीचा वास नाकात शिरला. दक्षिणेकडील प्रवासाचा विचार रहित करून, अवंतीकडचा प्रवास आरंभ करण्यास एवढे एक कारण वात्स्यायनाच्या मनाला पुरेसे झाले. पत्नीजवळ एकरात्र मिळावी हे जे एक खरे कारण ते त्याचे मन त्यांच्याजवळ बोलले नाही किंवा तोही मनाजवळ बोलला नाही.

पाऊस पूर्ण थांबला. तो अवंतीचे जथे निघत त त्या पटांगणाकडे निघाला. पण वाटेत मात्र त्याच्या मनात येत होते—आपण शोध हाती घेतला खरा पण त्या कामाला आपण पात्र नाही. आपल्या अंगी कर्णीपुत्राची धडक नाही किंवा महेश्वरदत्ताचे चातुर्य नाही. पावसाळा संपला की आपण वासंतिका, अंगरिक्ष यांना शोधायला बाहेर पडू तेव्हा महेश्वरदत्ताला घेऊन बाहेर पडू.

◻

# पक्षीसमागम

अंगरिक्ष आणि वासंतिका यांचा शोध अर्धा सोडून वात्स्यायन अवंतीच्या मार्गाला लागल्यावर, एकीकडे त्याचे मन अपराधी होते. दुसरीकडे चंचल होत होते. मनावरचा हा ताण त्याला नवीन नव्हता. बायको अवंतीला माहेरी गेली असता तिच्या पाठोपाठ निघाल्यावर मनाच्या याच ओढाताणीतून तो गेला होता. सर्वांच्याच बायका केव्हातरी माहेरी जातात हे तेव्हाही त्याला कळत होते तसेच दोन कोवळ्या जीवावर प्रसंग बेतला आहे हेही आता कळत होते. त्याचा उपयोग नव्हता. कामाचारातली जी अनेक कोडी त्यातले हे एक. मृत पित्याच्या देहाला अग्निसंस्कार करून आल्यावर रात्री आपल्या पत्नीचा भोग घेतलेल्या एका पुत्राची कथा वात्स्यायनाला आठवली. आत्यंतिक प्रसंगी काम अतिप्रज्वलीत होतो.

ज्या जथ्याबरोबर वात्स्यायन अवन्तीकडे निघाला होता त्या जथ्यांत व्यापार व्यवसाय उरकून घराकडे तोंड केलेल्याची मुक्त वृत्ती होती. गाणी, नाचणी, मद्यपान आणि अवंतीच्या आठवणी यांना ऊत आला होता. पण वात्स्यायनाचे मन या लोकांत रमत नव्हते. आणि तो एकटा एकटा रहात होता. अगदी पहाटे शंखध्वनी होऊन उठण्याची सूचना मिळे. पाण्याच्या जागी जाऊन प्रातर्विधी, मुखप्रक्षालन झाल्यावर जागजागी चुली पेटत. भाकऱ्या थापण्याचे आवाज येत. स्त्रीवर्ग मातीच्या वेगवेगळ्या आकारांच्या कुंभांतून पाणी आणताना दिसे. कुणी स्नाने आटपून सूर्याला अर्घ्य देत उभे असत. दुधासाठी बरोबर असलेल्या गाई, आपल्या वत्सांना चाटीत असता, त्यांच्या गळ्यातील घंटींची किणकिण वातावरण भरून टाकी. गाडीवाले, बैलांना पाणी दाखवून आणून गाड्यांना जोडू लागत. जथ्याचा वाटाड्या-सार्थवाह कुशल विचारीत लोकांमधून हिंडत राही. मध्यम वय ओलांडलेला हा पुरुष अतिशय चपल, उत्साही होता. त्याचे शरीर पिळदार स्नायूंनी भरलेले होते. त्याच्या मुखावर नेहमी स्मित असे आणि जिभेवर गोड थट्टेचे शब्द असत.

इतर वेळी वात्स्यायनाने त्यांच्याशी मैत्री केली असती. पुढचा मार्ग टेहळण्यास तो घोड्यावरून जाई तेव्हा वात्स्यायन त्याच्याबरोबर गेला असता किंवा रुतलेले चाक तो खांदा देऊन वर काढी तेव्हा वात्स्यायनानेही खांदा दिला असता; पण वात्स्यायनाचे मन कशात रमत नव्हते. तो एकटा एकटा चालत होता. आणि दुपारी एखादी आंबराई पाहून सार्थवाहाने भोजनासाठी जथा थांबवला की भोजनानंतर घटिका मोकळी राही तेव्हा, किंवा सूर्यास्तापूर्वीच चांगली जागा मिळून जथा थांबला तर सूर्यास्तापर्यंतचा काळ, वात्स्यायन आंबराईच्या कोपऱ्यात, आंबराईबाहेर अरण्याकडे तोंड करून बसत होता.

त्यावेळी त्याच्या मनात येई, हे सारे लोक उद्योग संपवून घराकडे निघाले आहेत. आनंदात आहेत. आपण तेवढे व्यग्र आहोत. आपण त्यांच्यात गेलो तर त्यांच्या आनंदात आपल्याला भाग घेता येणार नाही. चिंतेत असलेल्या माणसाला आपल्या चिंतेशिवाय दुसरा विषय बोलता येत नाही. आपल्या चिंतेची छाया त्यांच्यावर टाकण्यापेक्षा निसर्ग बरा. एकांती बसून निसर्गाकडे पाहत बसावे. हा शांत आहे. याच्याशी बोलावे लागणार नाही. हा नियमित आहे. माणसांसारखे याचे भाग्य वक्र नाही. ऋतु क्रमाने येतात व जातात. निसर्ग क्रमाने फुलतो किंवा कोमेजतो. पावसाळा आला की उगवायचे एवढे वनस्पतींना ठाऊक आहे. आणि वसंत आला की फुलायचं ठाऊक आहे. किती वर्षे हा वृक्ष येथे उभा आहे ! या मातीने किती लहान लहान वेली झुडुपांना जन्म दिला आहे ! यांना कुणाला वासंतिका अंगरिक्ष यांचा शोध घ्यावयाला पृथ्वीवर हिंडायला जावे लागत नाही. हे पशुपक्षी ! हेही नैसर्गिक प्रवृत्तीने जगत असतात. मागच्या अमराईत पोपटांचे थवे पाहिले, त्या आधी हरणांचे थवे उसळ्या घेत डौलाने समोरून गेले. आमराईत माकडेही आहेत, कुठेतरी मोर होते. कित्येक पिसारा पसरून नाचत होते, ढग पाहून.

मनुष्यत्व सोडून पशुत्व किंवा पक्षीत्व स्वीकारण्यात आनंद आहे. त्यांना विचार करावा लागत नाही. त्यांना धर्म अर्थ काम नाही. मोठ्यांच्या रागाला भिऊन पळून जावे लागत नाही आणि शोध घेण्यासाठी जावे लागण्याचे कर्तव्य नाही. स्वैर हिंडावे. भूक लागली की, खाद्य शोधावे. समागमाचा ऋतु आला की घरटे बांधावे.

वात्स्यायनाच्या समोरच्या झाडावरून पाने सळसळावीत एक तांबडा काळा पक्षी उडाला नि झाडाभोवती घिरटी घेऊ लागला. मागोमाग तशाच दुसऱ्या पक्षानं उसळी घेऊन फांदी लववीत झाड सोडलं. फेरी घेऊन पहिला फांदीवर बसताच दुसराही बसू लागला. तेव्हा पहिला परत उडाला.

नरमादी दिसताहेत ! त्यांचा समागमाचा ऋतु असावा. किती सुंदर वर्ण घेतला आहे नराने ! पुन्हा दोन्ही पक्षी घिरटी घेऊ लागले. पुढची मादी आहे व ती मागच्या नराला खेळवते आहे. कदाचित खेळवत नसेल. कामोद्युक्त व्हावयाला एवढ्या घिरट्या लागत असतील तिला.

नराच्या पाठलागाचा आवेश वाढत आहे. मादीचा दूर उडण्याचा यत्न मंदावत आहे. पाहता पाहता वात्स्यायनाचा घसा खारावला. नरा ! तू भाग्यवान आहेस. तुझी मादी तुला अनुकूल होत आहे. आणखी एखादी फेरी घालताच तुझा हेतू साध्य होईल. तुझी सखी तुला लाभेल.

मादी फांदीवर उतरली. नर तिच्या शेजारी उतरला. त्याने झटकन चोचीत तिची मान पकडली. मादीनं एक दोनदा पंख भिरभिरवून विरोध दर्शविला. वात्स्यायनाचे हृदय धडधडू लागले. डोळे ताठ होऊन पाहू लागले. नराने तिच्या पाठीवर उसळी घेतली.

तोच पाठीमागून हसणे ऐकू आले. तंद्रीतून दचकून जागा होऊन वात्स्यायनाने मागे मान वळवली. जथ्याचा सार्थवाह कमरेवर हात ठेवून एकदा त्याच्याकडे आणि एकदा पक्षी जोडप्याकडे पाहत हसत उभा होता. खांद्यावरून वाऱ्याने उतरलेले उत्तरीय झटका देऊन सावरीत तो पुढे येऊन वात्स्यायनाच्या शेजारी शिळेवर येऊन बसला. वात्स्यायनाच्या डोळ्यांत पाहत तो म्हणाला,

'बाबा ! पक्षांचा समागम पाहताना तुझे तोंड फुलले आहे. अंग कातरले आहे. तू कामातूर झाला आहेस. पाटलिपुत्राहून निघाल्यापासून प्रत्येक दिवशी मी तुला पाहत आहे. या जथ्याचा मी सार्थवाह आहे आणि तत्पर सार्थवाह जथ्यांतील प्रत्येक व्यक्तीकडे लक्ष देऊन

असतो. प्रवासाला आरंभ झाला की तो नेहमी पुढे असतो. डाव्या आणि उजव्या हातासही असतो. संकट येण्याआधी तो संकटाचे निवारण करतो. तो जथ्याचा आई आणि बाप दोन्ही असतो.

"प्रत्येक दिवशी मी पाहतो आहे, तू एकटा चालतोस. एकटा दूर जाऊन बसतोस. तुला अन्न जात नाही. वाढणाऱ्याला खाणाऱ्याचे सर्व कळते. तसे सार्थवाहापासून कुणाला काही लपवून ठेवता येत नाही. अरे ! असा तू प्रतिदिनी पशूपक्षातले समागम पाहत बसशील तर अवंती येईपर्यंत तुझे सगळे त्राण जाईल. अवंती-पाटलीपुत्र करता करता माझे आयुष्य गेले. मी अतिशय पाहिलाय. प्रवासात माणसं जशी वागतात तशीच ती खरी असतात. प्रवासात आपल्या समाजापासून माणूस दूर येतो. बंधने नसतात. स्वभाव उघडे होतात. प्रवासात थकवा येतो तशी कामवासनाही वाढते. पुष्कळदा चिंता असते. तीही कामवासना वाढवते. मग जथ्यातले स्त्रीपुरुष दिवसरात्र पाहत नाहीत. कुणी पाहतो आहे याची लज्जा राहत नाही. शरीरे आणि मने दोन्ही मलिन होतात. पण मलीन तरी कसे म्हणावे !

'या मार्गावर मी पशुपक्षांचे शेकडो समागम पाहिले आहेत. पण मी एक काळजी सतत घेत आलो आहे. त्यापासून मी कधी माझ्या कामवासनेची तृप्ती घेण्याचा यत्न केला नाही. अशी तृप्ती घेऊ पाहण्याने विकृती येईल, तू अशक्त होशील आणि घरी गेल्यावर पत्नीचे समाधान तुला करता येणार नाही म्हणूनच प्रवासात संयम हवा. पशुपक्षांचे समागम पहा. पण नीट पाहा. बाबा ! ते पशुपक्षी आहेत म्हणून त्यांना क्षुद्रही लेखू नको, परमेश्वराने दिलेल्या उपजत बुद्धीने ते सर्व क्रिया करीत असल्याने पुष्कळदा त्यांचे अनुकरण आपल्याला हितकारक असते. पक्षांचे इतके समागम मी पाहिले पण नराने समागमाच्या आवेगात पक्षिणीला दुखापत करून फांदीवरून खाली पाडले आहे असे पाहिले नाही. चोचीत धरल्याने तिच्या मानेवरचे थोडे केस विस्कटतात. फडफड केल्याने एखाददुसरे पीस गळते. बाकी कांही नाही, याउलट संभोगकाली भान विसरून स्त्रीला अपंग करणारे, आणि कामातिरेकाने स्त्रीला क्षय लावणारे पुरुष मी पाहिले आहेत आणि अशा पतींना कामातूर पाहताच भयाने पळणाऱ्या स्त्रिया पाहिल्या आहेत.

'तू नीट जेवत खात जा. हा प्रवास थकवा आणतो. अजून पर्वत अरण्ये आहेत. अन्नपाण्याशिवाय राहण्याची वेळ येईल. असा दूर येऊन पशुपक्षांचे समागम अवश्य पहा. पण ते शिकण्यासाठी पहा. नीट निरीक्षण केलेस तर तुझ्या लक्षात येईल की, पशुपक्षांतील कुठलीही नरमादी समागमानंतर अतृप्त रहात नाही. माणसांत असे किती वेळा घडते ? नर तृप्त होऊन वरच्या फांदीवर बसतो. मादी तृप्त होऊन विसकटलेल्या आपल्या पिसांवरून चोच फिरवीत राहते. मग दोघे भक्ष्य शोधनार्थ उडून जातात.

'निसर्गानं त्यांच्यात बाणलेला संयम ध्यानी आण. तुला आवडत नसल्यास जथ्यातील स्त्रियांकडे लक्ष देऊ नको. पण मनातल्या मनात अशा दृश्यांनी कामातूर राहत शरीर झिजवू नको. मी तुला सांगितले हे कुणी पंडित सांगणार नाही. कारण पंडित फक्त पुस्तकांतल्या शब्दांचाच विचार करीत असतात. व्यवहारात निराळेच घडते.' बस तू ! पक्षांचे आणखी समागम पहा. पत्नीला योग्य काली सांगते. ते ऐकून ती प्रमुदित होईल. अशा गोष्टी स्त्रीपुरुषांनी परस्परांना सांगून आनंद वाढतो. मी तो घेतला आहे. तो तुला मिळू दे. दिवसाची माझी कामे उभी आहेत. मी येतो. आज तुला एक भाकरी अधिक गेली पाहिजे.'

सार्थवाह आला तसा अवचित निघून गेला. आणि वात्स्यायन थकवा आल्यासारखा शिळेवर उताणा निजला. निळ्या आकाशाची झगमग असह्य होऊन त्याने डोळे मिटले. त्याला आपले शरीर उचलेले जात असल्याचा भास झाला. त्याला वाटले सगळ्या ताणाचा निचरा होत आहे. सार्थवाहाने काही दिवस आपल्याकडे लक्ष ठेवले असले पाहिजे. पक्षी जोडप्याचा समागम पाहून आपण कामातूर होत होतो तसाच तोही एकदा झाला असेल. नंतर तो शहाणपण शिकला असला पाहिजे. त्याने विवाह केलेला असेल का ? कदाचित प्रवासी जीवन पत्करल्यामुळे तो अविवाहित राहिला असेल, त्याला विचारायला हवे. पत्नीपासून दूर असलेला कामविव्हल असणार इतके तरी त्याने मान्य करावे.

आता आपण त्याचा आधार घेऊ लागलो ! त्याला अंगरिक्ष वासंतिकेचे आपण का सांगितले नाही ? आपण भित्रे आहोत. अंगरिक्ष वासंतिकेचा शोध घ्यायला निघतानाही आपण घाबरलेले होतो. भीत भीत आपण सगळी कामे करतो. पण करतो. अवंतीहून निघाल्यापासून आपण खूप घोटाळे करून ठेवले. आपण अंगरिक्षाला उपदेश दिला तो त्यातलाच. आता शोध अर्धा सोडून पत्नीला भेटायला जाऊन आणखी घोटाळे करणार आहोत, नगरला गावी गेल्यावर काय होणार ठाऊक नाही. कुणा अनुभवी माणसाने सांगावे. नगरला जावे की नाही ? आणि गेल्यावर पत्नी कशी वागेल ? अंगरिक्ष आणि वासंतिका सापडतील की नाही सांगावे. भेटलेला ज्योतिषी भेटायला हवा. कामसूत्रे लिहिणार असे सांगून त्याने आपल्याला चढवले. आता आणखी काही सांगेल. आपल्याला आयुष्यात काही साधता आले नाही. महेश्वरदत्ताला संपत्ती उधळण्याचे आणि विट होण्याचे साधले. त्या सार्थवाहालाही आपल्यापेक्षा जास्त साधले आहे. पक्षी समागम कसा बघावा हे त्याने शिकवले. पत्नीपुढे उभे राहताच तिच्यापुढे आपण प्रश्न उभे करणार आहोत. ती कशी वागेल यावर आपले सुखदुःख आहे. स्वतःच्या बाबतीत आपल्याला काही ठरवता येत नाही. काहीं असले तरी सार्थवाहाला वासंतिका अंगरिक्ष यांच्याबद्दल सांगायला हवे होते. उद्या सांगू.

दुसऱ्या दिवशी वात्स्यायनाने सार्थवाहाला आपले मन कष्टी का आहे हे सांगितले. सार्थवाह म्हणाला,

'त्या दोघांचा शोध घ्यायलाच हवा. पण मधे घरी जायचे की नाही हा निर्णय तुमचा तुम्ही घ्यायचा आहे. पत्नीला भेटून नंतर शोध घ्यायला जावे असे माझे मत झाले आहे. त्यासंबंधी माझी कथा ऐक— ◻

## सार्थवाहाची कथा

माझा पिता राजाकडे स्वयंपाकी होता. माझ्या बालपणीच त्याचा मृत्यू झाला. मी लहान असल्याकारणानं राजाकडले माझ्या पित्याचे काम मला मिळावयाचे ते मिळाले नाही. आईनं गरिबीत

मला वाढवले. माझ्या मामाकडे तिनं मला पाक विद्या शिकायला ठेवले. विद्या शिकत असतानाच मामाने आपल्या कन्येशी माझा विवाह लावून दिला.

माझी पत्नी सुंदर होती. मी वडिलांच्या पूर्वीच्या ओळखीमुळं थोरामोठयांकडे स्वयंपाकाला जाऊ लागलो. आमची काही वर्षे आनंदात गेली. मी एका धनिक व्यापाऱ्याकडे काम पत्करले होते. तिथे दूरदूरच्या देशांहून व्यापारी येत. त्यांना स्वयंपाक करून भोजन घालावयाचे काम माझ्याकडे आले. त्या निमित्ताने नाना देशींचे धनिक व्यापारी माझ्या ओळखीचे झाले. त्यांच्या तोंडच्या अनेक देशांच्या कथा ऐकता ऐकता प्रवास करावा असे मनाने घेतले. व्यापारी जथ्याने येत. मला एका जथ्यात काम मिळाले. तेव्हा धनिक व्यापाराचे काम सोडून मी त्या जथ्यात स्वयंपाकी म्हणून गेलो.

त्या पहिल्या प्रवासास निघत असता सुंदर तरुण पत्नीचा विरह होणार या कल्पनेनं मला फार दुःख झाले. माझी पत्नी तर सारखी रडत होती. मी अवंती सोडून तिला विरहांत टाकून जाऊ नये म्हणून तिने विनवण्या केल्या पण मी तिला समजावले. जथ्याबरोबरच्या कामात प्राप्ती खूप होती. अनेक वचने देऊन मी तिचे सांत्वन केले. पाटीलपुत्राच्या त्या पहिल्या प्रवासाहून येताना मी त्या देशातल्या सुंदर वस्तू तिच्यासाठी आणल्या व तिला आनंदित केली.

नंतर वाराणाशीला जाणाऱ्या जथ्याबरोबर मी गेलो. तेथेही प्राप्ती चांगली झाली व तिला मी रेशमी वस्त्रे आणली. नंतर मी दक्षिणापथास गेलो. अशी पाच सात वर्षे प्रवास केल्यावर मला सर्व देशांचे मार्ग ठाऊक झाले. मला आता स्वयंपाकीपणाचा कंटाळा आला होता. जथ्याच्या सार्थवाहाला मिळणारा मान पाहून सार्थवाह व्हावेसे मला वाटू लागले. पाककर्म सोडून मी एका जथ्यात सार्थवाहाच्या हाताखाली काम मिळवले. माझे शरीर बांधेसूद, बळकट होते. सिंहाची ऐट माझ्यात होती. आणि हाताखाली माणसे वागवण्याची मला हतोटी होती. दूरदूरच्या प्रवासातील अडचणींचे मला अनुभव होते. माझे शब्द मधुर येत. आणि गरिबीतून कष्ट करून वर आल्याने मी नम्र होतो. दोनच जथ्याबरोबर मी सार्थवाहाचा हस्तक म्हणून गेलो. मग तिसऱ्या जथेत मला सार्थवाहाचे काम मिळाले. जथ्याने प्रवास करणाऱ्यांत मी अतिशय विश्वासू म्हणून धरला जाऊ लागलो. मला सारखी सार्थवाह होण्यासाठी निमंत्रणे येऊ लागली. त्यामुळे वर्षाऋतूचे चार महिने सोडले तर मी प्रवासात वर्षभर राहू लागलो.

एकदा असाच पाटलीपुत्राला जाणाऱ्या जथेत मी सार्थवाह असता, जथ्यातील दोन धनिक पुत्रांचे बोलणे नकळत मी ऐकले. त्यांतला एक धनिक पुत्र प्रथमच प्रवासाला निघाला होता. तो मित्राला सांगत होता.

मित्रा ! काल अवंती सोडताना मला फार दुःख झाले. कारण काही महिने माझा एका सुंदर स्त्रीशी परिचय झाला आहे. तिचा पती सार्थवाह असून नेहमी प्रवासात असतो. ती विचारी विरहाग्नीत जळत असते. तिला सोडताना मला किती यातना झाल्या सांगू ? अरे ! ती स्त्री प्रत्यक्ष रति आहे. तिने मला दिलेल्या सुखोपभोगांपुढे परदेशांत जाऊन मिळणारे अपार धन व्यर्थ आहे. तिचा पती म्हणे प्रथम स्वयंपाकी होता. नंतर सार्थवाह झाला. पतीचे स्वयंपाकीपण आणि आता सार्थवाहपण दोन्ही तिला लज्जा आणतात. खरोखर इतकी सुंदर स्त्री प्रासादात हवी. तिला सोडून येताना मी व्याकूळ झालो. ती तर बेशुद्ध पडली."

त्या धनिक पुत्राचे बोलणे ऐकताना माझा किती थरकाप झाला असेल याची कल्पना करा. जथ्याबरोबर जाणाऱ्या सार्थवाहाला चार दिवस आधी घर सोडावे लागते. त्याला सर्व व्यवस्था बघावयाची असते. मीही चार दिवस आधी तसे घर सोडले होते. मी घर सोडलेले पहाताच हा धनिक तरुण व्यापारी माझ्या घरात शिरला होता. मी निघताना माझी बायको दुःखाने बेशुद्ध पडली हे सारे ढोंग होते. संतापाने व दुःखाने माझे सारे अंग पेटून निघाले. अवंती सोडून आम्ही कांही योजनेच आलो होतो. माझ्या कामातले माझे लक्ष उडाले होते. दिवसभर त्या तरुणाला मी दृष्टीआड केला नाही. सायंकाळ होत असता अचानक त्या तरुणाने जथा सोडला. घोडयावर स्वार होऊन तो अवंतीकडे निघताच मीही मागोमाग अवंतीची वाट धरली.

'रात्र साधून मी माझ्या घराशी आलो. मागील दारातून मी हळूच आंत प्रवेश केला. माझी पत्नी व तो तरुण यांना एकांत करताना पाहिले. माझे डोके भडकून मी दोघावर तुटून पडलो. शस्त्राने मी दोघांची खांडोळी केली. आणि घोडयावर स्वार होऊन पुन्हा जथ्यात येऊन मिसळलो.

'बाबारे ! म्हणून मला वाटते की, तू एकदा घरी जाऊन यावेस हे उत्तम. जिचा पती वारंवार परदेशी जातो ती स्त्री परपुरुषास जवळ करण्याचा संभव असतो. अर्थात तू काही सार्थवाह नाहीस व पहिल्यादाच घरापासून दूर आहेस. पण खरे पाहता मी परदेशांत फार काळ राहू लागलो हे अयुक्त केले. पत्नीला मारल्यानंतर मी पुन्हा विवाह केला नाही, पण इतरांचे विवाह जीवन कसे सुखदुःखाने चालले आहे हे पाहण्याची मला सवय जडली. पुरुषांनी कोणत्या अयुक्त गोष्टी करू नये याचे मी आडाखे बांधले. येथे कित्येक पती-पत्नीचे कलह मी मिटवून दिले आहेत. मी जो उपदेश अनेकांना केला आहे तो सांगतो–उगीच पत्नीचा संशय घेऊ नको, पत्नीचा वारंवार अपमान होईल असे बोलू नको. मर्यादि घाण सवयी लावून घेऊं नको. केवळ शरीरसुखासाठी दुसरी स्त्री जवळ करू नको. शरीर स्वच्छ ठेव."

□

## दीर्घ विरहानंतरचे मीलन

नगरला आपल्या घरी जाण्यासाठी वात्स्यायनाने अवंती एक योजनावर असताच जथा सोडला. जथा सोडण्यापूर्वी त्याने सार्थवाहाचा निरोप घेतला. या माणसाने आपल्याला पुष्कळ काही चांगले सांगितले.

धास्तावतच वात्स्यायन घरापाशी आला होता. दुरून बाग आणि घर त्याला किती लहान वाटली ! झोपाळा लहान वाटला. ओवारही एवढेसे वाटले. विस्तृत प्रदेशातून आल्यावर दृष्टी विस्तृत होते. घरासमोरच्या वाटिकेतून घराशी आल्यावर सोमलाचे घर आठवून त्याला आपल्या घराच्या खोल्याही एवढयाशा वाटल्या. आपण प्रवासात जी विस्तृत अरण्ये पाहिली आणि पाटलीपुत्रात मोठे वाडे पाहिले, त्याचा हा परिणाम.

हे सारे डोक्यात येत असता, दासीला हाक मारावी, की पत्नीला हे त्याला ठरवता येईना. इतक्या काळानं घरी आल्यावर प्रथम दासीला हाक मारणं कसेसेच वाटले. पण पत्नीला हाक मारण्याचाही धीर होत नव्हता. तीच दार उघडायला येईल आणि आपल्या तोंडावरच्या भावावरूनच तिच्या भावाचा शोध लागला नाही हे कळून ती रडू लागली तर !

शेवटी त्याने मुलाचे नाव घेऊन हाक मारली आणि पत्नी दार उघडायला आली. तिने शुभ्र वस्त्र परिधान केले होते व अंगावर एकही दागिना नव्हता. केस मोकळे सोडलेले होते. त्याला पाहताच तिचे डोळे फुलले होते. आणि त्याला उंबऱ्याबाहेर उभे राहण्यास सांगून ती आत धावली. धावताना तिनें मुलांना आणि दासीला हाका मारल्या. तांदूळ आणून ते तिने वात्स्यायनावरून ओवाळून ठेवले. मग तो आत येताच दोन्ही मुलं त्याला येऊन बिलगली होती. त्यांच्यावर खोटे रागावत पत्नीने मुलांना दूर करण्याच्या निमित्ताने पुन्हा पुन्हा अंगाशी येऊन, अनेक दिवसांचे राहिलेले स्पर्शसुख दिले—त्याला तसे वाटले. मग हाताला धरून पत्नीने पायधुणीच्या दगडी चौरंगावर बसवून, त्याच्या धुळीने माखलेल्या पायावर पाणी घालून, ते रिठ्याच्या पाण्याने चोळले. मग त्याने हात व तोंड धुवून घेतल्यावर खोलीत आणून आसनावर बसल्यावर दासीने आणलेले रसाचे भांडे त्याच्या हाती देऊन, तो पीत असता ती अत्यंत मधूर अशी त्याच्याकडे पाहून हसली. तिचा आनंद तोंडावर मावत नव्हता. त्याच वेळी ती दासीला आज्ञा सोडीत होती आणि स्वतः आत बाहेर करीत स्नानाचे पाणी तापलंय की नाही !—भोजनाचा प्रस्ताव काय केलाय, पाहत होती. तिच्या पायात जणू हरीण संचारले होते.

स्नानाचे पाणी तापल्यावर तिने त्याला स्नानगृहाकडे नेऊन दगडीवर बसवून त्याचे प्रिय उटणे त्याच्या अंगाला लावले. मग अंगावर पाणी घालून त्याची पाठ, मान, हात चोळले. एकीकडे 'किती रूक्ष अंग झालाय किती पुटं साचलेत धुळीची.' असे कुरकुरत होती. स्नानानंतर तो धूत वस्त्रे नेसत असता, तिने भोजनाचे पान वाढले आणि तो जेवत असता ती एकेक पदार्थ आग्रह करून करून वाढू लागली. एवढं कसं पुरेल, आणखी हवं ती सारखी म्हणत होती. आणि तिच्या डोळ्यात, तिच्या हास्यात, आग्रहाच्या मधूर शब्दात, चुंबनांचं नि आलिंगनांचं भावी सुख ती दर्शवीत आहे असं त्याला वाटलं.

प्रवास कसा झाला, प्रवासात काय झालं याबद्दल तिनं अवाक्षरानं विचारलं नाही. सारे सुखोपचार घेताना वात्स्यायन मात्र गोंधळला. लवकरच ते प्रश्न कोसळणार या भीतीनं जितक्या मोकळेपणानं आनंद दाखवायला हवा तितका त्याला दाखविता आला नाही. भोजनोत्तर विडे पुढे आले आणि तरीही पत्नीने प्रवासाबद्दल विचारले नाही. एखाद्या अगत्यातल्या अतिथीला व्हावे तसे उपचार आपल्याच घरी आपल्याला होत आहेत असे त्याला वाटले.

तरी अंगरिक्षाबद्दल बोलणे निघाल्यावाचून वातावरण मोकळे होणार नाही. त्याला मनातून कळत होते. अंगरिक्षाचे मनात नसते तर हे स्वागत केवढे सुखाचे झाले असते ! बरेच दिवस दूर असलेला पुरुष स्वतःच्या घराशी अपरिचित होथो. घरात घडलेली मंद स्थित्यंतरे, वाढलेली मुले, उद्यानात कमी जास्त वाढलेल्या वृक्षलता, नवी आलेली फळे, फुले, पिंजऱ्यात ठेवलेले नवे पक्षी, मोठी झालेली पाडसे, सर्वांशी, मधे गेलेल्या काळातील अंतर जुळवून घेता घेता, हे उपचार उपयोगी पडतात. हळूहळू सुखसंवाद सुरू होतात.

उघड्या दारातून पत्नी हसत मुखाने घर आवरत होती, मध्येच ती मुलांना झोपवायला गेली. तिच्या शरिराकडेच आपण सारखे पाहत आहोत—वात्स्यायनाच्या ध्यानात आले. तिलाही ते कळले आहे आणि इकडून तिकडे जाताना ती आपल्याकडे आपली दृष्टी जाणल्याचे मधूर हास्य फेकीत आहे. पहिल्यासारखा दिनक्रम व्हावा असे वाटते. पण पहिली रात्र गेल्याशिवाय काही होणार नाही. दासीने शैय्या घातली आहे पण तिकडे जावेसे वाटत नाही. शैय्येवर पडताच डोळे तिच्या येण्याकडेच लागतील. आत्ताच आपले डोळे तिच्या डोळ्याकडे न पाहता तिच्या अवयवांकडे पाहू लागले आहेत. तिचे नितंब जरा कृश—झाल्यासारखे वाटतात का ?

तो झटकन उठून खोलीत फेऱ्या घालू लागला. मग शैय्यागृहाकडे गेला. शैय्यागृह तो केव्हाही येईल असे ठेवले होते. त्याचे ग्रंथ नीट लावलेले होते. कुठेही धूळ नव्हती. खुंटीवर पुष्पमाला आणि शय्येवर फुले होती. चंदनाचा सुवास दरवळला होता. एका चौरंगावर फुलांचे गुच्छ ठेवले होते. तो शय्येवर टेकला.

त्याची पाठ असतानाच पत्नी आत आली. आणि आवेगाने येऊन तिने त्याला आलिंगन दिले. त्याच्या छातीवर तोंड घुसमुसत ती रडू लागली. तिचे केस थोपटीत, तिच्या केसांची चुंबने घेत असता वात्स्यायनाच्या मनात आलं या अश्रूंत विरह संपल्याचा आनंद आहे आणि अंगरिक्षाबद्दल दुःख आहे. तो केवळ विरह संपल्याचा आनंद आहे असे मानून आपण उतावीळ होता कामा नये. मात्र इतका वेळ पत्नीच्या या भेटीची धास्ती तिच्या आलिंगनाने आणि अश्रूंनी विरली आहे असे त्याला वाटले. हळूहळू त्याचे हातही आलिंगनाच्या आवेगाने तिच्या भोवती दृढ झाले. हळूहळू तिचे एकटे राहण्याच्या धैर्याचे कौतुक, तिने निटनेटके ठेवलेले घर, तिचा आनंद यामुळे त्यालाही प्रेमाचे भरते आले. त्याने तिला मांडीवर घेतले. दबलेला काम उफाळून आला. पूर्वबाजूनं त्याने तिला घट्ट आलिंगन दिले. त्याला आठवले, शास्त्रात असेच आलिंगन स्त्रीला सुखकर होते असे दिले आहे. त्यावेळी शास्त्र आठवावे याचे त्याला हसू आले. तिने अपेक्षेने ओठ वर केले आणि त्याने चुंबन घेतले. तिच्या कलाने घेत, तिच्या अंगावरून आत फिरवीत असता तिचा वाढता कामवेग पाहून त्याच्याही कामवेग वाढून दोघांतील उत्तराप्रत्युत्तराची तीव्रता वाढू लागली. तिने जेव्हा आणखी चुंबने घेतली तेव्हा त्याचा आनंद उत्कटतेला पोहोचून, मनात आलेला शास्त्राचा क्रम विसरून त्याने केव्हा काय केले हेही त्याला कळले नाही. नंतर श्रांत होऊन सुखांत पडलेली त्याने तिला पाहिली आणि तिला तशी पाहून त्याचेही मन विलक्षण सुखावत असता इतका वेळ मनातून बाजूला पडलेले शास्त्राचे पुस्तक पुन्हा त्याच्या मनात आले. आणितो स्वतःशी हसला.

विश्रांतिनंतर दोघांनी स्नान केले. मग फळे, बर्फी, वगैरे खाऊन दोघे बाहेर येऊन ओटचावर बसली. ती त्याला बिलगून त्याच्या वक्षःस्थलावर डोके टेकून डोळे मिटून विसावली होती. दोघे काही काळ निःशब्द राहिली. मग वात्स्यायन म्हणाला, तो ध्रुवतारा पहा आणि आकाशगंगेचा पट्टा किती शोभायमान दिसताय तेव्हा डोके

घुसळत ती खुदकन् हसली. मग डोकं वर काढून म्हणाली "मला शुक्रतारा दाखवा." संभाषणास असा आरंभ झाल्यावर त्याने तिला मृदु स्वरांत आपल्या प्रवासाचे सांगितले. अंगरिक्ष वासंतिकेचा विषय निघताच तिला हुंदका आला तेव्हा तिला कुरवाळीत त्याने समजावले. मग शोध घेण्याचा आपला पुढचा बेत तो सांगू लागला तेव्हा ती शांत झाली. नंतर त्याने मुलांची बोलणी काढल्यावर ती उत्साहाने बोलू लागली. तो नव्हता त्या सहा महिन्यात मुलांनी केलेल्या बाललीला तिनं सांगितल्या. कोण केव्हा पडला, कोण कसा गमतीने बोलला, कुणाला कसा आजार आला इत्यादी झाल्यावर उद्यानातील लता वेली वृक्षांबद्दल, धान्याबद्दल, गाईगुरांबद्दल, आणि एकदा झोपाळ्याचा दोर तुटला त्याबद्दल आणि घरात काय सांडले लवंडले, फुटलेल्या मातीच्या भांड्याबद्दल, आणि शेजारणी काय म्हणत होत्या, सारे भडाभड ती सांगत असता, एकदाही त्याने कंटाळा दाखविला नाही. प्रवासांतला शिणोठा आणि सुरतश्रमाचा थकवा यामुळे येणारी निद्रा आणि जांभया त्याने दाबल्या. शेवटी नकळत त्याने जांभई दिली तेव्हा त्याला निद्रा हवी आहे हे ओळखून ती उठली. हाताने धरून तिने त्याला त्याच्या शैयेवर झोपवून अंगावर पांघरूण घातले. मग एक चुंबन घेऊन ती आपल्या शैय्येवर येऊन निजली.

पहाटे उठून ती पुन्हा त्याच्या शेजारी येऊन झोपल्यावर त्या हालचालीनं वात्स्यायन जागा झाला. जे रात्री आणखी बोलावयाचे राहिले होते ते दोघांनी बोलून घेतले. वात्स्यायनाने तिला, चातुर्मास इथे राहून शेतीची कामे आटोपून, नंतर महेश्वरदत्ताला घेऊन अंगरिक्ष वासंतिकेचा शोध घ्यावयास जाण्याचा आपला बेत सांगितला. तिने वात्स्यायन शोधाला गेल्यावर अवंतीत काय झाले हे सांगितले. तिच्या आईचे दुःख सांगताना ती रडली. तसेच वासंतिकेची मातापिता वासंतिका गेल्याच्या धक्क्याने हंथरुणाला खिळून होती. तिच्या वडिलांनी अंगरिक्षाचा शोध घेण्यास माणूस धाडला होता. पण तो निराश होऊन परत आला होता. आपल्यामुळे या कुटुंबांवर आपत्ती आली. तिथे आपले स्वागत होणार नाही या भीतीनं वात्स्यायन अवंतीत न शिरता परस्पर नगरास आला होता ते भय मात्र खरे नव्हते. वात्स्यायनाने मेव्हुण्याचा शोध घ्यायला जाण्यांत जी तत्परता दाखविली तिचे कौतुकच होत होते. पत्नी ते सांगत असता वात्स्यायनाचे मनात आले—आपले कौतुक झाले त्यामुळेच उत्पन्न झालेल्या आदरानं कालचे सुख आपणास मिळाले. अवंतीत आपल्याविषयी संताप असेल ही कल्पना खोटी ठरली, तशीच वासंतिका अंगरिक्ष यांचे काहीतरी भेसूर झाले असेल ही आपली कल्पनाही खोटी ठरो. ती दोघं सापडणार नाहीत ही कल्पना पण मनाचीच.

घरच्या गोष्टी सांगताना ती पुन्हा रडली होती. वात्स्यायनाने तिला जवळ घेऊन धीर दिला होता. त्याची काळजी करण्याची प्रेमळ तऱ्हा पाहून ती त्याला बिलगली होती. आणि दोघांनी पुन्हा रतिसुख घेतले होते.

नंतर वात्स्यायनाने दुसरी झोप घेतली. पत्नी केव्हा उठून गेली हेही त्याला कळलें नाही. तो जागा झाला तेव्हा उन्हे वर आली होती. क्षणभर परक्या ठिकाणी असल्याचा त्याला भास झाला. पण दुसऱ्या क्षणी रात्रीच्या स्मृती अंगावरून दरदरून जाताच तो त्या सुखद स्थितीत डोक्यामागे हात ठेऊन पडून राहिला.

दुरून मुलांचे ओरडणे मंद ऐकू येत होते. पत्नीने त्यांना बुध्याच आपल्या खोलीपासून लांब ठेवले असावे. पत्नी व दासी दोघींचे पुसट पयरव येत होते. त्याही पावले न वाजवता वावरत होत्या. उद्यानातून पक्षांचे सूर येत होते. उरलीसुरली कोकिळा मधूनच 'क्वे क्वे' ओरडत होती. वसंत ऋतु संपल्याने ती कुहू कुहू विसरली होती. मोरानं मोठ्याने 'काऊ ! काऊ' सूर काढताच वात्स्यायन स्वतःशी हसला, वेडे ! मुलांना तू ओरडा करू नको म्हणून दबकावशील, पण मोराला काय करणार ? ओरडू दे सर्वांना, करू दे मस्ती. मला घरी आल्याचे पूर्ण सुख घेऊ दे. मग निरनिराळे ध्वनी ऐकत, बाहेरून येणारे फुलांचे सुगंध, मातीचे शेणाचे आणि हिरव्या पानांचे आणि पाचोळ्यांचे वास घेत तो पडून राहिला.

पण तसेही त्याला फार वेळ पडून राहवले नाही. हात डोक्याखालून घालत लांब करीत शेजारच्या कोनाड्यातली पळी उचलून त्याने गडव्यावर आपटण्यास आरंभ केला. आपण उठलो आहोत हे कळवण्याची ती पूर्वीची खोडकर खूण ! ती नकळत हातून होताच त्याला आपण पूर्ण घरी आल्यासारखे वाटले.

पळीच्या ध्वनिमागोमाग सगळे घर गोंगाटाने भरून गेले. धावत ओरडत मुले खोलीत आली आणि त्याच्या अंगावर पडली. त्यांना दोन्ही हातात घेत 'मला उठू द्या— प्रक्षालन करू द्या.' म्हणत तो त्यांच्याशी खेळू लागला. पत्नी आत येऊन मुलांवर खोटे रागावली. बरेच दिवसांनी पिता मुलांशी खेळत असल्याच्या दृश्याचे सुख तिच्या मुखावर होते. काही काळ मुलांशी खेळल्यावर त्यांना एकेका काखेत धरून तो खोलीबाहेर आला.

सकाळचा बराच वेळ त्याने मुलांबरोबर उद्यानात घालविला; त्यांनी आपण लावलेली रोपे दाखवली, आपापला प्रिय पक्षी दाखविला. पत्नी सारखी अधूनमधून त्यांच्यापाशी येऊन काहीतरी बोलून जात होती. तिलाही त्यांच्यात राहायला हवे होते. तिने शेतावरच्या माणसांना बोलावले असल्याचे सांगितले. मधेच एकदा घरात जाऊन तो मुलांबरोबर खीर प्याला. शेतावरची माणसे येऊ लागली. एकेकाला त्याने खायला प्यायला दिले. ते खातपीत असता बोलू लागले. मागील सहा महिन्यांच्या काळात शेतावर काय झाले हे कळू लागले. दुपारच्या वामकुक्षीनंतर शेतावर जावे. बरोबर पत्नीला घेऊन जावे— चला ! दिनक्रमांना आरंभ झाला. तो स्वतःशी म्हणाला. [ क्रमशः ]


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

# नव्या जाणिवा ( सुशिक्षित दलितांची मनोगते )

अस्पृश्यता हा भारतातला एक ज्वलंत प्रश्न आहे. अनेक समाजसुधारकांनी व राजकारण्यांनी हा प्रश्न सुटावा म्हणून आटोकाट प्रयत्न केले आहेत. ते काहीसे यशस्वी झाले असले तरी, हा प्रश्न संपूर्ण सुटलेला नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर घटनेने अस्पृश्यता नष्ट झाली असली तरी, प्रत्यक्षात मात्र या ना त्या स्वरूपात ती समाजात टिकून आहेच. त्यामुळेच या विषयावर उदंड लेखन, संशोधन झाले आहे व चालू आहे. काही अमेरिकन संशोधकांचे लेख असलेले या विषयावरचे एक चांगले पुस्तक इंग्रजीत उपलब्ध झाले आहे. (द अनटचेबल्स इन कॉंटेंपररी इंडिया, संपादक मायकेल महर). अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी ज्या पदयात्रा वा दौरे काढले जातात त्यात या प्रश्नाचे बारकावे लक्षात येतात. यावरही दोन चांगली पुस्तके मराठीत नुकतीच प्रसिद्ध झाली आहेत (अठरा गावे, अठरा विश्वे, लेखक अनिल थत्ते, एक गाव एक पाणवठा, लेखक बाबा आढाव).

मात्र सर्व या लेखनात दलित जातींच्या माणसांचे या विषयावरचे विचार प्रातिनिधिक स्वरूपात व्यक्त होतातच असे नाही. त्या दृष्टीने प्रा. वसंत देशपांडे यांच्या 'नव्या जाणिवा' या पुस्तकाचे स्वागत केले पाहिजे. लेखकाने विविध सुशिक्षित दलितांच्या मुलाखती घेतल्या आहेत. त्यांपैकी सात मुलाखती या पुस्तकात दिल्या आहेत. या मुलाखती शक्यतो मुलाखत देणाऱ्यांच्या शब्दात देण्यात आल्या आहेत. या सात व्यक्तींत माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, प्रगत शेतकरी, सरकारी अधिकारी, खाजगी कॉंट्रॅक्टर यांचा समावेश आहे. या दृष्टीने या मुलाखती सुशिक्षित दलितांच्या प्रातिनिधिक आहेत असे म्हणावयास हरकत नाही. मात्र या व्यक्तींत समाजाशी निकट संबंध असणाऱ्या डॉक्टर आणि वकील वर्गापैकी व्यक्ती असत्या, तर जास्त बरे झाले असते असे वाटते.

जातीच्या दृष्टीनेही हा व्यक्तिगट प्रातिनिधिक आहे असे म्हणता येईल. यात बौद्ध झालेले मांग, बौद्ध, महार, ढोर व भंगी जातींच्या व्यक्तींचा समावेश आहे.

मात्र पुस्तकातील सर्व मुलाखती पुरुषांच्या आहेत. त्यात एक–दोन स्त्रियांच्या मुलाखती असत्या तर अधिक बरे झाले असते.

यातील सर्व व्यक्तींनी आपल्याला आलेले अनुभव अगदी स्पष्टपणे व्यक्त केलेले आहेत. या सर्व मुलाखतीत एक प्रकारचा मोकळेपणा दिसून येतो. याचे श्रेय अर्थातच मुलाखत देणारे लोक व त्या घेणारा लेखक या दोघांनाही आहे.

या सर्व व्यक्तींना आलेल्या अनुभवात अस्पृश्यतेचे दाहक व अपमानास्पद अनुभव आहेत, पण त्याचबरोबर काही चांगले अनुभवही आहेत. बहुतेकांच्या चांगल्या अनुभवात त्यांना काही शिक्षकांकडून मिळालेले उत्तेजन आहे. हे चांगले अनुभव वाचल्यानंतर जातीयता जाणे अशक्य नाही असे वाटते.

जातीयता कशी जाईल याविषयी या सर्व मुलाखत देणाऱ्या व्यक्तींत काहीशी एकवाक्यता आढळते. शिक्षण हे जातीयता मोडण्याचे प्रभावी साधन आहे. मात्र ते अधिक परिणामकारकपणे वापरले गेले पाहिजे. औद्योगिक विकासामुळे जातीयता आपोआप जाणार नाही. तसेच केवळ कायदे करूनही जाणार नाही. धर्मांतराचे काही मानसिक फायदे असले तरी, त्यामुळे जातीयता जाणार नाही.

या सर्व मुलाखतीत एक विशेष गोष्ट दिसून येते, ती म्हणजे अनेक वाईट अनुभव येऊनही या व्यक्तीत नैराश्य व कटुता आलेली नाही. कदाचित हे, या मुलाखती जीवनात बरेच यशस्वी ठरलेल्या व्यक्तींच्या असल्यामुळे असावे.

लेखकाने पुस्तकाच्या शेवटी मनोगताच्या निमित्ताने म्हणून आपल्या मुलाखतींचे सार दिले आहे. यात शिक्षणामुळे, औद्योगिकरणामुळे धर्मांतरामुळे अस्पृश्यता नष्ट होऊ शकेल. काय याची चर्चा आहे.

मात्र या चर्चेतील एक त्रुटी स्पष्ट कराविशी वाटते. 'विसाव्या शतकात दलितांचे नेतृत्व करणाऱ्या डॉ. आंबेडकरांची फार मोठी भिस्त शिक्षणावर असल्याचे दिसते शिक्षण प्रसारामुळे सामाजिक परिवर्तन अटळपणे येईल असा एक भाबडा आशावाद या विचारामागे होता हे आता आपल्याला सहज कळू शकेल.' (पृष्ठ ६२) यांपैकी दुसरे विधान तितकेसे खरे नाही. डॉ. आंबेडकरांना दलितांच्या मनात जो एक न्यूनगंड होता तो दूर करावयाचा होता. समाजातून अस्पृश्यता दूर होण्यासाठी ती प्रथम तथाकथित अस्पृश्यांच्या मनातून अगोदर गेली पाहिजे, असे त्यांचे मत होते. यादृष्टीने दलितांमधील अस्मिता जागृत करण्याचे शिक्षण हे त्यांनी प्रभावी साधन आहे असे मानले. आणि हे अगदी योग्यच होते. या पुस्तकातील एका मुख्याध्यापकाने देखील असेच मत व्यक्त केले आहे (पृष्ठ ९). केवळ शिक्षणामुळे अस्पृश्यता जाईल असे डॉ. आंबेडकरांनी म्हटलेले नाही, एवढेच नव्हे तर, त्यांनी शिक्षणाच्या मर्यादाही आपल्या काही भाषणात व्यक्त केल्या आहेत, याविषयीचे संदर्भ डॉ. आंबेडकरांच्या लिखाणाचा अभ्यास करणारे सांगू शकतील.

लेखकाच्या मनोगतातदेखील शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे योग्य साधन बनू शकेल असा आशावाद व्यक्त झाला आहे. यादृष्टीने हे साधन अधिक परिणामकारक कसे करता येईल याविषयी लेखकाने अनेक सूचना केल्या आहेत आणि त्यांचा विचार व स्वीकार होणे अतिशय आवश्यक आहे.

लेखकाने औद्योगिक विकासामुळे जातीव्यवस्थेवर फारसा परिणाम का होत नाही याचे चांगले विवेचन केले आहे. मात्र या विवेचनात कार्लमार्क्स व किंग्जले डेव्हिस यांच्या मते औद्योगिक विकास हा जातीव्यवस्थेवर अखेरचा तोडगा आहे असे विधान आहे. या विधानाला काही संदर्भ दिले असते तर अधिक बरे झाले असते.

लेखकाने जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी काही छोटे मोठे उपाय सुचविले आहेत. हे

उपाय शक्य तितक्या लोकांनी एकत्र येऊन करावेत असे आग्रहाने मांडले आहे.

या मुलाखतींनी दलितांच्या व दलिता-संबंधीच्या विचारांचे एक नवे दालन उघडले आहे. सुशिक्षित दलितांनी हे पुस्तक वाचलेच पाहिजे व या संबंधीचे आपले अनुभव व विचार मांडले पाहिजेत. हे पुस्तक ही या संबंधीच्या चर्चेची सुरवात ठरली पाहिजे. असे झाले तरच लेखकाच्या कार्याचे चीज झाले असे म्हणता येईल. अस्पृश्यतेसंबंधीच्या एका नव्या धर्तीच्या या पुस्तकाचे करावे तेवढे स्वागत थोडेच आहे.

--कुश

## Beyond Friendship

**शैक्षणिक समस्यांची चर्चा**

हे विद्यार्थी साहाय्यक समितीतर्फे प्रसिद्ध होणारे अर्धवार्षिक विद्यार्थ्यांना साहाय्य करणाऱ्या संघटना किंवा विद्यार्थी संघटना या विद्यार्थ्यांना वसतिगृह, जेवण-घर, पुस्तकपेढी अशा स्वरूपाचे कार्य करतात, परंतु अर्धवार्षिक या रूपात का होईना पण स्वतःतर्फे शिक्षणक्षेत्रातील विविध समस्यांची चर्चा करण्याचे कार्य विद्यार्थी साहाय्यक समिती Beyond Friendship द्वारा करीत आहे.

महाविद्यालये, शाळा, आपली वार्षिके दरवर्षी प्रसिद्ध करीत असतातच. त्यांमध्ये ललित साहित्याबरोबरच विद्यार्थी अथवा शिक्षक यांनी काही महाविद्यालयीन समस्या, शैक्षणिक समस्या यांची चर्चा केलेली असते किंवा यासंबंधित मुलाखती पाहणी केलेली असते. Beyond Friendship हे तसे विद्यार्थ्यांसाठीच. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी जसे लेख सादर केले जातात त्याचबरोबर शिक्षण-क्षेत्राशी ज्या कोणाचा संबंध येतो त्या सर्वांच्याच समस्यांची इथे मोठ्या जिव्हाळ्याने चर्चा होते. म्हणूनच महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धात जसा एखादा विद्यार्थी आपले विचार मांडतो त्याचप्रमाणे एखादे प्राध्यापकही महाविद्यालयीन रंगभूमीबद्दल आपले विचार सांगू शकतात. शिक्षणक्षेत्रामध्ये ज्याप्रमाणे विद्यार्थ्यांनाही समस्या असतात त्याचप्रमाणे पालक शिक्षक यांच्याही काही समस्या असतात. Beyond Friendship गेली सहा वर्षे पालक–शिक्षक आणि विद्यार्थी शिक्षण-संस्थांचे चालक यांच्या समस्या मांडण्याचे व्यासपीठ झालेले आहे.

जुलै १९७६ च्या Beyond Friendship मध्ये त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे शिक्षण-क्षेत्राशी संबंधित लेख आहेतच पण यावेळेला दोन विषय 'मुलींचे शिक्षण' व 'खाजगी क्लासेस' हे विषय विशेष चर्चेला घेतलेले आहेत.

हल्ली खाजगी क्लासेस हे शाळांइतके आवश्यक मानले जातात. मोठ्या शहरांच्या बरोबर तालुक्याच्या गावासारख्या छोट्या शहरातही खाजगी क्लासेसची संख्या वाढते आहे. Beyond Friendship च्या या अंकात खाजगी क्लासेसची पाहणी आणि पुण्यातील प्रसिद्ध क्लासेसच्या संचालकांचे लेख देण्यात आलेले आहेत. खाजगी क्लासेस ही शैक्षणिक गरज झाली आहे. या अंकातील पाहणी ही विद्यार्थ्यांची क्लास बद्दलची ही मते आणि क्लास संचालकांची मते अशी दोन्ही बाजूंनी करण्यात आलेली आहे. या पाहणीचा निष्कर्ष विद्यार्थ्यांच्या बाजूने क्लासेसला अनुकूलता असाच आहे. ज्या ज्या क्लाससंचालकांनी खाजगी क्लासेस-बद्दल आपले विचार मनमोकळेपणे मांडले आहेत त्यांच्या मते खाजगी क्लासेस ही महा-विद्यालयांशी, शाळांशी स्पर्धा नसून सहकार्य आहे, क्लासेस महाविद्यालयांना पूरक आहेत.

याच अंकातला दुसरा विषय म्हणजे स्त्री शिक्षण– मुलींचे शिक्षण. १९७५ साल आंतरराष्ट्रीय महिलावर्ष म्हणून निनादले. रकानेच्या रकाने भरले. त्यानंतर त्या विषयाला कसलीच गती मिळालेली नाही. आजच्या शिक्षण पद्धतीत मुलींसाठी नेमके काय हवे आहे याबद्दलचे या अंकातील विचारप्रवर्तक लेख विचार करायला लावणारे आहेत. मुद्रणासारख्या क्षेत्रातही स्त्रीया पुढे येऊ शकतील म्हणून मुद्रण क्षेत्रात स्त्रीयांना काय करणे शक्य आहे हा लेखही अतिशय मार्गदर्शक आहे.

या अंकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यापीठाच्या विविध शाखांतून अभ्यासपूर्ण प्रबंध तयार होत असतात त्यातील शिक्षण-शाखातील प्रबंधावर आधारलेले लेख-प्रबंधांच्या लेखकानीच लिहिलेले– सादर करण्यात आले आहेत. अशा तऱ्हेने ते संशोधन सर्व-सामान्य व्यक्तिपर्यंत पोहोचवण्याची ही प्रथा अभिनंदनीय अशीच आहे.

१९७२ सालापासून महाराष्ट्र शासनाने शिक्षणक्रमाचा १०+२+३ हा नवा आकृती-बंध स्वीकारला. शिक्षणाची पुनर्रचना होऊ लागलेली आहे. या पुनर्रचनेसाठी जे तत्त्व-ज्ञान अंमलात आणले जाते आहे, शिक्षण जीवनोपयोगी बनविण्याची दृष्टी घेऊन जे प्रयत्न केले जात आहेत. त्या प्रयत्नांसाठी शिक्षणक्षेत्रातील समस्यांवर सतत चर्चा होणे अतिशय आवश्यक झाले आहे. त्यामुळे Beyond Friendship जेव्हा आकृतीबंधातील समाजसेवा, ती घेतानाच्या अडचणी, मुलींचे शिक्षण, मुक्त विद्यापीठ यासारखे लेख सादर करते, त्यावेळेला त्याचे महत्त्व अतिशय वाढते. आजच्या शिक्षणपद्धतीत चांगले काय, वाईट काय, कमी काय पडते याची सखोल चर्चा करणारे यातील लेख विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि जिज्ञासू यांसाठी माहितीपूर्ण तर आहेतच पण महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्यालासुद्धा सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शक, उपयोगी ठरावेत एवढी त्या लेखाची किंमत आहे.

विद्यार्थी साहाय्यक समिती विद्यार्थी–विद्यार्थिनीसाठी अल्प दरात वसतिगृहे आणि भोजनगृहे देण्यासाठी अभिनंदनाला पात्र झालेलीच आहे. परंतु शिक्षणक्षेत्रात समस्यांची चर्चा, बौद्धिक देवाणघेवाण समस्या


**पूर्णिया**

**अनिल अवचट**

**किंमत : सहा रुपये**

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

पुढे ठेवणे या गोष्टींची जी आवश्यकता असते ती गरज बऱ्याच प्रमाणात पूर्ण करत आहे. त्यामुळे ती परत एकदा अभिनंदनाला पात्र झाली आहे.

—लता भिसे

---

## Helter Skelter

The true story of the manson murders– (No. 1 Bestseller)– By Vincent Bugliosi with Curt Gentry– Bantam Books, Pages 676, Rs. 18–35.

---

'चार्लस् मेन्सन अॅन्ड फॅमिली' या टोळकीने केलेल्या हत्याकांडाला अमेरिकेत भरपूर प्रसिद्धी मिळाली होती. इतर कोणत्याच खूनप्रकरणाला (केनेडींचा सोडून) एवढी प्रसिद्धी मिळालेली नाही. त्या टोळकीने 'शेरॉन्-टेट–लाबियानका' यांची हत्या केली. कोर्टात निव्वळ त्या खटल्यानेच ५९१६ पाने भरली. इतर खून वेगळेच. दीड वर्षात 'हेल्टर-स्केल्टर' या पुस्तकाच्या ३२ आवृत्त्या निघाल्या! त्या खटल्यातील वकीलानेच हे पुस्तक कर्ट जन्ट्रीच्यासह लिहीले आहे. 'कास्ट ऑफ कॅरेक्टर्स' छापण्यात पुस्तकाची सात पाने गेली आहेत. प्रत्येक पानावर दोन कॉलम असा शेवटचा बारीक टाईपमधला 'इंडेक्स' १२ पानी आहे. त्यामुळे या पुस्तकाने अमेरिकेत एवढी धमाल उडवून दिली आहे यात नवल नाही.

शनिवार ९ ऑगस्ट १९६९ चा दिवस होता. शेरॉन टेट (व्हॅली ऑफ द डॉल्स मधील) ही प्रख्यात नटी आपल्या लॉस एंजेलीसजवळील टेकडीवरच्या अलिशान बंगल्यात पाहुण्यांची बडदास्त ठेवत होती. आणि तिच्या मनात कसले तरंग येत होते! तिला आठ महिने गेले होते. ती अगदी तरुण होती. देखणी होती. तिच्या आयुष्यात एक नवीन प्रकरण घडणार होते. मुलाचा जन्म म्हणजे स्त्रीच्या आयुष्यातील परमोच्च क्षण. त्या क्षणाची ती उत्कंठेने वाट पाहत होती. तिला काही कमी नव्हते. तिचा पती रॉमन पॉलान्सकी हा एक नावाजलेला डायरेक्टर आहे. तिने स्वतःही बराच पैसा कमावला होता. दिवस जात होते. तिच्या पोटातील ते अर्भक वाढत होते. ते वाढते अर्भक व तिचे ते घर हेच तिच्या आयुष्यात सर्वस्व झाले होते. त्या घराला ती 'लव्ह हाऊस' म्हणत असे.

पण अमृताने भरलेला पेला ती ओठाला लावते न लावते, तोच कसला प्रहार त्या 'लव्ह हाऊस' वर कोसळला! त्या शनिवारी हिप्पीचे एक टोळके त्या घरात घुसले व शेरॉन टेटसह पांच लोकांची निर्घृण हत्या त्या टोळीने केली! शेरॉन टेटच्या छातीवर असंख्य चाकूचे वार केले गेले. चाकूचे पाते तर हृदय, फुप्फुसे व लिव्हरपर्यंत पोचले. तिने शेवटची एक याचना करून पाहिली. ती म्हणाली, 'माझ्या पोटातल्या मुलासाठी तरी मला मारू नका.' पण बिटल् म्युझिक् व LSD ने झिंगलेली, दयामायेच्या पलीकडे गेलेली व अंतःकरण वाऱ्यावर झुगारून दिलेली ती मंडळी! तिला ठार मारूनच ती स्वस्थ बसली नाहीत, तर तिच्याच दारावर त्यांनी PIGS असे शेरॉन टेटच्या रक्ताने लिहीले.

ही मंडळी 'चार्लस् मेन्सन् अॅण्ड फॅमिली' या नावाखाली ओळखली जात होती. या 'फॅमिली' ने सुमारे चाळीस खून केले आहेत. अचानकपणे घरात शिरून तेथील व्यक्तीचा खून करून त्याच्याच रक्ताने दारावर 'हेल्टर स्केल्टर' व 'Pigs' वगैरे अक्षरे लिहून ते पळून जायचे.

शेरॉन टेटबरोबरचे ते पाहुणे त्याच दिवशी निरोप घ्यायच्या तयारीत होते. पण शेरॉनने त्यांना आग्रह करून आणखीन काही दिवस राहण्याची विनंती केली होती. त्या पाहुण्यांची सुद्धा त्यात कत्तल झाली.

या मंडळींत 'हेअर स्टाईलीस्ट' जे सेब्रीन्ज हा होता. जॉर्ज पेपार्डचे केस सेट करण्याकरिता त्याला एकदा लंडनहून बोलावण्यात आले होते. त्या कामासाठी त्याने २५,००० डॉ. आकारले होते. त्याला मारून त्याच्या तोंडावर एक टॉवेल दोराने बांधला व त्या दोराच्या दुसऱ्या टोकाने शेरॉन टेटचा मृतदेह बांधला.

आणखीन एक प्रणयी युगुल त्या पाहुण्यात होते. युवतीचं नाव होतं अॅबीगेल फॉल्जर व युवकाचं नाव होतं वॉयटेक् फॉरकॉवस्की. अॅबीगेल ही गडगंज कॉफी इस्टेटची मालकीण होती. अॅबीगेलवर तर इतके चाकूचे वार केले गेले होते की, तिचा पांढराशुभ्र झगा अगदी तांबड्या रंगाचा झाला होता. तिचा प्रियकर फ्रॉयकॉव्हस्की ह्याला दोन गोळ्या झाडण्यात आल्या, डोक्यावर १३ वेळा प्रहार केले गेले आणि चाकूचे एकावन्न वार केले गेले. याच टोळकीने दुसऱ्या दिवशी लेनो लाबियानका (ह्याची बरीच किराणा मालाची दुकाने होती.) व त्याची पत्नी रोजमेरी ह्यांची अशीच हत्या केली.

या सर्व खुनांच्या झालेल्या प्रसिद्धीमुळे चार्लस् मेन्सन् याचा फोटो 'लाईफ' मासिकाच्या कव्हरवर आला. त्यामुळे 'फॅमिली' ला केवढा गर्व वाटला!

खून करणाऱ्या या 'मेन्सन-फॅमिली' मध्ये १७–१८ वर्षांची मुलं-मुली होतो. चार्लस् मेन्सन हा एक बुटका, ५ फूट २ इंच उंचीचा स्वतःभोवती एक विशिष्ट प्रकारचे वलय असलेला मनुष्य आहे. अमेरिकेत 'डेथ पेनल्टी' रद्द झाल्यामुळे तो कैदेत आहे. मनुष्यस्वभावाचा त्याला चांगलाच अभ्यास होता. आपल्या प्रत्येकाच्या प्रत्येक विषयावर ठराविक कल्पना असतात. आपल्याच मताबरोबर कुणी सहमत झाल्यावर आपल्याला फार समाधान वाटते व सहमत होणाऱ्याबद्दल जिव्हाळाही वाटतो. हे सर्व हेरून त्यांनी आपले बरेच शिष्य मिळवले होते. लेखकानी तर चार्लस् मेन्सन आणि हिटलर यांच्यामध्ये असे साम्य दाखवले आहे.

हिटलर शाकाहारी होता. मेन्सन पण शाकाहारी आहे. हिटलर बुटका होता व मेन्सनही तसाच आहे. दोघांनाही आपल्या तरुणपणी मानसिक जखमा झाल्या होत्या. दोघांनाही (illegitimacy)ची झळ लागली होती. मेन्सन स्वतः bastard आहे. हिटलरचे वडीलही bastard होते. दोघेही भटके होते. ते दोघेही मान्यता न मिळालेले व वैफल्याने ग्रासलेले कलाकार होते. दोघांनाही मनुष्यापेक्षा प्राणीच जास्त आवडत असत. दोघांनाही गूढविद्येची अती आवड होती. दोघेही दुसऱ्यांच्याकरवी खून करून घ्यावयाचे दोघेही कट्टे racists होते. तीच गोष्ट सारखी सारखी सांगून ते आपल्या शिष्यांची मने बदलून टाकत. हिटलरचे डोळे hypnotic होते. मेन्सनचे तसेच आहेत. दोघांनीही जर्मन तत्त्वज्ञानी नित्शेला आपला गुरू मानला होता. (नाझींनी आपल्याला Suit होईल असे

नित्शेचे तत्त्वज्ञान ट्वीस्ट केले हे नित्शेचे दुर्दैवच ! पण मुळातच नित्शेचे तत्त्वज्ञान असे आहे की, त्यातून जितके अर्थ काढावे तितके कमीच ! नित्शेचे सर्वांत प्रख्यात पुस्तक म्हणजे Thus Spake Zarathustra. हे एक गद्य पुस्तक आहे पण ते इतक्या सुंदर शैलीत लिहीलेले आहे की, ते एक जर्मन भाषेतील काव्यच समजले जाते.

हिंसक पुस्तकांचा नेपोलिअन म्हणजे अँथनी बर्जेसचे 'क्लॉक वर्क ऑरेंज' असं सांगणारं हे पुस्तक. 'Violence for the sake of violence' हिंसाला व खुनाला काही motive नसतो. हे पुस्तक १९६५ साली प्रसिद्ध झाले. त्या पुस्तकावर स्टेनली क्युब्रीकने त्याच नावाचा एक सिनेमाही काढला आहे. त्यात एक अलेक्स नावाचा १५-१६ वर्षांचा मुलगा असतो. रात्री त्याच गटातल्या वयातील मुले जमा करून तो हिंसाचार करावयास बाहेर पडे. रस्त्यात एक वृद्ध गृहस्थ पुस्तक घेऊन जात असता अलेक्स आणि मंडळी त्याला बेदम मारहाण करतात व त्याच्या हातातली पुस्तके फाडून टाकतात. थोड्या वेळाने दुसऱ्या एका गँग-बरोबर मारामारी करतात. त्यात आणखी थोडे समाधान मिळाल्यावर एक मोटार चोरतात व दूरवर निवांतपणा हवा असलेल्या एका लेखकाचे दार ठोठावतात. 'आम्हाला फोन करावयाचा आहे. इमर्जन्सी आहे.' असे सांगतात. म्हणून लेखकाची पत्नी दार उघडते. तेथे तिच्यावर बलात्कार करतात. त्या लेखकाचे वाचनालय उद्‌ध्वस्त करतात व त्याच्या हस्तलिखिताचा नाश करतात. अँथनी बर्जेसला पुढच्या पिढ्या कशा होतील हे या पुस्तकात दाखवायचे आहे. त्यांनी हे पुस्तक लिहिल्यानंतर थोड्याच वर्षांनी 'मेन्सन फॅमिली' सारखे गुन्हे बरेच वाढले. म्हणजे अँथनी बर्जेसने predict केलेल्या बऱ्याच गोष्टी खऱ्या ठरायला लागल्या.

आणि परस्परविरोधी Personality traits किती लोकांना मिळतात ? यांत सर्व मोठमोठे लोकसुद्धा येतील. हेन्स ख्रिश्चन एंडरसन (परीकथावाला) इतका कंजूष होता आणि इतका उदार होता की त्याला एका टीकाकाराने generous miser म्हटले आहे. त्याच्यात इतर अनेक परस्परविरोधी traits होते. आणि नित्शे-ज्यांनी Thus Spake Zarathushtra लिहीले तो-त्याला शारीरिक व मानसिक स्वास्थ्य कधीच लाभले नाही. काय झाला त्याला त्याच्या फिलॉसॉफीचा उपयोग ? नोबेल प्राईझ विनर थॉमस मेन ह्यांनी genius व sickneas यात काहीतरी संबंध आहे ते सिद्ध करण्यासाठी 'डॉ. फॉस्टस' लिहिले. व्हर्जिनिया वुल्फ या प्रसिद्ध कादंबरीकाराचे शेवटचे दिवस किती हालात गेले ते तिच्या वाचकांना माहीत असेलच. चित्रकार व्हेन घोगने स्वतःचे केलेले हाल ज्यांनी 'लस्ट फॉर लाईफ' वाचले असेल त्यांना माहीत असेलच. नोबेल प्राईझ् विनर हेमींग्वेनी (barrel chested, tough, pleasure loring, optimistic हेमींग्वे) आत्महत्या करून घेतली ! सिल्व्हिया प्लाथ, तिच्या कविता व तिच्या death wish बद्दल अमेरिकेत बरीच चर्चा झाली आहे. एकदा Yeats ओरडला होता, 'How ironic that the hightest seat of love is an organ of human excretion डॉस्टॉव्हेस्की व काफ्काचे Febrile psyche-अशी किती तरी नावे अजून मिळतील. आपल्या हिंदुस्थानात गुरुदत्त, सैगल वगैरे कलाकारांच्या हकीकती सर्वांना माहिती असतीलच. म्हणजे मानवात creative upsurge आणि death wish (म्हणजेच perversion व sadomosochism चा एक प्रकार) यांचे द्वंद्व सतत चालू असते. आता कोणी म्हणेल की या scheme of things मध्ये sadomosochism नाही ? आणि जर Universal scheme of things मध्येच sadomosodism असेल तर मानवात ती असल्यास नवल आहे काय ?

कुणास ठाऊक, याच योजनेखाली इतर ग्रहांवरसुद्धा पायापेया आधी १०० वा मजला बांधला गेला असेल आणि शेवटी म्हणूनच ती ओसाड व निर्जीव झाली असतील !

कधी कधी गुन्हेगारांचे chromosomes च abnormal असतात. आणि असे गुन्हेगार अनादिकाळापासून आपल्याभोवती आहेत. पण मानवनिर्मित गुन्हेगार-म्हणजे समाजाविरुद्ध बंड करणारे, depersonalise होऊन एका १०×१० च्या खोलीत सात सात लोक शहरात राहणारे, निसर्गाशी पूर्णपणे फारकत घेतलेले गुन्हेगार-त्याला जबाबदार कोण ?

जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


**SOME NEW TITLES RECEIVED**

| | |
|---|---|
| 1. Our Films, Their Films – Satyajit Ray | Rs. 60·00 |
| 2. Trinity – ( Bestseller – Novel ) – Leon Uris | Rs. 16·50 |
| 3. The Joker In The Pack – ( Thriller ) – James Hadley Chase | Rs. 10·00 |
| 4. Get A Load of This – ( Thriller ) – James Hadley Chase | Rs. 9·00 |
| 5. The Golden Gate – ( Bestseller – Thriller ) – Alistair Maclean | Rs. 10·00 |
| 6. Marathon Man – ( Bestseller – Novel – Book of the Month ( Club Thriller ) – William S. Goldman | Rs. 19·00 |
| 7. Malevil – ( Bestseller – Novel – An atomic explosion destroys everyone put one family. The book is a Chronicle of its Struggle for Survival – Robert Merle | Rs. 19·00 |
| 8. Elenor And Franklin – ( Bestseller – Nonfiction – Read about Franklin D. Roosvelt's marriage with its painful secrets and public triumphs ! ) – Joseph P. Lash | Rs. 20·00 |
| 9. Napoleon – ( Bestseller ) – Famous biography – Emil Ludwig | Rs. 10·00 |

**THE PHOENIX LIBRARY**
727, Sadashiv Peth, Poona – 30

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २८।८।७६ ते ३।९।७६

**मेष : विरोधक नमतील**

मेष राशीच्या माणसांना सध्याचा काळ अनेक बाबतीत आशादायक व प्रगतीत भर घालणारा आहे. त्यांनी स्वतःचे मन स्वच्छ ठेवून येणारी संधी घ्यावी व नवे बेत आखावेत. अंतरिक्षातील रवी-मंगळ हे ग्रह सध्या तरी तुमच्यावर अतिशय खूष आहेत. आठवड्यातील पहिले चार दिवस तर, जे जे कराल त्यात अभूतपूर्व यश मिळणार आहे. नव्या धंद्याची सुरुवात करा. मनात ठरवले असेल तसे होईल. धंद्यासाठी कर्ज जामीन व इतर साहाय्य उपलब्ध होईल. कौटुंबिक स्वास्थ्य मात्र अजून लांब आहे. तसेच नातेवाईक व मित्र यांच्याकडून तशी मदत मिळणे कठीणच. अनेक दिवसाची नोकरीतील महत्वाकांक्षा पुरी होईल. शुभ दिनांक ३०–१

**महिलांना :** नोकरीची गरज असेल तर त्याला उपकारक असेच घडेल.

**विद्यार्थ्यांना :** स्वावलंबी बनण्याची संधी उपलब्ध होणार आहे. पैसा व लिखाण दोन्ही जमेल.

**वृषभ : आशादायक काळ**

राशीत सुखस्थानी गुरू, स्वगृही रवी व पंचमस्थानी मंगळ हे अंतरिक्षातील बलवान ग्रह सध्या तुम्हाला अनुकूल आहेत. त्याचा लाभ उठवणे तुमच्या हाती आहे. यश मिळेल. सफलता हाती येईल. प्रगतीच्या नव्या दिशा सापडतील. धंदा तेजीत चालेल. नव्या योजना कार्यान्वित करू शकाल. आर्थिक परिस्थिती बऱ्याच अंशी समाधानकारक राहील. नोकरीतील वातावरण उत्साहवर्धक राहील. वरिष्ठांबरोबर जवळीक निर्माण होईल. मालक तुमच्या हुशारीवर खूष राहतील. बेकारांचे संकट टळेल. शुभ दिनांक २८–३०

**महिलांना :** नृत्यसंगीत सिनेनाट्य वगैरे क्षेत्रात गाजावाजा होईल, प्रसिद्धी मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** चाकोरी सोडून नवी कार्यक्षेत्रे पादाक्रांत करा. श्रेय-समाधान मिळेल.

**मिथुन : अडचणींचा परिहार**

अनेक दिवसांच्या अंधकारमय वातावरणातून तुम्ही बाहेर येणार आहात हे लिहायला मला आनंद वाटतो. तिसरा रवी गुणांना प्रोत्साहन मिळवून देईल. गुणाबद्दल इतरांच्या मनात आदराची भावना निर्माण करील. उद्योगाला चालना मिळेल. थांबलेली योजना कार्यवाहीत आणण्यासाठी नवी संधी उपलब्ध होईल. नोकरीच्या क्षेत्रात काही तरी अनुकूल व स्थायी स्वरूपाचे घडू शकेल. नोकरी बदलू शकाल ती हिताची ठरेल. लेखनाला अनुकूल संधी मिळेल. ग्रंथ प्रकाशनाचे श्रेय मिळेल. पैसा कमी पडणार नाही. शुभ दिनांक २९–३१

**महिलांना :** गैरसमजाचे धुके दूर होईल. स्वतःचा उद्योग सुरू करायला अनुकूलता आहे. पैसा बरा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** प्रसिद्ध वाङमयसेवकाचा सहवास लाभेल प्रसन्नता लाभेल.

**कर्क : नव्या दालनात प्रवेश**

आठवडा खूपच समाधानकारक आहे. मागच्या आठवणी काढून उगीच त्यात अडकून पडू नका. मित्रपरिवार उत्तम साथ देईल. उद्योगधंद्यात अधिक लक्ष घाला. दुसरा रवी व तिसरा मंगळ यशाची नवी दालने दृष्टिपथात आणील. नवे उद्योग काढा किंवा त्यात योजनाबद्ध असे फेरबदल करा. त्रास होणार नाही. आर्थिक बाजू भक्कम होईल. रेसची धाव मर्यादित प्रमाणात लाभदायक होईल. उद्योगधंद्यासाठी भांडवल मिळेल. कर्जवसुलीत अगर नोकरीत तुम्ही मित्रांना दुखावले असेल तर पश्चाताप करण्यात अर्थ नाही. बेकारांना अपेक्षापूर्वीच आनंद मिळेल. गुंतवणुकीचे क्षेत्र विस्तारेल. शुभ दिनांक ३१–२

**महिलांना :** नोकरीचा शोध लागेल व अनपेक्षित आनंद पदरात पडेल. शुभदायक घटना घडतील.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षण व नोकरी या दोन्ही बाबी अनुक्रमे लाभतील. यात अपयश येणार नाही.

**सिंह : राजकीय यश**

राशिस्वामी राशीत बलवान असतांना तुम्ही कशाची काळजी करता आहात ? आता तुम्ही जिंकणार आहात. ज्यांनी तुमच्याविरुद्ध कट केले, कारस्थाने रचली ते शरण येतील. राजकारणात पुढे पाऊल पडेल. कोणत्याही प्रकारचा मान सत्ता पदरात पडेल. बुद्धीचे तेज प्रकाश पाडून जाईल. आगामी काळातील मदत लाभदायक होईल. नोकरीत अपेक्षेपेक्षा मोठे लाभ पदरात पाडून घेता येतील. राजकारणात मोठे स्थान पदरात पडणार आहे. प्रवासात लाभलेले मित्र उपयोगी पडतील. नव्या योजना आकार घेऊ लागतील. पैशाची टंचाई तुम्हांस उरणार नाही. येणारे पैसे येतील. दुय्यम धंद्यास बराच काही खर्च लागेल. प्रवास सुखाचा होईल. शुभ दिनांक ३१–२

**महिलांना :** स्थानांतराची चिंता करू नका. सार्वजनिक सेवेने मोठे फळ पदरात पडेल. लाभदादक योजना स्वीकाराव्या.

**विद्यार्थ्यांना :** कर्तृत्वाला मोठे क्षेत्र उपलब्ध होईल. संधीचा लाभ उठवा.

**कन्या : भीती बाळगू नका**

रवी बारावा आहे पण मंगळ राशीतच आहे. कशाची भीती बाळगू नका. गेले काही दिवस तुमच्याविरुद्ध ज्या लोकांनी विनाकारण कट रचला होता तेच आता आपली चूक कबूल करणार आहेत. नोकरीत थोडी फार प्रतिष्ठा वाढेलच. वरिष्ठांच्या मनात साहानुभूती निर्माण होईल. नोकरीत तुम्हाला जे फायदे आजवर मिळू शकले नाहीत ते फायदे आता मिळू देण्यासंबंधी त्यांच्या मनात विचार निर्माण होईल. कामाची दगदग थोडी कमी होईल. आरोग्याच्या तक्रारी राहणार नाहीत. शुभ दिनांक १–२

**महिलांना :** आरोग्याची काळजी राहणार नाही. घरगुती कामाचा ताण थोडाफार कमीच होईल. आर्थिक पेचप्रसंग सुटण्याच्या मार्गाला लागतील.

**विद्यार्थ्यांना :** मन प्रसन्न राहील. अविचार मनात येणार नाही.

**तूळ : धाडस नको**

रवी सिंह राशीतच आहे त्याला मोठे महत्त्व आहे. आगामी काळातील अनेक महत्त्वाच्या घटनांची चाहूल यावेळी लागण्याची शक्यता आहे. राजकारणात पुढे पाऊल पडेल व्यापार सुधारेल, अनेक क्षेत्रे कर्तबगारीने गजबजतील, तरीपण मंगळ बारावा आहे तो

पाय मागे ओढण्याचा प्रयत्न करणार आहे. यशाच्या क्षेत्रात संघर्ष निर्माण करू पाहणार आहे. त्यामुळे कौशल्याने वागणे अतिशय जरूर आहे. आर्थिक बाजू थोडीफार दुर्बल राहील. पैसा आला तरी तो हाती राहणे अवघडच. शुभ दिनांक ३०–३१

**महिलांना :** महत्त्वाकांक्षा आणि संघर्ष अशा परिस्थितीतून यश पदरात पडणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** भांडण्याची प्रवृत्ती टाळा. परिस्थितीवर लक्ष ठेवा.

**वृश्चिक : आशा पालवतील**

अनेक बाबतीत हा आठवडा अनुकूल लाभदायी ठरणार आहे. रवी दहावा, तर मंगळ अकरावा असे ग्रहमान असेल तर, माणसाकडून इतिहास घडतो. मंगळ तर तुमच्या राशीचा स्वामी आहे. त्यामुळे यावेळी तुमच्या आशांना कर्तृत्वाची जोड मिळेल व यश पदरात पडेल. नोकरीत आजवर अप्राप्त वाटणारे पद पदरात पडेल. पगार वाढेल. उद्योगात अडचणी संपून नव्या पर्वाची सुरूवात होईल. तुमचा कोणताही धंदा असो प्रगतीच्या नव्या वाटेवर पदार्पण करणार आहे. शुभ दिनांक २६–३०

**महिलांना :** नोकरी व्यवसाय सुधारेल. लॉटरीच्या निमित्ताने यश पदरात पडेल. गृहसौख्य मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** आता कोणत्याच अडचणी नाहीत. यशाचा पर्वकाल सुरू झाला आहे.

**धनू : नोकरीत स्थैर्य**

दहावा मंगळ म्हणजे ईश्वराचे एक वैभवशाली लेणे असते. माणूस महत्त्वाकांक्षी बनतो. त्याचे गुण विकसित होतात व त्याच्या कर्तृत्वाचा नवा पर्वकाल सुरू होतो. धनू राशीच्या व्यक्तींनी हे मुद्दाम लक्षात ठेवावे. नोकरीच्या बाबतीत नवे तेज निर्माण होईल. स्थैर्य येईल. प्रमोशन, बढती असे काहीतरी घडू शकेल. आर्थिक बाजू सुधारेल. भाग्यस्थानी रवी ही आणखी एक पर्वणी. यावेळी तुम्ही जे जे कराल ते ते यश आणि प्रगतीचा वसा घेऊन उभे राहील. आरोग्य सुधारेल. उत्साह द्विगुणित होईल. शुभ दिनांक २९–३१.

**महिलांना :** हा छान काळ आहे. अपेक्षा सफल होईल. आशाआकांक्षा उंचावतील.

**विद्यार्थ्यांना :** ग्रहमान अनुकूल आहे. महत्त्वाकांक्षेची झेप आकाशात भरारी घेईल.

**मकर : यश दुणावेल**

आठवा रवी तेवढासा चांगला नाही. राजकारण व उद्योगात थोडीफार माघार घेण्याची स्थिती निर्माण होईल. तरीपण आर्थिक बाजू चांगली राहील. रेस अगर लॉटरीच्या मार्गाने पैसा मिळेल. स्थावराचा प्रश्न सुटेल. वाद असल्यास तो मार्गी लागेल. यावेळी तुमच्यापैकी एखादा भाग्यवान परदेशी प्रयाण करील. अप्रसन्नता दूर होऊन आरोग्यदर्शन होईल. भाग्यस्थानी मंगळ ही एक पर्वणी आहे. धंदा व उद्योग समृद्धीचे नवे वळण घेतील. नव्या योजना प्रवर्तीत होतील. नोकरीत काही चांगले घडू शकेल. शुभ दिनांक ३१–२.

**महिलांना :** अनारोग्याच्या तक्रारी दूर होतील. कौतुकाचे चार शब्द ऐकण्याचे भाग्य लाभेल.

**विद्यार्थ्यांना :** शिष्यवृत्ती मिळू शकेल. पैसा मिळेल.

**कुंभ : अनुकूल वातावरण**

चौथा गुरू, सातवा रवी व आठवा मंगळ असे सध्या तुमचे ग्रहमान आहे. हे ग्रहमान जरी काही खास असे वाटत नसले तरी, अनपेक्षित बदल घडून येण्याची शक्यता आहे. राजकारण व नोकरी या दोन्ही क्षेत्रांत थोडाफार अनुकूल बदल घडेल. अनेक दिवसांच्या अपेक्षा पुऱ्या होऊ लागणारे वातावरण निर्माण होईल. आर्थिक बाजू भक्कम होईल. रेस व लॉटरीत पैसे मिळू शकतील. धंद्यातील समस्या सुटण्याच्या मार्गी लागतील. अति उच्चपदस्थ व्यक्तीबरोबर संबंध येतील. ते भावी काळात उपकारक होतील. नोकरीत स्थैर्य मिळेल. शुभ दिनांक ३०–३१.

**महिलांना :** प्रामुख्याने नोकरीतील अपेक्षा पुऱ्या होतील. दुय्यम धंदा सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** नवे वाहन मिळेल. उत्साह वाढेल.

**मीन : थोडी सावधगिरी हवी**

शत्रुस्थानी रवी आहे तो विरोधकांना चांगलाच धडा शिकवणार आहे. तरीपण तो गुप्त शत्रुत्व निर्माण केल्याखेरीज राहणार नाही. म्हणून सर्वच बाबतीत सावध राहणे आवश्यक आहे. गुप्त बातम्या कुणाजवळच बोलू नका. लेखकांनी थोडीफार काळजी घेतलेली बरी. नोकरीत यश हाती पडायला फार श्रम पडतील. कारण विरोधकांच्या कारवायांना तोंड द्यावे लागेल. पण यश मिळेल हे महत्त्वाचे. सांसारिक स्थिती थोडीफार नरमगरम राहील. शब्दाने शत्रू वाढवू नका. मतभेद टाळणे आवश्यक आहे. यावेळी प्रवास टाळा. शुभ दिनांक १–२.

**महिलांना :** यशस्वी होऊ शकाल, पण श्रम फार करावे लागतील. लेखिकांना प्रसिद्धी व लोकप्रियता मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** अपेक्षा-साफल्याची चाहूल लागेल. यशाने आनंद वर्धमान होईल. □

## पॅरिस, आय लव्ह यू

पृष्ठ ५ वरून

शास्त्रीय दृष्टिकोन नाही.'

'ह्याविषयी मला तरी काही मत देता येणार नाही. ह्या दृष्टिकोनातून मी कधी विचारच केला नाही. विचार करायची जरूरीपण भासली नाही'

जास्त वैयक्तिक गोष्टींनी गुंता वाढवण्यात स्वारस्य नव्हतं. त्यांनीही अप्रत्यक्षपणे त्याविषयी नापसंतीच दर्शविली.

'आजचा तरुण चर्चमध्ये येत नाही. फक्त म्हातारी आणि मुलं तेवढीच दिसतात. तुम्हास वाटतं चर्च ही धर्मसंस्था काही दिवसांनंतर राहणार नाही?'

'दे आर रिलिजस अॅट हार्ट. त्यांना ट्रॅडिशनल इन्स्टिटयूशन कोणतीच नको आहे. पण हे सारं बदलेल असे मला वाटतं. ते चर्चसकडे वळतील.''

'आजच्या तरुणतरुणी लग्न करीत नाहीत. तसेच राहतात. कसलीच मर्यादा पाळत नाहीत. स्वैर वागतात. ह्याचा अंत काय?'

'हे सारं बदलेल. मी भविष्यात आस्था बाळगून आहे'

ते तोंडाला पाईप लावतात. वेळही बराच झाला असतो. मी त्यांना मेर्सी (थॅंक यू) म्हणतो. माझ्याजवळची एक रुद्राक्ष माळा त्यांना अर्पण करतो. एक प्लॅस्टर ऑफ पॅरिसचं मिथुन पॅनेल त्यांना देतो. ते सारखं त्याकडे पाहत राहतात. म्हणतात–'ब्युटिफुल. सी. धिस इज इरॉटिक; बट इट टेक्स् यू बियॉंड इरॉटिक फीलिंग. धिस इज रियली अॅन आर्ट.'

मला मित्रांना इन्व्हॅलिडसला भेटायचं असतं.

मी त्यांचा निरोप घेतो. निघताना ते म्हणतात,–'क्षमा कर. तुला सोडायला मला विमान तळावर येता येणार नाही.'

'डझन्ट मॅटर. यू वेअर व्हेरी काईंड टू मी ऑलदीज डेज'

'यू आर सो अकोमोडेटिव्ह, एनीबडी वुईल बी हॅपी टू हॅव्ह यू अॅज गेस्ट.' बोलता बोलता ते हसत असतात.

'मेर्सी'–मी त्यांचा हात हातात घेतो.

मोठा मुलायम हात आहे त्यांचा. डोळ्यात मला एक निरागस निष्पाप मुलगा दिसतो. ते पाईप ओठांना लावून परत वाचत बसतात.

[ क्रमशः ]

हिंदी चित्रपट

## आधुनिक वाल्मिकीची मोहक फसवी आवृत्ती :

# अर्जुन पंडित

शिरीष सहस्रबुद्धे

अर्जुन पंडित हा हृषिकेश मुकर्जी आणि गुलजार यांनी एकत्रितपणे काम केलेला चित्रपट. बऱ्याच कालावधीनंतर जमलेल्या या जोडीचा चित्रपट, आणि गुलजारचं नाव सध्या यशकीर्तीबरोबर जोडलं गेलेलं असलं तरी, हृषिकेषची कमान चढती राहिलेली नाही. विशेषत: 'मिली' या 'आनंद' च्या female edition मुळे त्यांच्यावर झालेली टीकाटिप्पणी लक्षात घेता हृषिदा स्वत:च्या वेगळेपणाचीच–अर्थात त्या काळचा वेगळेपणा जेव्हा आणि ज्यामुळं ते श्रेष्ठ दिग्दर्शक ठरले-एक चाकोरी, एक रिंगण करून घेताहेत की काय, अशी साधार भीती सामान्य प्रेक्षकांनाही वाटणं अशक्य नाही. त्यांच्याबद्दलच अशी भीती वाटायचं कारण एवढंच की, दिग्दर्शकानं आपला चाहता प्रेक्षकवर्ग निर्माण केल्याची उदाहरणं, हिंदीतच नव्हे, तर भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातच अगदी मोजकी, हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच भरतील. हृषिदांचं नाव मात्र निश्चितपणे त्यांच्यामध्ये समाविष्ट करावं लागेल. सत्यजित रॉय, व्ही. शांताराम, कै. विमल रॉय, कै. गुरुदत्त ही इतरांपैकी काही बुजुर्ग मंडळी, तर अलिकडे हेच स्थान गुलजार, बासू चतर्जी, श्याम बेनेगल वगैरे मिळवू पाहत आहेत. अर्थात अशा दिग्दर्शकांना मिळणारे यश व्यावहारिक व्यावसायिक दृष्टीनं बहुधा मर्यादित असतं, कारण शोले 70 M. M. चालू असताना 'निशांत' किंवा आता 'अर्जुन पंडित' सारखे चित्रपट पाहण्याचा वेडेपणा करणारे प्रेक्षक केव्हाही थोडेच. तर ताजा विषय आहे 'अर्जुन पंडित'चा. आणि अर्जुन पंडितचा विषय आहे वाल्याकोळ्याचं वाल्मिकीत झालेलं रूपांतर. हा जुनाच हृदयपरिवर्तन-छाप विषय हृषिदांनी त्यांच्या सहजसरल ओघवत्या शैलीनं, तपशिलाच्या फरकाने मांडला आहे. कुठलाच माणूस सदासर्वकाळ आणि संपूर्णपणे वाईट असू शकत नाही, तो बदलू शकतो–त्याला बदलता येतं, हे या कथेचं प्राणसूत्र. 'दो आँखें बारह हाथ' या शांतारामबापूंच्या गाजलेल्या चित्रपटाचं कथासूत्रही हेच होतं हे बहुतेकांना माहीत असेलच. एरवीच्या हिंदी चित्रपटातसुद्धा खलपात्रांच्या आकस्मिक नाटकीय हृदयपरिवर्तनाचे बेगडी, अविश्वासार्ह, साचेबंद प्रसंग काही कमी पहायला मिळत नाही. मात्र त्या सगळ्यांत आणि अर्जुन पंडितमध्ये महत्त्वाचा फरक हाच की, अर्जुन पंडितमधलं परिवर्तन अतिमानवी वाटत नाही, कारण त्याच्यामागं प्रदीर्घ प्रयत्नांची बनलेली एक प्रक्रिया आहे, आणि ती डोळस परिवर्तनप्रक्रिया हाच दिग्दर्शनाचा केंद्रबिंदू आहे. एरवी चित्रपटातलं परिवर्तन हे गोड गोड शेवट साधण्यासाठी कृत्रिमरीत्या घडवून आणलेलं असतं. तर अर्जुन पंडितमधल्या परिवर्तनामागे असा काही मतलबी उद्देशच अस्तित्वात नाही, किंबहुना ते हृत्परिवर्तन हाच उद्देश आहे. तेच चित्रपटाचे साध्य आहे, साधन नव्हे. कदाचित यामुळेच की काय, पण हृषिदांनी प्रारंभीच्या फ्लॅशबॅक् वगळता अन्य कोणत्याही तांत्रिक युक्त्या न योजता किंवा कुठल्याच ग्लॅमरची अपेक्षा न ठेवता ही साधी कथा तितक्याच सरळसोट सहजसाध्य शैलीनं सादर केली आहे.

अर्जुन पंडित–पूर्वाश्रमीचा अर्जुन सरदार–हा गावच्या जमीनदारानं पोसलेला इमानदार गुंड. आडवातिडवा सुटलेला संजीवकुमार, जाडजूड मिशा लावून आणि जाडलठ्ठ काठीसकट अर्जुन सरदार म्हणून झक्क शोभून दिसतो. ज्यालात्याला दरडावून–धमकावून धाकात ठेवणारा हा गावगुंड अर्जुन सरदार, त्या गावी नव्यानंच येणाऱ्या डॉ. शुक्लांनी (अर्थातच अशोककुमार) दाखविलेल्या अकृत्रिम निरपेक्ष स्नेहामुळं हरखून जातो आणि त्यांच्या सहवासात, आपल्या आयुष्याचा रस्ता चुकला असल्याची जाणीव त्याला प्रथमच आणि प्रखरतेनं होऊ लागते. त्यातच आपल्या मुलीला सुखी-आनंदी ठेवण्यासाठी त्यानं केलेल्या प्रतिज्ञेची भर पडते आणि हा एकेकाळचा बिनकाळजाचा फत्तरी माणूस लिहायवाचायला शिकायला लागतो. अर्ध्या वयात सुरू केलेली ही खडतर साधना संपते तेव्हा अर्जुन सरदारच्या उग्र रानवट दराऱ्याची जागा अर्जुन पंडितच्या ज्ञानवृद्ध, शांत शीतल व्यक्तित्वानं घेतलेली असते. सगळ्या गावावर त्याची मायेची पाखर असतेच, पण डॉ. शुक्लांच्या कुटुंबावर आणि त्यांच्या एकुलत्या एका मुलावर तर विशेषच लोभ असतो. डॉ. शुक्ला एकाएकी हृदयविकारानं संपतात, तेव्हा त्यांच्या घराचा एक घटक (आणि त्यांचा कंपौंडरसुद्धा!) असलेला अर्जुनच त्यांच्या घराला आधार देतो. कालांतरानं मुलाचं–डॉ. विनय (विनोद मेहरा)–त्याच्या प्रेयसीशीच (श्रीविद्या) लग्न घडवून आणतो आणि हट्टानं त्याला एफ्. आर्. सी. एस्. साठी विलायतेला पाठवतो. चित्रपट सुरू होतो तोच फ्लॅशबॅकनं. एफ्. आर्. सी. एस्. होऊन परतलेला विनय गावी यायला निघाला आहे. अर्जुनकाका मृत्युशय्येवर आहे आणि 'तू परत येईपर्यंत मरणार नाही' हे विनयला दिलेलं वचन पाळण्यापुरतेच श्वास शिल्लक राह्यलेत. अखेर विनय दाखल होतो आणि अर्जुनची जीवनयात्रा समाधानानं संपते.

पूर्वी एका अंकात याच सदरात 'दस नंबरी' या चित्रपटाबद्दल लिहिताना त्यातल्या खलपात्रांच्या थक्क करून सोडणाऱ्या व्हरायटीबद्दल bad guys' museum असं म्हणून मी टीका केली होती. अर्जुन पंडिताला ही टीका उलट प्रकारे लागू पडेल, कारण good guys' museum चं स्वरूप त्याला आलं आहे. हृषिदांच्या चित्रपटातलं हे खेडं ग्रामसुधार योजनेतल्या आदर्श खेड्यांपैकीच एखादं असलं पाहिजे. त्या खेड्यातच काय पण अगदी त्याच्या पंचक्रोशीतही एखादाही औषधापुरता वाईट माणूस दिसत नाही. फार काय या गावातला जमीनदारसुद्धा अगदी 'जळाहूनहीशीतळू' आहे, उगीच आपला लहान पोरांना घाबरविण्यापुरता रागीट. 'अर्जुन त्याची नोकरी सोडून शिकणार,' हे ऐकून त्यानं काय करावं अशी प्रेक्षकांची अपेक्षा असते? तो अर्जुनाला धडधडीत शंभर रुपयाचं पेन्शन जाहीर करून टाकतो. चालू गुन्हेगारपटांची एवढी थट्टा पुरेशी झाली नाही म्हणूनच की काय, अनेक सिनेमातनं

सेक्सडॉल म्हणून वावरणाऱ्या आणि हमखास हमेशा 'व्हॅंप' भूमिका करणाऱ्या बिंदूला त्यांनी सरळ मिसेस शुक्लांच्या सभ्य सरळ सज्जन भूमिकेत पडद्यावर आणलेलं आहे. आपले हे 'प्रेमसेवाशरण' रूप खुद्द बिंदूला तरी ओळखता येईल की नाही शंकाच आहे! अर्थात ही दुय्यम भूमिका बिंदूनं ज्या विलक्षण तन्मयतेनं रंगविली आहे, त्यावरून तिच्यात अभिनयकलासुद्धा साक्षात जिवंत असल्याची साक्ष तिच्या सकट सर्वांना पटेल. विशेषतः डॉ. शुक्लांच्या निधनानंतरच्या तिच्या भूमिकेच्या 'बेअरिंगला' भलती धार चढते. हृषिदांच्या या सुजन संग्रहालयावर–good guys' museum–वर टीका करायचं मला काही कारण दिसत नाही, पण पडद्यावर दुरित ते ते काहीही आणि काहीही दुरितच पहायचा रोग जडलेल्या आमच्या काविळी नजरांना मात्र हे खुपतं, अवास्तव वाटतं. अर्थात हृषिदांचा चांगुलपणाही जरा 'ओव्हरलोड' झालाय हेही काही खोटं नाही. मोहक आणि फसवी ही विशेषणं मी शीर्षकात वापरली ती याच अर्थानं.

'अर्जुन पंडित' या नावावरनं सूचित होतं त्याप्रमाणेच हा चित्रपट पूर्णपणे व्यक्तिचित्रात्मक, व्यक्तिप्रधान आहे. अर्जुनच्या मध्यवर्ती भूमिकेभोवती सगळा चित्रपट अपरिहार्यपणे फिरला आहे आणि संजीवकुमारानं तो तसाच फिरता ठेवलेलाही आहे. विलक्षण सजीव पण संयमित आणि भूमिकेशी एकजीव होता येण्याचे सामर्थ्य या जोरावर त्यानं अर्जुनची दुपदरी व्यक्तिरेखा जिवंत उभी केली आहे. विशेषतः अर्जुन सरदारमधून बाहेर पडून अर्जुन पंडितच्या वस्त्रात शिरताना त्यानं स्वतःमध्ये स्वतःच्या आविष्कारपद्धतीमध्ये घडवलेला समूळ बदल त्याच्या अभिनयश्रेष्ठत्वाची खूण पटवणाराच आहे. खरं तर ही भूमिका–निदान अर्जुन पंडितचं–व्यक्तिचित्रण तरी–बरीचशी एकसुरी झाली आहे. त्यात कोणत्याही प्रकारे प्रदर्शनाला, 'ग्लॅमर'ला वाव नाही, ती नायकाची असली तरी रोमॅंटिक नाही, तेव्हा हे आव्हान पेलायला संजीवकुमारचीच गरज होती, त्यानंच भूमिकेला न्याय दिला आहे. अन्य कुणाला चित्रपटात फारसा वावच नाही. अशोककुमारचा अर्थातच अपवाद. विनोद मेहरा पूर्वीपेक्षा बराच सुधारलाय. देवेन वर्माच्या कॉमेडीवर 'अस्थानी' व 'अतिशयोक्त' अशी टीका करण्यात आली आहे, तथापि मला ती खटकली नाहीच. उलट सजीव आणि इंटरेस्टिंग वाटली, तो वावरला आहेही मोकळेपणानं. अर्जुन पंडितचे संगीत दिग्दर्शक आहेत कै. सचिनदेव बर्मन. गाणी दोनच, तीही अतिशय रद्दी चित्रपट संपवून बाहेर पडेपर्यंतसुद्धा मनात टिकणार नाहीत अशी सामान्य, उथळ, ठोकून दिल्यासारखी. एस्. डी. बर्मननी अशा अखेर–अखेरच्या चित्रपटात इतकी खराब, कामचलाऊ, सुमार कामगिरी केली आहे, की आणखी काही काळ ते संगीतक्षेत्रात राहिले असते, तर त्यांच्या एकेकाळच्या वैभवशाली कारकीर्दीला त्यांनीच तडे पाडले असते असं हल्ली मला वाटायला लागलं आहे. गुलजारच्या संवादातही फारसा राम नाही. श्रीविद्या ही नवी नायिका. तिची यातली भूमिका लहानशीच आहे म्हणून ठीक वगैरे वगैरे वगैरे...

पण अर्जुन पंडितबद्दल माझी खरी मोठी तक्रार एकच आहे, ती हीच की हे चित्र दिग्दर्शकाचं नाही; हृषिदांचं नाही. यातनं संजीवकुमार वजा केला तरी, दिग्दर्शकाच्या नावे खाली काय उरेल हा विचार या दृष्टीनं करून पाहण्याजोगा आहे. आणि अशा दिग्दर्शकाचं स्वतंत्र अस्तित्व कुठेच जाणवू नये, ही जाणीव मला धक्का देणारी आहे. हृषिकेषमधला क्रिएटिव्ह आर्टिस्ट विझत चालला नाही ना अशी शंका अशा वेळी आल्याशिवाय राहत नाही. 'आनंद'च्या वेळची गोष्ट वेगळी होती. त्या चित्रपटाच्या यशाचं श्रेय राजेश खन्नाचं की हृषिकेष मुकर्जींचं यावर जाहीर वादविवाद झाले होते. अर्जुन पंडितविषयी तसं होईलसं मला वाटत नाही. हा चित्रपट यशस्वी ठरला तर, सिंहाचा वाटा संजीवकुमारकडे जाईल.

दुर्दैवानं पडला तर अपयश हृषिदांच्या खात्यावर जमा होईल! ◻

---

# दीवानगी

## बारा आण्यांचा मसाला!

दोन आण्यांची कोंबडी आणि बारा आण्यांचा मसाला अशी एक खमंग म्हण मराठीत आहे. (आकड्यातील चूकभूल देणेघेणे, पण म्हणीची 'चव' कायमच) 'दीवानगी' या सुबोध मुकर्जी प्रॉडक्शन्सच्या नव्या (कितव्या बरं?) अपत्याचा प्रकार एकूण तोच आहे. फरक एवढाच की, इथली कोंबडी वारंवार वापरल्यानं इतकी जराजर्जर झालेली आहे की, तिला दोन आणेही किंमत यायची नाही, (मी चित्रपटाच्या 'कथा' नामे दुर्लक्षणीय भागाबाबत लिहीत असल्याचे काहींच्या लक्षात एव्हाना आलेही असेलच.) अशी ही कोंबडी क्वचित हरवलीच तर फोटोसह जाहिरातीत देण्यासारखा (वस्तुतः अशा एखाद्या आलतूफालतू प्रकाराविना हिंदी खानसाम्याचे कधी काही अडत नसते. त्यामुळे जाहिरातीचा प्रश्नच उद्भवू नये.) तिचा तपशील येणेप्रमाणे–

१. शेखर ऊर्फ शशिकपूर हा एक मोटरमेकॅनिक. गावाबाहेर पाण्याकाठी गॅरेज उघडून आपल्या एका अतिअगाऊ मदतनीस पोरासह (ज्यु. मेहमूद) गरिबीत राहत होता. अर्थातच कोणे एके काळी आणि कोणे एके स्थळी. ते स्थळही असं नामी की, त्याच्या घराजवळचं पाणी हे तळं, धबधबा, नदी किंवा समुद्र यांपैकी नक्की काय असावं ह्याचा शेवटपर्यंत पत्ता लागू नये.

२. एका गोड अपघातानं शेखरमहाशयांच्या आश्रयाला घरातून पळालेली एक सुंदर तरुणी आली. कंचन, अर्थातच झीनत अमन. तिला सापडवून देण्यासाठी लावलेले बक्षीस मिळविण्यासाठी तिला ठेवून घेणारे मेकॅनिक पुढे तिच्याच प्रेमात पडून नादुरुस्त झाले आणि धाड्दिशी लग्न करूनही मोकळे झाले. दुरुस्त होण्याचा हा मार्ग जपानी हाराकिरी सांप्रदायिकच म्हटला पाहिजे.

३. शेखरजींचा एक स्मगलर दोस्त त्यांच्याकडे हिऱ्यांची बॅग ठेवून परलोकवासी झाला. या कामात पेंटलसारखा गुणी माणूस वाया दवडला आहे. असो. ईश्वराने मृतात्म्याला शांती देण्याअगोदरच त्या हिऱ्यांसाठी (पृथ्वीवरच्याच) दोन गॅंग्समध्ये लठ्ठालठ्ठी सुरू झाली. साहजिकच शेखर व कुटुंबीयांची

अवस्था रस्सीखेचमधल्या रस्सीसारखी. आपल्या त्या कोंबडीचा रस्साही इथे जवळजवळ शिजत आलेला.

४. चित्रपटाचे नायक हिरे किंवा मदनपुरी नसून शेखरच असल्याचे अचानक साक्षात्कार-दृष्टान्त झाल्यामुळे, सज्जनांचे परित्राण आणि दुर्जनांचा विनाश करण्यासाठी लेखक–दिग्दर्शकांची उडालेली लगीनघाई. 'जे जे घडणे अशक्य ते ते सर्व घडवायच्या जिद्दीनं उतरलेली ही मंडळी चित्रपटाचा नेहमीचा चिकटगोड शेवट करतात.

तर ही अशी हाडाळ बिनपिसांची कोंबडी बिनजिभेच्या प्रेक्षकांना तरी रुचकर वाटावी यासाठी सुबोध मुकर्जी, दिग्दर्शक समीर गांगुली आणि त्यांच्या गँगनं कुठलाही मसाला चिमूटचिमूट सोडायचं बाकी ठेवलेलं नाही. हेलनचे नाच आहेत, माफक मान्यामान्याही आहेत, पण छटाकछटाकभरच. ज्युनियर मेहमूद नामक प्राण्याची व्हल्गर, हिडीस कॉमेडीही आहे. त्याच्या व्यक्तिरेखेला–'व्यक्तिरेखा' हा शब्द वापरताना भूमिती आणि युक्लिड या दोघांच्याही आत्म्याला शांती लाभावी अशी प्रार्थना मी अगोदरच केलेली आहे. चित्रपटात काहीही संगतवार प्रयोजन नाही. किंबहुना सर्व सुसंगतींना तिलांजली दिल्याशिवाय असला चित्रपट निर्माण होणार नाही ही मुकर्जी आणि कं. ची खात्रीच असली पाहिजे. मध्यंतरापाशी हा ज्यु. मेहमूद फालतू कारणानं जो गायब होतो, तो एकदम शेवटीच उगवतो. भोळचा, श्रद्धाळू, घरंदाज, पापभीरू, खास ओशट भारतीय संस्कृतीत उकडलेल्या कांचनच्या भूमिकेसाठी झीनतची निवड करण्यात मुकर्जींनी केलेली कॉमेडी खरं तर ज्यु. मेहमूदच्या कॉमेडी-पेक्षाही बेहतरीन आहे. शशिकपूर हा सध्या परमेश्वराखालोखाल सर्वज्ञ, सर्वसमर्थ आणि सर्वसाक्षी असल्यानं त्याच्या निवडीबावत प्रश्नच नाही, अभिनयाचा काही विशेष प्रश्न त्याच्या बाबतीत कधी उद्‌भवलाच नाही.

रवींद्र जैन या ताज्या दमाच्या गुणी आणि नव्यांपैकी एकमेव यशस्वी संगीतकाराचं, व्यावसायिक पठडीतलंच पण बऱ्यापैकी संगीत हे या दीवानगीतल्या अकलेच्या वाळवंटातलं एकमेव ओॲसिस !

□

समर्थ वाङ्‌मयकृतीचं
दुबळं चित्ररूपांतर !

# घर गंगेच्या काठी

कादंबरी या वाङ्‌मयकृतीवर, खासकरून लोकप्रिय (आणि चांगल्यासुद्धा) कादंबऱ्यांवर, नाटचचित्रसृष्टीतील निर्माते–दिग्दर्शक मंडळी अगदी टपून डोळा ठेवून असतात याचं अलीकडे मला सरळ दुःख व्हायला लागलंय. एखाद्या चांगल्या कादंबरीवर आधारलेल्या नाटकाला किंवा चित्रपटाला जाताना हल्ली मनात उत्सुकतेपेक्षा भीतीच जास्त धुगधुगत असते; काय पाहायला लागेल आणि काय नाही, अशी. निरनिराळ्या भाषांतल्या चांगल्या वाङ्‌मयकृती आणि त्यांच्या नाटच / चित्ररूपांतराचा दर्जा यांचा तुलनात्मक अभ्यास वगैरे मी केलेला नाही, पण त्या दर्जामध्ये तफावत असण्याचीच शक्यता जास्त असं मात्र माझं ठाम मत झालंय, अलिकडची अनेक उदाहरणं निरीक्षण केल्यानंतर. श्रेष्ठ कादंबरीचं नाटच / चित्ररूपांतर तितकंच श्रेष्ठ झाल्याची उदाहरणं फार दुर्मिळ आहेत आणि याला भाषेचीही बंधनं नाहीत. गॉन् विथ् द विंड्, चित्रलेखा, गबन, नीलकमल, महानंदा, स्वामी आणि आता घर गंगेच्या काठी ही उलट प्रकारची सहज आठवणारी काही त्रैभाषिक नाटच / चित्रांची उदाहरणं. ही अर्थातच अपेशी रूपांतरांची. आणि म्हणून असं वाटतं की, नाटक-सिनेमावाल्यांनी तरी, चांगल्या कादंबऱ्यांच्या वाटेला जाऊ नये. उगा आपल्या स्पर्शानं रुप्याचं लोखंड करायची किमया कशासाठी ?

तर, 'घर गंगेच्या काठी' हा चित्रपट सौ. ज्योत्स्ना देवधरलिखित त्याच शीर्षकाच्या राजमान्य आणि लोकमान्य कादंबरीवरून निर्माण केलेला आहे. चित्रपटनिर्मितीची पडद्यामागची हकीकत मोठी रम्य आहे, पडद्यावरच्या गोष्टीइतकीच. या चित्राचा मुहूर्त झाला तो १९७० मध्ये, म्हणजे रिलीज् होण्यापूर्वी तब्बल सहा वर्षे. इतक्या प्रदीर्घ काळ निर्मिती अवस्थेत राहिलेल्या चित्राच्या सर्व खाणाखुणा घर गंगेच्या काठीमध्ये उमटलेल्या दिसतात. काही चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर १९७० मध्येच आर्थिक अडचणी-मुळे ते थांबवावे लागले, आणि मग एकदा जे चित्र रेंगाळले ते पूर्ण व्हायला १९७५ साल उजाडले. या पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने चित्रण पुढे सरकत होतेच, अर्थात आर्थिक चणचणीला तोंड देऊनच.' ७५ ला कसावसा पूर्ण करून चित्रपट सेन्सॉरसंमत झाला आणि उत्कृष्ट अभिनेत्रीचं महाराष्ट्र राज्य पारितोषिकही जयश्री गडकरला मिळालं, तरीही चित्रपट प्रदर्शित होण्याच्या मार्गातल्या व्यावहारिक–व्यावसायिक अडचणी तशाच राहिल्या. इतक्या की, प्रिंट्स् निघून चित्रपट प्रदर्शित होण्याचीच आशा सर्वांनी सोडली, आणि तो डब्यातच पडून राहणार असं वाटत असतानाच, पूना गेस्ट हाऊसचे चारुदत्त सरपोतदार यांनी निर्मात्यांच्या साहाय्याने आणि कंबर कसून झळ सोसायची तयारी ठेवूनच 'भानुविलास'मध्ये तो प्रदर्शित केला. हा सारा तपशील विस्तारानं सांगण्याचं प्रयोजन साहानुभूती दाखविणं हे नसून मराठी चित्रव्यवसायाची सर्वसाधारण विदारक दुःस्थिती वाचकांना/प्रेक्षकांना कळावी हा आहे. हा धंदा अडचणींच्या खातेऱ्यातून जरा वर येतोय असं अनेकांना वाटत असतानाच हे दुसऱ्या टोकाचं उदाहरण नजरेत आलंय. चित्रपटाच्या कामात गतिमानता आणि एकसंधपणा, सातत्य कायम न टिकल्यामुळे कलाकारांचीही बरीच गैरसोय झाली असावी–अर्थात दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांचीही पंचाईत झाली असणारच–चित्रपटात अण्णाच्या भूमिकेत वावरणारे श्री. दाजी भाटवडेकर यांच्याशी बोलताना ते स्पष्टपणे जाणवलं.

'घर गंगेच्या काठी' या कादंबरीची आणि चित्रपटाची तुलना करण्यात अर्थ नाही. कारण चित्रपट शेवटी धंदेवाईक आहे, त्यासाठी कादंबरीला आवश्यक त्या तडजोडी कराव्या लागल्या आहेत. एरवी आशा काळेच्या ह्या गिरिधरछाप नृत्यगीताची इतक्या रद्दी आणि दरिद्री स्वरूपातसुद्धा काय जरुरी होती ? अंतूभावजी (काशिनाथ घाणेकर) आणि पद्मिनी (आशा काळे) या दोघांचं प्रेम, चित्रपटात अशाच व्यावसायिक

दृष्टिकोनातून वापरल्यामुळे, ठिगळ लावल्यासारखं वेगळं पडलं आहे, patchy झालं आहे. मुळात ते तसं नाही... वगैरे वगैरे. सर्वांत मोठी तडजोड केली आहे ती शेवटाच्या बाबतीत. मूळ शोकात्म प्रकृतीचा कादंबरीतील शेवट चित्रपटात सुखात्म केला आहे. तो बदलही फारसा convincing वाटत नाही, मनाला पटत नाही.

एका सधन एकत्र कुटुंबातल्या अंतर्गत संघर्षाची कहाणी सांगणाऱ्या या कथानकाची मदार जानकी (जयश्री गडकर) या मधल्या सुनेच्या मध्यवर्ती व्यक्तिरेखेवर असली तरी, कथावस्तूची मूळ मागणीच multi–star–caste ची आहे, आणि त्यामुळेच सुलोचना, काशिनाथ घाणेकर, आशा काळे, दाजी भाटवडेकर, कुमार दिघे आणि माई भिडे यांसारखी मातब्बर मंडळी श्रेयनामावलीत भेटतात. अर्थात या समर्थ अभिनय–फळीच्याच आधारानं हा चित्रपट थोडा तरला–तगला आहे. विशेषतः एकत्र कुटुंबातही आपल्या न्याय्य स्थानासाठी झगडणारी सून जानकी आणि सर्वांवर अनिर्बंध हुकुमत गाजवू पाहणारा घरचा कर्ता पुरुष–मोठा भाऊ अण्णा–यांची अभिनयाची जुगलबंदी संस्मरणीय. इतर सर्वांच्या भूमिकांनाही योग्य तऱ्हेनं न्याय दिला गेला आहे. सुलोचनाबाईंचा खास उल्लेख करायला हवा. डॉ. काशिनाथ या चित्रात, 'हा खेळ सावल्यांचा' पेक्षा चांगला दिसलाय् आणि स्पष्टसुद्धा बोललाय. हे विशेष.

चित्रपटाचे कथा–पटकथा–संवाद स्वतः सौ. ज्योत्स्नाबाई देवधरांच्या हातचे आहेत, गीतं चार, कवी ग. दि. माडगूळकर आणि संगीतकार प्रभाकर जोग. ग. दि. मां. नी इतकी ढोबळ, कामचलाऊ, केविलवाणी, हास्यास्पद आणि पुनः पुन्हा तेचतेच उगाळणाची कामगिरी यापूर्वी कधी केली असेलसं वाटत नाही. त्यांची साच्यातल्या गणपतीसारखी गोड गोड गाणी आणि प्रभाकर जोगांच्या तोडीला तोड रटाळ आणि जुनाट वळणाच्या परिचित चाली ऐकताना उभयतांनी हे वेठबिगारीचे काम टाकल्याचा भास झाला. नावीन्याचा अभाव निराशजनक आणि चिंताजनकही आहे. हीच गोष्ट दिग्दर्शनातील कल्पनादारिद्र्याविषयी म्हणता येईल. दिग्दर्शक श्री. माधव भोईटे यांचे स्वतंत्र अस्तित्वच फारसं कुठे जाणवत नाही, तेव्हा चित्रावर त्यांची पकड असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तांत्रिक बाबींपैकी ध्वनिमुद्रण आणि छायाचित्रण या दोन्ही महत्त्वाच्या बाजू साफ लंगड्या पडल्याचं जाणवतं. संकलनही निर्दोष नाही. (संकलनासाठी राज्य सरकारचे पारितोषिक विभागून मिळाल्याचे ऐकले!) अनेकदा दृश्यसंकलन विस्कळितपणे खंडित झाले आहे. काशिनाथ–आशा भोवतीचे प्रसंग हे 'पॅची एडिटिंग'चं नमुनेदार उदाहरण.

राज्य पारितोषिक जयश्री गडकर यांनाही मिळालं आहे!

अर्थात त्याबद्दल तक्रारीचं कारण दिसत नाही, कारण त्यांनी आणि सहकलाकारांनीच तर चित्रपट उचलून धरला आहे.

तेव्हा चुका या व्हायच्याच, टु अर् इज ह्यूमन्, वगैरे. ¤

---

भारतीय प्रादेशिक लोककलांचे जिवंत प्रवाही आविष्करण

# चरणदास चोर

---

'चरणदास चोर' या छत्तीसगढी हिंदी लोकनाटचाचा एकच प्रयोग, फिल्म इन्स्टिटयूट आणि थिएटर अॅकॅडमीच्या सहकार्यामुळे पाहण्याचा योग पुणेकरांना अलिकडेच आला. 'लोकनाटच' या शब्दाबद्दलच्या आपल्या–विशेषतः शहरी मंडळींच्या–associations बऱ्याच निराळ्या, एकसाची आहेत; संकुचित आहेत. चरणदास चोरच्या संदर्भात बोलताना या कल्पना बदलायला – दुरुस्त करायला हव्यात. हे लोकनाटच सादर करणारे दिग्दर्शक श्री. हबीब तनवीर आणि त्यांचे तीस–बत्तीस सहकारी यांना अभिप्रेत असलेला लोकनाटचाचा आशय हा 'folk theatre' या स्वरूपाचा आहे. श्री. तनवीर हे नाटचक्षेत्रात, विशेषतः भारतातल्या, विविध प्रादेशिक लोककलांच्या नाटचीकरणाच्या क्षेत्रात पंचवीस वर्षांहून अधिक काळ कार्यरत आहेत. नृत्य, नाटच, संगीत या लोककला भारताच्या सर्व भागांत, खेडोपाडीसुद्धा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात रुजलेल्या आहेत, मग ते कोकणातले दशावतारी खेळचे असोत, किंवा केरळातले 'मुद्राराक्षस' फेम नाटचतंत्र नाहीतर उत्तर भारताची रामलीला असो. या परस्परांचं जतन–संवर्धन केलं, तर त्यातूनच खूप काही शिकता येण्यासारखं आहे, या श्रद्धेनं श्री. तनवीर छत्तीसगढसारख्या मध्यप्रदेशातल्या अनगढ भागाच्या बिकट वाटेनं, धोपटमार्ग सोडून गेले आणि तिथल्या अनपढ आदिवासींच्यासुद्धा अंगात मुरलेल्या गीतनृत्याभिनयादि लोककलाप्रकारांचाच योग्य तसा वापर करून चरणदास चोर या खऱ्या अर्थानं शोभणाऱ्या 'लोक'नाटचाची निर्मिती त्यांनी केली. खरं तर परदेशांतही हिंडून त्यांनी वेगवेगळ्या घाटा–थाटाच्या 'modern theatre' चा जवळून अभ्यास केलेला आहे, आणि तरीही, 'मी माझ्या कलाकारांना फारच थोडं शिकवतो, उलट मला खूप काही आणि अस्सल शिकायला मिळालं ते भारतीय लोककलांमधूनच,' असं त्यांनी आवर्जून अभिमानानं सांगितलं.

चरणदास चोर या लोकनाटचाची कथाकल्पना मूलतः राजस्थानी लोककथेमध्ये आढळते. 'खरे बोलणारा चोर' या नावानं ही कथा मराठीतही उतरली आहे. चरणदास हा एक अट्टल चोर. एका बैराग्याच्या संगतीमुळे तो खरं बोलण्याची प्रतिज्ञा करतो. चोरी मात्र सोडत नाही, अर्थातच त्यामुळे, राज्याच्या खजिन्यातून पाच मोहोरा चोरल्यानंतर चरणदास पकडला जातो. त्याच्या तडफदार स्वभावावर फिदा झालेली राणी त्याला मुक्त करून लग्नाची मागणी घालते. पण चरणदासानं पूर्वी अनवधानानंच, 'सोन्याच्या थाळीत जेवणार नाही, राणीशी लग्न करणार नाही' अशा, असंभाव्यतेमुळे हास्यास्पद वाटणाऱ्या प्रतिज्ञा केलेल्या असतात त्या आडव्या येतात, मनोभंगामुळे संतापलेली राणी चरणदासाचा वध करविते आणि चोर असूनही सत्यप्रेमी ठरलेला चरणदास बलिदानानंतर पूज्य बनतो. अशी ही सरळसाधी, बहुपरिचित कथा असल्यामुळे कमालीचं औत्सुक्य दाटलं होतं ते या लोककथेचं कथानक कसं होईल आणि सादर करण्याची पद्धत काय राहील याबद्दल, कार्यक्रमाची सुरुवात आणि शेवट दोन्ही उसळत्या आवेगी समूहनृत्याद्वारे करण्यात आले. लोकनृत्यातला सारा जोश–उल्हास एकवटलेल्या या नर्तकसमूहानं आणि ढोलकीवाल्याच्या कणखर, लयबद्ध थापेनं प्रेक्षागृहाला अक्षरशः मंत्रमुग्ध करून जागीच खिळवून ठेवलं. ढोलकीवादक आणि प्रमुख नर्तक यांच्यातला जुगलबंदीचा जबरदस्त वेग तर शब्दात मावू नये असा. नृत्यासोबत कथेचा उपोद्घात–उपसंहार करणारं लयदार गाणं त्याच गतीला साथ देणारं. नृत्यातली निरनिराळी formations

डोळयांत तेल घालून निरखायला लावावीत इतकी चपळ. अशा खळाळत्या—उसळत्या लोकनृत्याशी क्वचितच गाठ पडणाऱ्या पुणेकरांना या नर्तकांनी आपल्या कलेच्या बहुविध ताकदीचा हा एक अनोखा अनुभव दिला. अर्थात नाटचवस्तूच्या संदर्भातही या नर्तकसमूहानं सूत्रधार आणि 'कोरस' यांच्यामध्ये कुठेतरी बसणारी Linkages ची महत्त्वाची भूमिका पार पाडली

'चरणदास चोर'चे सर्वच कलाकार हे छत्तीसगढचे रहिवासी. हा भाग काहीसा मागासलेला. यातले सारेजण तसे हौशी, अव्यावसायिक, अननुभवी आणि कोणत्याही शिक्षण—प्रशिक्षणाचा अभाव असलेले कलाकार. आणि तरीही त्यांची कामावरची निष्ठा आणि तन्मयता थक्क करून सोडणारी होती. अंतिम परिणामाच्या दृष्टीनं कोणतंही पात्र यत्किंचित उणं पडू नये, इतकं जबरदस्त 'टीमवर्क' मराठी रंगभूमीवरही घाशीरामसारखे सन्माननीय अपवाद वगळता दुर्मिळच. या छत्तीसगढी कलाकारांनी ही किमया साध्य करून दाखविली. समूहदृश्यातली / सामूहिक हालचालीतली गोष्टच निराळी, पण एरवीच्या कथाभागातसुद्धा हे दोन अंकी नाटक कुठेही खंडित—विस्कळित झाल्यासारखं वाटलं नाही. श्री. हबीब तनवीर यांनीही दिग्दर्शन करताना कथानकापेक्षा सांघिक performance वरच जास्त भर दिला असावा असं वाटलं. कारण कलाकारांचा अस्सल जिवंत मनमोकळा अभिनय मुखावत असतानाही कथावस्तूच्या विकसनातल्या उणिवा जाणवल्याच. संथपणा हा (नृत्य—संगीत वगळता) कथाप्रवाहातला एक महत्त्वाचा दोष. बैराग्याची व्यक्तिरेखा शेवटपर्यंत तळयात—मळयात अशी त्रिशंकूछाप लटकत—लोंबकळतच राहिली, काहीही एका ठाम स्वरूपाप्रत आकाराला येऊ शकली नाही, हेही एक नमूद करण्याजोगं अपयश.

'चरणदास चोर' पूर्णपणे हिंदीच्या छत्तीसगढी बोलीमध्येच सादर केलं गेलं. अर्थात सोपी भाषा आणि कलाकारांच्या कामगिरीमुळे नाटक समजायला कुणालाच अवघड गेलं नाही.

चरणदासाच्या भूमिकेतला मदनलाल हा अभिनेता आणि नृत्यातली जुगलबंदी या दोन वैशिष्टयांसाठी तरी, निदान हे लोकनाटच विसरता येणार नाही ! □

# भुलाये न बने

संजीव मंगरूळकर

वाद्यवृंद—ऑर्केस्ट्रा— स्वरूपाच्या कार्यक्रमांना येत असलेल्या भरतीबद्दल पूर्वी एकदा लिहिले होते, ते श्री. जगदीश खेबुडकरांच्या 'गावरान मेव्या'च्या संदर्भात. अजूनही ऑर्केस्ट्राटाईप कार्यक्रमांची चलती चढत्या श्रेणीनेच चालू आहे. विशेषत: बालगंधर्व रंगमंदिरात तर जुलै—ऑगस्टमध्ये जादूचे प्रयोग आणि हे वाद्यवृंद अगदी जोडी—तडजोडीनं नांदून गेले. आता अलीकडे त्यांची हवा, जोर कायम ठेवला तो सी. रामचंद्र या प्रथितयश जुन्या संगीतकाराच्या 'भुलाये न बने' या कार्यक्रमामुळे. बदलत्या कालमानानुसार चित्रपटसंगीताच्या व्यवसायक्षेत्रातून हद्दपार झालेल्या या गुणी संगीतकारानं या कार्यक्रमातून आपल्या जुन्या, गाजलेल्या सिनेसंगीताचं पुनरुज्जीवन करण्याची धडपड चालवली आहे, त्याला प्रतिसादही मोठ्या प्रमाणावर मिळत आहे. सी. रामचंद्रचे 'रसयात्रा'सारखे इतर कार्यक्रम यशस्वी ठरले नसले तरी 'भुलाये न बने' मात्र लोकप्रियता कमावील असं दिसतं. त्यांचंच संगीत लाभलेल्या 'अलबेला' या जुन्या चित्रपटानं सध्या जी धमाल उडवून दिली आहे, त्याची पार्श्वभूमीही त्यांना फायदेशीर ठरणं अशक्य नाही. पुण्यात त्यांचे तीन प्रयोग नुकतेच झाले.

बालगंधर्व रंगमंदिराच्या संघर्षाच्या निमित्ताने, पुणेकर नाटचरसिकांची आजकाल फार कुचंबणा होत असली तरी, सिनेसंगीतरसिकांची मात्र मोठी चंगळ उडाली आहे ! विविध कलाकारपथकांनी सादर केलेल्या संगीत रजनी, मिमिक्री—कॉंपिटिशन्सनी एकच धमाल उडवून दिली आहे. यांतलाच एक नावीन्यपूर्ण आणि वैशिष्टचपूर्ण कार्यक्रम म्हणजे 'भुलाये न बने' ! कार्यक्रमाचे संयोजक सी. रामचंद्र आणि नवोदित गायिका यामुळे कार्यक्रमाविषयी लोकांच्या मनात बरीच उत्सुकता होती आणि अपेक्षेप्रमाणे अर्थातच रंगमंदिर रंगीबेरंगी कपड्यातील रसिकांच्या गर्दीने गजबजले होते.

सर्वप्रथम सी. रामचंद्र यांनी वाद्यवृंदांतल्या सर्व कलाकारांचा रिवाजाप्रमाणे परिचय करून दिला. फरक एवढाच की, अशा कार्यक्रमामध्ये इतरत्र कुठेही न आढळणारा खास अनौपचारिक खेळकरपणा त्यांच्या परिचयात होता. हा एकूण कार्यक्रमच त्यातल्या साधेपणाने रसिकांच्या लक्षात राहील.

यानंतर सी. रामचंद्रांच्या सदाबहार संगीताने सजलेली गीते पुन्हा एकदा रसिकांना ऐकायला मिळाली. मात्र आता गायक होते नव्या दमाचे नवोदित कलाकार ! स्वत: सी. रामचंद्र आणि प्रमिला दातार यांनी 'शोला जो भडके', 'अजन्मा जन्मासी आला' 'गोरे गोरे बाँके छोरे' यासारखी गीते सादर केली. मात्र प्रमिला दातारांच्या आवाजातला कर्कशपणा कानाला खटकत होता. त्यांनी सादर केलेल्या 'मुहोब्बत ऐसी धडकन है', 'कभी खामोश हो जाना' यांसारख्या गीतांमध्येही हाच दोष जाणवला. 'कैसे आऊँ जमुना के तीर', 'ये जिंदगी उसीकी है' ही त्यांची गीते मात्र उल्लेखनीय वाटली.

कार्यक्रमाचे खास वैशिष्टच असलेल्या सुषमा श्रेष्ठने आपल्या सहज अन् सुरेल गायनाने श्रोत्यांना खुलविले. 'धीरे से आजारें अखियन में' या तिच्या पहिल्याच गाण्याला once more देऊन रसिकांनीही तिला दाद दिली. कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे 'राणी वर्मा' ही नवोदित गायिका. मुग्ध मधुर आवाज. गाण्यातील सहजसुंदरता, आवाजातील फिरत यातून तिने श्रोत्यांवर चांगलाच जम बसवला. 'वो चाँद जहाँ', 'राधा ना बोले' या तिच्या गाण्यांना once more देऊन, रसिकांनी तिलाही चांगलीच दाद दिली. कार्यक्रमासाठी जमलेले श्रोते एकंदरीत बरेच 'रसिक' होते. 'भोली सूरत', 'सण्डे के सण्डे' यासारख्या गाण्यांना शिट्टयांची साथ देऊन त्यांनी रंगमंदिर दणाणून सोडले. कलाकारांचे परस्परातील संबंधसुद्धा या वातावरणाला पोषक होते. कूक अँण्ड क्रॅक यांनीही किरकोळ विनोद अन् मिमिक्री करून त्यात भर घातली !

तीन तासांचा हा कार्यक्रम ऐकल्यावर, नवोदित गायकांच्या कलेने श्रोतृवर्ग प्रभावित झाला होता हे मात्र खचितच ! या कार्यक्रमाला एक सूचना द्यावीशी वाटते. अशा टॅलेण्टेड कलाकारांकडून केवळ जुनीच, दुसऱ्या गायकांनी गायलेली गाणी म्हणवून न घेता, त्याबरोबरच गैरफिल्मी पण त्यांची स्वत:ची अशी आणखी काही गाणी बसविल्यास, त्यांच्या सृजनशील प्रतिभेला नवीन वाव मिळेल असे वाटते ! अनुकरणापेक्षा निर्मितीचे समाधान केव्हाही अधिक असते आणि हे कलाकार त्यादृष्टीने समर्थ आहेत, असे वाटते ! □